मासिक

# महाराष्ट्र रेंजर

## दिपोत्सव २०२३



मूल्य : ₹ २९९/-


KARHANDLA WILDLIFE SANCTUARY
KARHANDLA FARM & RESORT ®
JUST 58 KM From ZERO MILE
Follow us on :
A Unit of Hotel Al-Zam Zam
KARHANDLA FARM & RESORT
Resort : Umrer Bhiwapur Road, Navegaon Deshmukh, Maharashtra-441210
Office : Azamshah Sq. Hotel Al-Zam Zam. C.A. Road, Nagpur-440002
Email : info@karhandlafarm.com, www.karhandlafarm.com
CONTACT :
8956666661, 8796466666
Design By # Rahul
AVM ADVERTISING

मंत्री

महाराष्ट्र राज्य

मंत्री
वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : २२.१०.२०२३

# शुभेच्छा संदेश



सप्रेम वन्दे मातरम्

माझ्या सर्व वन अधिकारी, वन कर्मचारी आणि निसर्ग रक्षकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...!!

मासिक 'महाराष्ट्र रेंजर' चा पहिला दिवाळी अंक प्रसिध्द होत आहे हे पाहून मनस्वी आनंद झाला. या मासिकाच्या माध्यमातून वन आणि वन्यजीवांच्या बाबतच्या माहितीची गंगा राज्याच्या दुर्गम भाता काम करणाऱ्या वन अधिकारी-कर्मचारी यांच्यापर्यंत पोहोचणार आहे हे माझ्यासाठी आनंद देणारे आहे.

महाराष्ट्र राज्य हे वन, वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धनाच्या बाबतीत देशातले अग्रेसर राज्य आहे. वन-वन्यजीव संवर्धन कामी राज्याने केलेले कार्य अतिशय कौतुकास्पद आहे. यासाठी वन विभागातील अधिकारी-कर्मचारी यांच्यासह विविध अशासकीय संस्था आणि स्थानिक ग्रामस्थ यांच्याकडून प्रामाणिकपणे प्रयत्न होत आहेत. या सर्वांच्या कष्टाचे फलित म्हणून आज राज्यातील वनक्षेत्र नुसते सुररक्षितच नाही तर त्यात निरंतर वृध्दी होत आहे. तसेच वाघांच्या आणि इतर वन्यजीवांच्या संख्येतही राज्य प्रगती करत आहे.

राज्य शासनाच्या वतीने घेण्यात येणारे शासन निर्णय आणि धोरणे, राज्यात वन-वन्यजीव क्षेत्रात होणारे विविध प्रयोग, क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या विविध अडचणी 'महाराष्ट्र रेंजर' मासिकाच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचविणे सहज शक्य आणि सुलभ होणार आहे याचा खूप आनंद वाटला.

पुन्हा एकदा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा तसेच मासिक 'महाराष्ट्र रेंजर' च्या पुढील कारकीर्दीस सहृदय सदिच्छा...!!



आपला

(सुधीर मुनगंटीवार)

॥ वनवन्यजीवानां संरक्षणं कर्तव्यम् ॥

महाराष्ट्र रेंजर

वर्ष १ ले । अंक ३ रा । नोव्हेंबर २०२३

Title Code - MAHMAR52736/2023

# मासिक महाराष्ट्र रेंजर

महाराष्ट्रातील वन-वन्यजीव संवर्धनासाठी कार्यरत एकमेव मासिक

**कार्यकारी संपादक**

राहुल शिवाजीराव ताटे, मोबा : ९४२१६६११९२

**सह संपादक**

सुरज भोसले

**सहाय्यक संपादक**

जयदीप जाधव, शेखर ताटे

**अक्षरजुळणी/पेजिनेशन**

सचिन कदम, मोबा : ७६२०८४३३६१

**छायाचित्रे**

जितेंदर गोविंदानी

**मुद्रितशोधन**

सरस्वती ऑफसेट,सातारा

## महाराष्ट्र रेंजर विभागीय कार्यालय

प्लॉट नं ०२, पायरी पार्क, गोळीबार मैदान, गोडोली,

सातारा-४१५००३ (महाराष्ट्र)

ई-मेल : maharashtraranger@gmail.com

वेबसाईट : www.maharashtraranger.in

मोबा : ९४२१६६११९२/७३८७९५४७४३/९३०७१२४४९९

महाराष्ट्र रेंजर हे मासिक मुद्रक, प्रकाशक व मालक सोनाली मंगेश ताटे यांनी सरस्वती ऑफसेट, २७५/k, मंगळवार पेठ-४१५००२ (महाराष्ट्र) येथे छापून महाराष्ट्र रेंजर कार्यालय, मु. पो. तासगांव ता. जि. सातारा ४१५००२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.

MAHARASHTRA RANGER" monthly Printer, Publisher And Owned By SONALI MANGESH TATE Printed At SARASWATI OFFSET, 275/K, Mangalwar Peth, SATARA -415002 (M.S.) and Published At MAHARASHTRA RANGER KARYALAYA, AT-POST-TASGAON Tal And Dist. SATARA - 415002. (M.S)

या अंकातील प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक महाराष्ट्र रेंजर सहमत असतीलच असे नाही.



# संपादकीय



**श्री. राहुल ताटे**
संपादक

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।।**
**तुका म्हणे होय मनासी संवाद ।आपुलाची वाद आपणासी ।।**

जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या सतराव्या शतकातील या शब्दांचा अर्थ आज अधिक स्पष्टपणे आपल्याला कळून येऊ लागला आहे. निसर्ग चक्राच्या बदलत्या परिणामांकडे अधिक सजगतेने बघण्याची वेळ आली आहे. निसर्गाच्या चक्रात ढवळाढवळ करणे किती महागात पडू शकते हे रोज येणाऱ्या नवनव्या नैसर्गिक संकटांमुळे अधिक स्पष्ट होऊ लागले आहे. निसर्ग आपल्याला सर्व गोष्टी किती सहज देतो याची जाणीव होऊ लागली आहे. निसर्गाच्या संरक्षणाशिवाय मानवाचे अस्तित्वच राहणार नाही किंबहुना मानवाचे अस्तित्वच निसर्गाचा एक भाग आहे. त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तींचे संरक्षण आणि वनराईचे जतन आता महत्त्वाचा विषय ठरला आहे. गेल्या काही दशकांमध्ये तापमानवाढीच्या संकटावर मात करण्यासाठी वनाच्छादित प्रदेश वाढवण्यावर जगातील बहुतेक देशांचे एकमत झालेले आहे.

आपल्या राज्यातही वनांच्या संरक्षणासाठी राज्य शासन विशेषत्वाने प्रयत्न करत आहे. महाराष्ट्राला वनांची खूप मोठी नैसर्गिक संपत्ती लाभली आहे. त्यामुळे येथे जैवविविधताही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. राज्य शासन या जैवविविधतेच्या जतनासाठी आवश्यक ती पावले टाकत असून त्यातून निसर्ग आणि मानव यांच्या परस्परसंबंधाचे जतनही करत आहे. महाराष्ट्र राज्य हे पर्यावरणाच्या बाबतीत अतिशय संवेदनशील राज्य आहे. राज्यात वन विभाग अंतर्गत प्रादेशिक, सामाजिक वनीकरण, वन्यजीव आणि संशोधन व तत्सम शाखा या वन-वन्यजीव व जिविधता संवर्धनाचे काम करीत आहेत. सध्या राज्यात ६ व्याघ्र प्रकल्प, ६ राष्ट्रीय उद्याने आणि ५० हून अधिक वन्यप्राणी अभयारण्ये आहेत. राज्याचा क्षेत्रीय विस्तार खूप मोठा असून वन आणि वन्यजीव क्षेत्रात कमालीची विविधता आढळते. या विविधते सोबतच प्रत्येक क्षेत्राच्या समस्या, त्याची बलस्थाने आणि समस्येवरील उपाय देखील वेगवेगळे आहेत.

सध्या जगासमोर जागतिक तापमान वाढ, पर्यावरणीय बदल आणि प्रदूषण यासारख्या मानवनिर्मित समस्या आ वासून उभ्या आहेत त्यावर एकजुटीने प्रयत्न करणे हे सगळ्यांचेच कर्तव्य आहे. याच भावनेतून महाराष्ट्रात वन आणि वन्यजीव तसेच पर्यावरणात होणाऱ्या विविध घटना आणि समस्या तसेच त्यावर केले जाणारे उपाय याची जाण समाजाला व्हावी या भावनेतून मासिक महाराष्ट्र रेंजर (Maharashtra Ranger) प्रकाशित करण्यात येणार असून या व्यासपीठाच्या माध्यमातून राज्यातील पर्यावरण, वन आणि वन्यजीव जागरूकता आणि प्रसिद्धी बाबतचे कार्य करण्याचा संपादक मंडळाचा मानस आहे.

**महाराष्ट्र रेंजर मासिकाच्या सर्व वाचकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...**





# छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र

**छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी**

आपल्या राज्यातील जंगल संपत्ती, निसर्ग संपत्ती कमी होऊ नये म्हणून एक आज्ञापत्रच काढले होते. आपल्या राज्यातील निसर्गदत्त जंगल संपत्तीची, वृक्षठेव्याची कशी काळजी घ्यावी, याविषयी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार स्पष्टपणे या आज्ञापत्रात मांडले आहेत. आधुनिक काळाप्रमाणे प्रदूषण किंवा पर्यावरणाचा असमतोल नसणाऱ्या त्यांच्या काळातही त्यांनी वृक्षसंपत्तीचे मोठेपण जाणून घेतले होते. गडावरील वृक्ष संवर्धनाबाबतच्या या आज्ञापत्रावरून त्यांची पर्यावरणाबाबतची दूरदृष्टी दिसून येते.

आरमारास तख्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लाकूड असावे लागते. ते आपले राज्यात अरण्यामध्ये सागवानादि वृक्ष आहेत त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुजुर लेहून हुजरचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहीत जे लागेल ते परमुलकीन खरेदी करून आणवीत जावे. स्वराज्यातील आंबे फणस आदिकरून हेही लाकडे आर-माराचे प्रयोजनाची. परंतु त्यांस हात लाऊ न द्यावा. काये म्हणोन की ही झाडे वर्षा दो वर्षांनी होतात ऐसे नाही. रयतेने ही झाडे लाऊन लेकरांसारखी बहुतकाळ जतन करून वाढविली. ती झाडे तोडिलियावरी त्यांचे दुःखास पारावार काये? येकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारासहीत स्वल्पकाळेच बुडोन नाहिसेच होते. किंबहुना धन्याचेच पदरी प्रजापीडणाचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावे हानीहि होते. याकरिता हे गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी. कदाचित येखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल तरी त्याचे धन्यास राजी करून द्रव्य देऊन त्याच्या संतोषे न्यावे. बलात्कार सर्वथा न करावा.



# अंतरंग



## राज्य वन्यजीव कृती आराखडा राज्यातील वन्यजीव संवर्धनाकरिता दिशादर्शक ४

राज्य वन्यजीव कृती आराखडा हा राज्य वन्यजीव मंडळाने त्यांच्या दिनांक 12 ऑक्टोबर 2021 च्या 17 व्या सभेत मान्य केलेला असून राज्य शासनाने 25 मे 2022 च्या शासन निर्णयान्वये सदर राज्य वन्यजीव कृती आराखडा (2021 ते 2031) शासन मान्य केलेला आहे. राज्यातील वन्यजीव संवर्धन योग्य प्रकारे होण्यासाठी राज्य वन्यजीव अभयारण्य कृती आराखड्यात दिलेल्या प्रकल्पांची अंमलबजावणी केल्यास महाराष्ट्र राज्यात वन्यजीव संवर्धन क्षेत्रात भेडसावणारे प्रश्न मार्गी लागू शकतील. या राज्य वन्यजीव कृती आराखड्याची रुपरेषा आणि त्यातील अंतर्भूत गोष्टी याबाबत राज्याचे माजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) आणि जेष्ठ वन्यजीव तज्ञ **श्री. नितीन काकोडकर** यांनी अधिक माहिती दिली आहे.

## १५ कुणा एकाची अरण्यगाथा



जंगलातला रांगडा अधिकारी असं जेव्हा कोणी म्हणतं तेव्हा आपसूक सगळ्यांच्या नजरेत एकच चेहरा उभा राहतो तो म्हणजे राज्याचे माजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) **श्री. सुनील लिमये** सर... नुकतेच लिमये सर या पदावरुन निवृत्त झाले आहेत, आपल्या 34 वर्षांच्या वनकारकिर्दीत आलेल्या कडू- गोड आठवणी ते आपल्या समोर आपल्या खुमासदार शैलीत मांडत आहेत लिमये उवाच या विशेष सदरातून...



## वनांच्या आणि गुरांच्या वेदना १९

भारतात 2022 पर्यंत गुरांची संख्या ही 308 दशलक्ष इतकी प्रचंड असून भारत हा जगातील सर्वात जास्त पशुधन असलेला देश आहे. संरक्षित क्षेत्राच्या बाजूला लागून असलेल्या गावातील आणि जंगला शेजारील बहुतांश पशुधन हे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे जंगलावर अवलंबून असते. वाढत्या पशुधनाचा जंगलावर होणारा विपरीत परिणाम आणि त्याच्यावर करता येणाऱ्या उपाययोजना या अनुभवाच्या माध्यमातून **श्री. किशोर रिठे** संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांनी मांडल्या आहेत.

## ३१ व्याघ्र संवर्धनाचा इतिहास



भारतात व्याघ्र संवर्धन हे पूर्वापार चालत आलेले आहे. मुळात वन्यजीव संवर्धन हे भारतीय संस्कृतीत खोलवर रुजलेले आहे म्हणूनच बहुतांशी सगळ्याच धर्मात वनस्पती आणि वन्यप्राणी यांना सन्मानाचे स्थान दिसते. कालानुरुप वन्यजीव संवर्धनासाठी कायद्याचा आधार घ्यावा लागला, प्रोजेक्ट टायगर आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण सारख्या व्यवस्था पुढे आल्या. भारतातला व्याघ्र संवर्धनाचा इतिहास विषद करत आहेत निवृत्त वनअधिकारी **श्री. किशोर मिश्रीकोटकर..**



## माळरानाचा राजा लांडगा ४३

वाघांच्या संख्येपेक्षाही भारतीय राखाडी रंगाच्या लांडग्यांची संख्या भारतात कमी झाली आहे. पर्यावरण संतुलनासाठी लांडग्यांच्या संवर्धनासाठी व्यापक प्रयत्न करणे गरजेचे आहे, नाहीतर माळरानाचा हा राजा लहानपणी ऐकलेल्या लांडगा आला रे आला...एवढ्याच गोष्टीपुरता शिल्लक राहील अशी परिस्थिती आहे. याबद्दल अधिक माहिती दिली आहे पशुवैद्यकीय तज्ञ **डॉ. धनंजय प्र. भोईटे** यांनी...

## ४९ आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिन: २४ ऑक्टोबर



हवामान बदल आणि त्याचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम याविषयी जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने तसेच हवामान बदलाचे घातक परिणाम रोखण्यासाठी कृती करण्याच्या आवश्यकतेवर भर देण्याच्या उद्देशाने दरवर्षी 24 ऑक्टोबर रोजी आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिवस साजरा केला जातो. विभागीय वन अधिकारी **श्री. नरेंद्र चांदेवार** यांनी या संकल्पनेबाबत अधिक माहिती या सदरात दिली आहे.

# अंतरंग



## मानव वन्यजीव संघर्ष व उपाययोजना ५१

महाराष्ट्र राज्यात मागील काही वर्षात वन्यजीव व्यवस्थापनात अनेक सुधारणा झालेल्या आहेत. संरक्षित क्षेत्रात सुद्धा वाढ झालेली आहे त्यामुळे वाघासोबतच इतर वन्य प्राण्यांची संख्या सुद्धा वाढलेली आहे. यासोबत विकासाच्या योजना व इतर कारणांनी होत असलेले विखंडनीकरण, मानवी लोकसंख्येत होत असलेली वाढ या कारणाने मानव-वन्यजीव संघर्ष दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. या संघर्षाची सद्यस्थिती आणि संघर्षावर शासनाच्या वतीने केल्या जाणाऱ्या उपाययोजना यांचे संकलन केले आहे वन परिक्षेत्र अधिकारी **श्री. धीरज ढेंबरे** यांनी..

## ५७ अर्जुन/आजन



आयुर्वेदामध्ये अर्जुन या झाडाला खूप मोठे महत्त्व आहे. शरीराच्या विविध व्याधींवर विशेषतः हृदयरोगावर अर्जुन हे रामबाण औषध मानले जाते. पर्यावरणात देखील अर्जुनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. विभागीय वन अधिकारी **श्रीमती गीता नन्नावरे** यांनी अर्जुनाच्या झाडाबद्दल अधिक माहिती या सदरात दिलेली आहे.



## अरवलीच्या व्याघ्र वस्तीतील भटकंती ५९

वन्यजीव लेखक **श्री. अतुल धामणकर...** भारतातली बहुतांश संरक्षित क्षेत्रे अक्षरशः पालथी घातलेले व्यक्तिमत्त्व. या सदरातून भारतातल्या वेगवेगळ्या व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये याची माहिती आपल्याला या सदरातून मिळणार आहे. अरवली पर्वतात विसावलेल्या रणथंबोर व्याघ्र प्रकल्पाची भ्रमंती या महिन्यात आपल्याला करता येणार आहे.

## ६५ शिकारभूमी ते खवलेमांजर संवर्धकभूमी कडील प्रवास



सदरची यशोगाथा ही, महाराष्ट्रातील पश्चिम घाटात वसलेल्या जैवविविधत संपन्न अशा सावंतवाडी वन विभागातील, दोडामार्ग परीक्षेत्रामध्ये स्थानिक शेतकरी व नागरिकांच्या मदतीने वन विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी पृथ्वीतलावर दुर्मिळ होत चाललेल्या तसेच जगात सर्वात जास्त शिकार करुन तस्करी होत असलेल्या खवलेमांजर (Pangolin) या अद्‌भुत सस्तन प्राण्याच्या संरक्षणासाठी उचलेल्या एका छोट्याशा पाऊलाचे संक्षिप्त वर्णन आहे. क्षेत्रीय स्तरावर खवले मांजर च्या संवर्धनासाठी केलेल्या कामाची माहिती वन परिक्षेत्र अधिकारी **श्री. मदन क्षीरसागर** यांनी दिली आहे.



## स्टेट ऑफ इंडियन बर्ड्स २०२३ च्या अहवालाची मीमांसा ६८

महाराष्ट्रासह सर्वच राज्यांमध्ये सर्वदूर आढळणाऱ्या पाणभिंगरी (Small Pratincole), कंठेरी चिखल्या (Little ringed plover), मोठा करवानक (Great Thick knee) तसेच आर्क्टिकमधून स्थलांतरित लिटल टर्न अशा पक्ष्यांच्या प्रमुख प्रजातींची संख्या गेल्या काही वर्षांमध्ये 50 ते 80 टक्के घटली असून वेळीच दखल घेतली नाही तर हे छोट्या आकाराचे देखणे पक्षी लुप्त होतील, अशी भीती स्टेट ऑफ इंडियाज बर्ड्स (SoIB) अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. या चार छोट्या पक्ष्यांशिवाय माळढोक (Great Indian Bustard), तणमोर (Lesser florican) या गवताळ प्रदेशातील पक्ष्यांनाही मोठा धोका निर्माण झाला आहे. संकलन आणि मीमांसा वन परिक्षेत्र अधिकारी **श्री. राहुल शिंदे** यांनी केली

## ७२ आयर्नमॅन.... एक सत्यात उतरलेलं स्वप्न !



आयर्नमॅन ही जागतिक स्तरावरील सर्वाधिक कठीण समजल्या जाणाऱ्या मानवाच्या शारीरिक व मानसिक क्षमतेची परीक्षा बघणारी एक जागतिक स्पर्धा आहे. जगात अनेक ठिकाणी या स्पर्धेचे आयोजन केले जाते परंतु भारतात मागील तीन वर्षांपासून फक्त गोव्यात ही स्पर्धा होते. यात 1.9 किमी समुद्रात स्विमिंग, लगेच 90 किमी सायकलिंग व त्यापाठोपाठ 21.1 किमी रनिंग करायची असते. जगात इतरत्र होणाऱ्या आयर्नमॅन स्पर्धांपेक्षा गोवा आयर्नमॅन 70.3 ही स्पर्धा अधिक कठीण समजली जाते. ऑक्टोबर 2023 मध्ये ही स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण करून वन परिक्षेत्र अधिकारी **श्री. मनोज बारबोले** आयर्नमॅन बनले. त्यांच्या आयर्नमॅन बनण्याचा संघर्षाची कथा त्यांच्याच शब्दात...

# अंतरंग



## लेपर्ड लेडी ७२

आपल्या वन कारकिर्दीच्या पहिल्याच नियुक्तीमध्ये बिबट रेस्क्यू चे अनेक प्रसंग यांच्यावर आले मात्र त्या डगमगल्या नाहीत. उलट पुढच्या प्रत्येक अडचणीच्या रेस्क्यू वेळी त्या अधिक निडर आणि कणखर होत गेल्या. वन परिक्षेत्र अधिकारी **कु. प्रियांका लगड** यांनी आपल्या पहिल्या वहिल्या बिबट रेस्क्यु चे अनुभव येथे मांडले आहेत. विशेष म्हणजे पुढच्या चार वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी 36 च्या वर बिबट यशस्वीपणे रेस्क्यू करून दाखवले. या कारणाने त्यांना लेपर्ड लेडी सन्मानाने म्हटले जाते.

## ७५ वन महिलांचं हक्काचं व्यासपीठ: एक्सप्लोरिंग वुमनहुड फाऊंडेशन



वन आणि वन्यजीव क्षेत्रात काम करणाऱ्या महिला अधिकारी आणि कर्मचारी यांच्या हक्काचं व्यासपीठ म्हणजे ' एक्सप्लोरिंग वूमेनहुड फाऊंडेशन.' 2019 पासून वन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांना वन दुर्गा पुरस्कार देऊन गौरवलं जातं, त्यांचा सन्मान केला जातो. याशिवाय बरेच वेगवेगळे उपक्रम राबवून महिलांना प्रेरित केलं जातं. एक्सप्लोरिंग वूमेनहुड फाऊंडेशन बद्दल अधिक माहिती देत आहेत फाऊंडेशन च्या संचालिका **सौ. दिपाली अतुल देवकर.**



## बांबु लागवड - शेतकऱ्यांसाठी वरदान ८२

सातारा सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातुन रोपवन कामे- रस्ता दुतर्फा, कालवा दुतर्फा, गटलागवड, रोपवाटीका निर्मिती, उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान निर्मिती, कन्या वन समृध्दी योजना वृक्षाची जोपासना हिच निसर्गाची उपासना, छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार योजना, प्रचार प्रसिध्दी, राष्ट्रीय हरित सेना योजना तसेच मग्रारोहयो अंतर्गत शेतकऱ्यांच्या बांधावर व शेतावर वृक्षलागवड इत्यदी योजना राबविण्यात येतात. या लेखाच्या माध्यमातून महत्वाकांक्षी बांबू लागवड योजनेची माहिती दिली आहे विभागीय वन अधिकारी **श्री. हरिश्चंद्र वाघमोडे** यांनी.




महाराष्ट्र रेंजर च्या प्रसिध्दी पत्रकाचे प्रकाशन करताना मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे, राज्य उत्पादन शुल्क तथा पालकमंत्री सातारा ना.शंभुराज देसाई व मा.संपादक राहुल ताटे.

**'महाराष्ट्र रेंजर'च्या प्रसिध्दी पत्रकाचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.एकनाथजी शिंदे यांचे शुभहस्ते प्रकाशन**













# राज्य वन्यजीव कृती आराखडा राज्यातील वन्यजीव संवर्धनाकरिता दिशादर्शक

**श्री. नितीन काकोडकर**
प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव)(निवृत्त), महाराष्ट्र राज्य

राज्य वन्यजीव कृती आराखडा हा राज्य वन्यजीव मंडळाने त्यांच्या दिनांक 12 ऑक्टोबर 2021 च्या 17 व्या सभेत मान्य केलेला असून राज्य शासनाने 25 मे 2022 च्या शासन निर्णयान्वये सदर राज्य वन्यजीव कृती आराखडा (2021 ते 2031) शासन मान्य केलेला आहे. राज्यातील वन्यजीव संवर्धन योग्य प्रकारे होण्यासाठी राज्य वन्यजीव अभयारण्य कृती आराखड्यात दिलेल्या प्रकल्पांची अंमलबजावणी केल्यास महाराष्ट्र राज्यात वन्यजीव संवर्धन क्षेत्रात भेडसावणारे प्रश्न मार्गी लागू शकतील. या राज्य वन्यजीव कृती आराखड्याची रुपरेषा आणि त्यातील अंतर्भूत गोष्टी याबाबत राज्याचे माजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) आणि जेष्ठ वन्यजीव तज्ञ श्री. नितीन काकोडकर यांनी अधिक माहिती दिली आहे.

राष्ट्रीय स्तरावर आज पर्यन्त 3 वेळ राष्ट्रीय वन्यजीव कृती आराखडा तयार करण्यात आला असून सध्या अस्तित्वात असलेला राष्ट्रीय वन्यजीव कृती आराखडा हा सन 2017 मध्ये घोषित करण्यात आला आहे. परंतु प्रत्येक राज्यातील वन्यजीव संवर्धनाची स्थिती, तेथील समस्या, तेथील भौगोलिक परिस्थिति, राज्यात आढळणारे वन्यजीव, तेथील पर्जन्यमान इत्यादि परिस्थितिला अनुसरुन राज्याचा स्वतंत्र वन्यजीव कृती आराखडा तयार करणे गरजेचे होते. आता पर्यन्त कोणत्याही राज्याने आपला स्वतंत्र वन्यजीव कृती आराखडा तयार केलेला नाही ही बाब लक्षात घेऊन सन 2021 मध्ये महाराष्ट्र राज्याचा एक स्वतंत्र असा वन्यजीव कृती आराखडा असावा असे ठरले. अर्थातच हा राज्य वन्यजीव कृती आराखडा राष्ट्रीय वन्यजीव कृती आराखडा हा आधारभूत मानुनच तयार करण्याचे ठरले.

एकंदर विषयांची व्याप्ती पाहता सदर आराखडा तयार करण्याकरिता विविध विषयातील तज्ञ व्यक्तींचा सहभाग घेणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने ह्या विषयांवर काम करणाऱ्या संस्था, तज्ञ व्यक्ति, राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य, वन विभागातील निवृत्त व कार्यरत अनुभवी व विविध स्तरातील अधिकारी तसेच भारतीय वन्यजीव संस्थेतील तज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्यात आली. त्या नंतर 12 विविध विषयांची प्रारूप प्रकरणे तयार करण्याकरिता 12 समित्या गठित करण्यात आल्या व प्रत्येक समिती करिता एक समन्वय अधिकारी नेमण्यात आला. ह्या समित्यांना विशिष्ट प्रकरणांचे प्रारूप तयार करण्याची जवाबदारी देण्यात आली. ह्या मध्ये अशीही मुभा देण्यात आली कि एखाद्या समिती सदस्याला दुसऱ्या समितीतील विषयावर आपले विचार द्यावयाचे असल्यास त्यांनी त्या समितीतील समन्वय अधिकाऱ्याशी संपर्क साधून त्यांच्या सूचना द्याव्यात. एकंदर हा आराखडा तयार करताना तो सर्वांच्या सहभागाने तयार व्हावा ही संकल्पना होती.

**समित्याना देण्यात आलेले विषय खालील प्रमाणे होते:**

1) विलुप्त होणाऱ्या प्रजातींचे संवर्धन.
2) अवैध वन्यजीव व्यापार व शिकारीवर नियंत्रण.
3) मानव वन्यजीव संघर्षाचे शमन व बचाव.
4) वन्यजीव स्वास्थ्य व्यवस्थापन.
5) अंतर्गत जलीय प्रणालीचे (पाणस्थळांचे) संवर्धन.
6) तटिय व सागरी परिसंस्थांचे संवर्धन.
7) वन्यजीव क्षेत्रातील पर्यटनाचे व्यवस्थापन.
8) संवर्धनाबाबत जागरूकता वाढविणे व त्याचा प्रसार.
9) वन्यजीव संवर्धनात लोकांचा सहभाग.
10) वन्यजीव संशोधन व सनियंत्रणाचे बळकटीकरण.
11) वन्यजीव क्षेत्राकरिता शाश्वत निधी मिळविणे व राज्य वन्यजीव कृती आराखडा ह्यातील तरतुदींची इतर क्षेत्रातील कार्यक्रमांशी सांगड घालणे.
12) महाराष्ट्र राज्यातील संरक्षित क्षेत्रांची व्याप्ती बळकट करणे आणि वाढविणे.

अशा प्रकारे विविध विषयांवर सर्व समित्यांकडून आलेल्या सूचना विचारात घेऊन पुढील प्रारूप तयार करण्याकरिता एक वन्यजीव कृती आराखडा Drafting Committee प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) व मुख्य वन्यजीव रक्षक ह्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली.

ह्या समितीचे सदस्य सचिव म्हणून डॉ. रवीकिरण गोवेकर ह्यांना जबाबदारी देण्यात आली तसेच इतर सदस्य म्हणून वन विभागातील प्रधान मुख्य वनसंरक्षक दर्जा असलेले दोन अधिकारी श्री. एन वसुदेवन व श्री. एम. के. राव, राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य श्री. बिट्टू सहगल, श्री. किशोर रिठे व डॉ. अनिश अंधेरीया, भारतीय वन्यजीव संस्थेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बिलाल हबिब आणि वन्यजीव संरक्षण सोसायटी ऑफ इंडियाचे श्री. नितिन देसाई ह्यांना घेण्यात आले. त्याच प्रमाणे वन्यजीव स्वास्थ्य व्यवस्थापन ह्या प्रकरणाचे अंतिमिकरण करण्याकरिता भारतीय वन्यजीव संस्थेतील डॉ. पराग निगम ह्यांचे व विलुप्त होणाऱ्या प्रजातींचे संवर्धन ह्या प्रकरणाकरीता ज्येष्ठ वर्गीकरण शास्त्रज्ञ डॉ. मिलिंद सरदेसाई ह्यांचे विशेष सहकार्य घेण्यात आले.

त्याच प्रमाणे प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव कार्यालयातील अधिकारी श्री. सुनील बानुबाकोडे व श्री. युवराज ह्यांनी राज्य वन्यजीव कृती आराखडा तयार करण्यात विशेष सहकार्य दिले. राज्य वन्यजीव कृती आराखडा तयार झाल्यावर तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक व वनबल प्रमुख श्री. जी. साईप्रकाश ह्यांनी सुचविलेले बदल अंतर्भूत करण्यात आले.

सदर राज्य वन्यजीव कृती आराखडा हा एकूण 10 वर्षाकरीता आखण्यात आला असून प्रत्येक विषयाच्या प्रकरणामध्ये खालील प्रमाणे एकूण 3 भाग करण्यात आले आहेत:

1) विषयाचा आढावा, सद्यपरिस्थिति आणि उदिष्ट.

2) सदर उदिष्टपूर्ती करिता आवश्यक कृती.

3) प्रत्येक आवश्यक कृती पूर्णत्वास नेण्याकरीता कृतीनिहाय घ्यावयाचे प्रकल्प (Priority Projects)

प्रत्येक प्रकल्पाकरिता लागणारा कालावधी व सदर प्रकल्प पूर्णत्वास नेण्याकरिता जबाबदार व्यक्ति, कार्यालय किंवा संस्था ह्याचा देखील स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे.

सदर राज्य वन्यजीव कृती आराखडा राज्य वन्यजीव मंडळाने त्यांच्या दिनांक 12 ऑक्टोबर 2021 च्या 17 व्या सभेत मान्य केला असून राज्य शासनाने 25 मे 2022 च्या शासन निर्णयान्वये राज्य वन्यजीव कृती आराखडा (2021-2031) शासन मान्य केला आहे. राज्य वन्यजीव कृती आराखडा अंमलबजावणीवर सनियंत्रण ठेवण्याकरीता मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक राज्यस्तरिय सनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख) ह्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वन्यजीव कृती आराखडा सनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

राज्यातील वन्यजीव संवर्धन योग्य प्रकारे होण्यास राज्य वन्यजीव कृती आराखडा मध्ये दिलेल्या प्रकल्पांची अंमलबजावणी केल्यास महाराष्ट्र राज्यात वन्यजीव संवर्धनात भेडसवणारे प्रश्न मार्गी लागू शकतील. आपल्या राज्यात वन्यजीव संवर्धनामध्ये अनेक चांगले प्रकल्प घेण्यात आले आहेत आणि देशातील वन्यजीव क्षेत्रात उत्तम काम करणाऱ्या राज्यात महाराष्ट्राला मानाचे स्थान आहे. ते अबाधित राहावे व आपल्या राज्यातील समृद्ध जैव विविधतेची जपणूक व्हावी हीच सदिच्छा.

◆ ◆ ◆

# कुणा एकाची अरण्यगाथा

**श्री. सुनील लिमये**
प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव)(निवृत्त), महाराष्ट्र राज्य

जंगलातला रांगडा अधिकारी असं जेव्हा कोणी म्हणतं तेव्हा आपसूक सगळ्यांच्या नजरेत एकच चेहरा उभा राहतो तो म्हणजे राज्याचे माजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) श्री. सुनील लिमये...नुकतेच लिमये सर या पदावरून निवृत्त झाले आहेत, आपल्या 34 वर्षांच्या वनकारकिर्दीत आलेल्या कडू- गोड आठवणी ते आपल्या समोर आपल्या खुमासदार शैलीत मांडत आहेत **लिमये उवाच** या विशेष सदरातून...



पुनश्च हरीओम....

आयुष्याच्या या वळणावर मागे वळून पाहताना अनेक आठवणी आता मनासमोर उभ्या ठाकल्या आहेत. आजवर मी माझ्या आवडत्या विषयात काम केलं. माझं मन जिथे रमतं अशा वनविभागात मला नोकरी करायला मिळाली हे खरं तर सुदैवच. काम करत असताना, विविध कारणास्तव जंगलात भटकत असताना मला अनेक बरेवाईट अनुभव आले. हे अनुभव लिखाणाच्या माध्यमातून मांडण्यासाठी सुरवात करा असा जेव्हा मंगेश चा मला भ्रमणध्वनी आला की सर आपण महाराष्ट्र रेंजर साथीच्या निमित्ताने लिहायला सुरु करा तेव्हा मी खर तर पुन्हा ते निसर्गाच्या सहवासातले दिवस आठवायला, पुन्हा नव्याने हे दिवस जगायला सुरुवात केली आहे असं म्हणलं तर वावगं ठरणार नाही.निवृत्त होऊन मला आता जवळजवळ तेरा महिने होऊन गेले आहेत. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात मी महाराष्ट्र राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) या पदावरून निवृत्त झालो. या पदावर मी सव्वा वर्ष काम केलं. निसर्गाकिडे आकृष्ट असेललं माझं मन मात्र काही निवृत्त झालं नाही. अधिक काहीतरी करायची एक उर्मी मनात दाटलेली होती. अनेक निसर्ग संस्थांना संलग्नपणे मी काम करायचं ठरवलं. त्याप्रमाणे सुरुवातही केली. माझ्या अनेक मित्रांचं मत होतं की माझ्यापाशी जो अनुभव जमा झाला आहे तो मी लिखितस्वरूपात उतरवावा. माझे अनुभव काहींना मार्गदर्शक ठरतील असंही अनेकांचं म्हणणं होतं. मार्गदर्शन वगैरे खरं तर मला माहित नाही, पण मी मात्र तुकोबांच्या 'शब्द वाटू धन जन लोका' या उक्तीप्रमाणे माझे हे अनुभव वाटणार आहे व किमान आज त्याच्या लिखाणास सुरुवात तरी केली आहे.

मी 34 वर्ष महाराष्ट्र राज्य वनविभागात नोकरी केली. मी अंतर्बाह्य ओळखत असलेला वनविभाग आणि लोकांच्या नजरेतून वनविभाग यात जमीन अस्मानाचं अंतर आहे. वनविभागात काम करताना अधिकारी फारसे वनविभागाच्या कामांविषयी बोलत नाहीत. आणि प्रत्येक काम त्यांनी जाहीररीत्या सांगणं संयुक्तिकही ठरणार नाही. त्यामुळे या विभागाभोवती एक प्रकारचं गूढ तयार झालेलं आहे. किंबहुना अनेक लोकांच्या मते वनविभाग हा काहीच काम करत नाही. लोकांच्या वावरात वाघ येवो वा हत्ती त्याला वनविभागच जबाबदार आहे अशी सर्वसामान्य लोकांची धारणा असते. याशिवाय वनविभागाने कसे काम केले





पाहिजे ह्या बाबत अनेक लोकं अनाहूत सल्लेही देत असतात. हे सर्व चूक असं मी अजिबात म्हणणार नाही. अगदी सरकारने ज्या चित्त्यांच्या पुनःपरिचयाचा प्रयत्न केला त्याबाबतही अनेक लोकांच्या मनात संभ्रम आहे. वनविभागाला काहीही कळत नाही या चालीवर हा प्रयोग कसा चुकीचा आहे हे अनेक अभ्यासक ते अगदी स्वयंघोषित तज्ञ असे अनेकजण सांगत असतात. पण वनविभागाच्या अधिकाऱ्यांची याबद्दल काय मतं आहेत, त्यांनी यामागे काय अभ्यास केला आहे हे जाणून घेण्याचा मात्र कोणीही प्रयत्न करत नाही. त्यामुळे वनविभाग नक्की कसं काम करतो हे सांगण्याचा प्रयत्न मी यापुढे करणार आहे.

1973 साली 'प्रोजेक्ट टायगर' या प्रकल्पाची स्थापना तत्कालीन पंतप्रधान स्व. इंदिराजी गांधी यांच्याकडून करण्यात आली. त्यावेळेची एकूण वाघांची संख्या आणि एकूण वनक्षेत्र लक्षात घेता असा प्रकल्प सुरु करणे आवश्यकच होते. त्याचबरोबर वन्यजीव संरक्षण कायद्यासारखा अतिशय क्रांतिकारी कायदाही त्याच वर्षी अस्तित्त्वात आला. आज आपण पाहत असलेल्या व्याघ्र संख्येचा खरंतर तो पाया म्हणावा लागेल. त्यावेळी देशभरात 9 व्याघ्र प्रकल्पांपासून आपण सुरु केलेला व्याघ्रसंवर्धनाचा प्रयत्न आज 53 व्याघ्र प्रकल्पांपर्यंत पोहोचला आहे. तर व्याघ्रसंख्याही सुमारे 1827 वरून सुमारे 3682 पर्यंत पोहोचली आहे. हे यश काही एका दिवसात जादूची कांडी फिरवावी तसं मिळालेलं नाही. यामागे

वनविभागाचे असंख्य कष्ट आहेत ज्यांच्याबद्दल भाष्य होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातही 1973 साली मेळघाट हा केवळ एक व्याघ्र प्रकल्प होता. पण आज हीच संख्या सहावर पोहोचली आहे. महाराष्ट्रातली व्याघ्रसंख्याही सुमारे 444 एवढी म्हणजेचचांगलीच वाढलेली आहे.

याशिवाय वनसंपदेच्या वाढीसाठीही वनविभाग सातत्याने प्रयत्न करत आहे. निसर्गाच्या सोबतीने शाश्वत विकास हेच कायम आपले धोरण राहिलेले आहे. याच दृष्टीने वनविभाग निरनिराळे उपक्रम राबवत असतो. काही जंगलभागातील व्याघ्र संख्या वाढल्यावर आपण ताडोबातील दोन वाघिणींच्या स्थानांतरणाचा प्रयोगही नुकताच राबवला. यात आपण दोन वाघिणींना नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या नागझिरा अभयारण्यात सोडले व आता सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात ही 8 वाघ स्थानांतरित करणार आहोत जेणे करूनयेथे कमी असलेली व्याघ्र संख्या वाढावी आणि वाघांच्या संख्येच्या दृष्टीने एकाच भूप्रदेशावर असलेला दबाव कमी व्हावा हा यामागचा उद्देश होता. मात्र नागझिऱ्यात सोडलेली एक वाघीण नागझिऱ्याचा प्रदेश सोडून थेट मध्य प्रदेशापर्यंत जाऊन पोहोचली. यानंतरही अनेकांनी वनविभागाचं कसं चुकलंय यावर उहापोह केला.पण वनविभागाने हे का केले ते जाणून घ्यायचा प्रयत्नही केला नाही.तसं बघायला गेलं तर लिहायचा कंटाळा हे आज पर्यंत न लिहण्याचे माझे एकमेव कारण होते. पण माझा मित्र ओंकार बापट मला म्हणाला सर तुम्ही लिहा, मी तुम्हाला शब्दांकनात मदत करतो व त्यात मंगेशचा ही भ्रमणध्वनी आला. वनविभागात काम केल्यामुळे एक अधिकारी म्हणून वनविभागाबद्दल जे अधिकारवाणीने मी लिहू शकेन तितके कदाचित सामान्य माणूस लिहू शकणार नाही असेही अनेकांचे मत पडले. त्यामुळेच मी आता यापुढे लिखाणाचे शिवधनुष्य पेलण्याचा प्रयत्न करणार आहे. लिखाणापेक्षा त्या तुमच्याशी मारलेल्या गप्पा असाव्यात असाच माझा प्रयत्न असणार आहे. यावेळी तुम्हाला कदाचित माझी काही मते पटतील, काही पटणार नाहीत. माझ्याशी कदाचित काही बोलावसं वाटेल. तुमच्या प्रतिक्रिया द्याव्याश्या वाटतील. त्या माझ्यापर्यंत जरूर पोहोचवा.

लिखाणाच्या माध्यमातून पुन्हा निसर्गाकडे जाण्याच्या माझ्या या प्रवासाची ही नवी सुरूवात आहे. निसर्गाने आजपर्यंत मला जे शिकवलं ते दिमतीला घेऊन मी हा नवा रस्ता धुंडाळणार आहे. माझ्या आजवरच्या आयुष्यात मी अनेक जंगलं अक्षरशः पायी तुडवली. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात मनसोक्त भटकलो. अनेक गडकिल्ले सर केले. महाराष्ट्रातलेच नव्हे तर देशातलेही अनेक जंगलभाग पालथे घातले. वनविभागाचे काम मांडताना माझं आरण्यक उलगडण्याचाही मी या निमित्ताने प्रयत्न करणार आहे. निसर्गाने माझं जीवन खरोखरंच समृद्ध केलं. त्याच निसर्गाचे नाव घेऊन या नवीन उपक्रमाची सुरुवात करतो व तुम्हा सर्वांना ह्या महाराष्ट्र रेंजर मधून भेटायचा प्रयत्न करेन.

निसर्गाय नमः॥

(शब्दांकन – ओंकार पांडुरंग बापट)

◆ ◆ ◆



# वनांच्या आणि गुरांच्या वेदना

**श्री.किशोर रिठे**
**संचालक,**
**बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी**

भारतात 2022 पर्यंत गुरांची संख्या ही 308 दशलक्ष इतकी प्रचंड असून भारत हा जगातील सर्वात जास्त पशुधन असलेला देश आहे. संरक्षित क्षेत्राच्या बाजूला लागून असलेल्या गावातील आणि जंगला शेजारील बहुतांश पशुधन हे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे जंगलावर अवलंबून असते. वाढत्या पशुधनाचा जंगलावर होणारा विपरीत परिणाम आणि त्याच्यावर करता येणाऱ्या उपाययोजना या अनुभवाच्या माध्यमातून श्री. किशोर रिठे (संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी) यांनी मांडल्या आहेत.



माझ्या आजोळी पूर्वी गुरे होती. काही गायी, वासरं आणि त्यांचेच पुढे बनलेले बैल! गायींवर सगळ्यांचं मोठं प्रेम ! शाळकरी लहान मावशी मारक्या 'मंजूला' भारी लळा लावायची! या मावशीवर सगळ्यांचा राग. कारण काय तर 'मंजू' दूध न देणारी! दुसरी गाय 'मोगरा' ती लोटाभर दूध द्यायची. त्या लिटरभर दुधावर दिवसभराचा चहा व्हायचा! घरातला प्रत्येकजण मोगराला येता-जाता मूठभर चारा टाकायचा.

दुभत्या मोगरासाठी शेताच्या बांधावरचा हिरवा चारा यायचा! तिच्यानिमित्ताने इतरांनाही हिरवा चारा मिळायचा! शेतीत कष्ट उपसायचे. अगदी सूर्य मावळेपर्यंत शेताच्या प्रत्येक कोपऱ्यावर नजर ठेवून डोक्यात नेमून ठेवलेलं काम करायचं आणि पुन्हा घरी परतताना डोक्यावर किंवा बंडीत चाऱ्याची पेंडी घेऊन जायची. मिळणारं जेमतेम दूध व सुरुवातीच्या एक- दोन कालवडी यातील आनंदापेक्षा या गुरांना पोसण्याची मेहनत डोईजड होऊ लागली तसं माझ्या आजोळचं गोधन कमी झालं!

माझ्या आजोळची ती परिस्थिती मी आज गावागावात पाहातो. आपलंजनावर गोठ्यात मेलं तर चालेल पण कसायाला विकणार नाही असे म्हणणारे शेतकरी बांधव जड अंत:करणाने गायी कसायाला विकत आहेत. कृषिप्रधान देशाचे नागरिक म्हणविणारे आम्ही उघड्या डोळ्यांनी हे बघतो आहोत. 'पाऊच' वाले कृत्रिम, कधी-कधी भेसळयुक्त, चार-पाच दिवसांचे शिळे दूध पिणारे आम्ही शहरी या गायींच्या वेदनांना समजणाऱ्या जाणकारांना 'धर्म' वगैरेचा रंग चढवितो.

गप्पा मंगळावर वसाहत करण्याच्या, देशाला सशक्त बनविण्याच्या, पण शेतीला शेणखताचे टॉनिक पुरविणाऱ्या गोधनाच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्याची कुवत मात्र 120 कोटींच्या देशात संपलेली! गोपालकांचे साधे प्रश्न आहेत. गुरांना माणसांप्रमाणेच फक्त दोन वेळ चारा हवा, दिवसभर नव्हे. सकाळ- संध्याकाळ चारा व दिवसभर गव्हाणीत पाणी. अन्नासाठी वन- वन भटकविण्यापेक्षा बंदिस्त किंवा खुल्या जागेत चारा पाणी मिळणे एवढी रास्त अपेक्षा या गुरांची असते. नवरा- बायको दोघेही नोकरीवर असणारे जसे आपल्या मुलांना पाळणाघर किंवा नोकराणीकडे ठेवतात, तसे बहुतांश गोपालक आता वागायला लागलेत. गुरांवर वेळ देण्यापेक्षा त्यांना गुराख्याच्या हवाली करायचं व मोकळं व्हायचं!

प्रत्येक जंगलामध्ये किती चारा आहे व किती गुरे त्यामध्ये चरू शकतात हे वनखात्याला माहिती असते. प्रत्येक वनक्षेत्राचा एक चराई जमाबंदी अहवालच तयार झालेला असतो, व त्यात हे नमूद केलेले असते. वनाने वेढलेल्या गावांमध्ये वनखाते या चराई अहवालानुसार गुरांना मोफत चराई परवाने वाटते. काठेवाडी गुरांना परवाने मिळत नाहीत. यामध्ये जंगलातील कटाई झालेल्या कुपांनाही वगळण्यात येते. कटाईनंतर येणारे फुटवे किंवा विरळ जंगलात रोपांचे होणारे नैसर्गिक पुनरुत्पादन गुरांनी फस्त करू नये म्हणून ! शासनाने 2 ऑगस्ट 1971 रोजी महाराष्ट्रातील जंगलांचे वर्गीकरण करून चराई परवाने देण्याचे निकष ठरवून दिले आहेत. शेतकऱ्यांच्या शेतीसाठी व दूधदुभत्यासाठी जास्तीत जास्त प्रती शेतकरी चार घटक गुरांना मोफत चराई परवाना देण्यात येतो. भूमीहीन शेतकऱ्यालाही चार घटक गुरांचा मोफत चराई परवाना मिळतो. घटकाच्या व्याख्येनुसार म्हशीला दोन घटक मानले जाते तर गाय, वगार व बैल ही प्रत्येकी एक घटक, वासरू अर्धा घटक तर एका मेंढीस एक घटक समजले जाते. जंगलाच्या चराई क्षमतेनुसार हे परवाने वाटले जात असले व ठरावीक काळासाठीच ही चराई परवानगी असली, तरी प्रत्यक्षात मात्र हे तंतोतंत पाळले जात नाही.



यातून अनिर्बंध चराई होते. गावाच्या वेशीतील व त्याबाहेरच्या वनातील गवत संपतं. जमीन घट्ट होऊन तेथे रायमुनिआ, तरोटा, रानतुळस येते. गुरांसाठी राखलेली गावाच्या वेशीजवळची गायरानं त्यामुळे केव्हाची संपली. आता त्या गायरानांचे तुकडे गुरांऐवजी मतदारांच्या म्होरक्यांना देण्यासाठी आमदार धडपडताहेत. वाळला चारा मिळणं जेथे कठीण तेथे गुरांना ओला चारा तोही उन्हाळ्यात मिळणार कसा? गोधन फळणार कसं? 'भाकड' जनावरं सशक्त होणार कशी ? आज भारतात 17060 लाख टन एवढ्या चाऱ्याची गरज असताना प्रत्यक्षात 8660 लाख टन एवढाच चारा उपलब्ध आहे. गुरांची चाऱ्यासाठीची भटकंती गुरांना कत्तलखान्यांपर्यंत नेऊन सोडणारी आहे. वनक्षेत्रांवरील वाढत्या दबावामुळे होणाऱ्या निर्वनीकरणाच्या प्रक्रियेमुळे या वनाच्छादित प्रदेशांमध्ये शेतीनजीकचे जलस्रोत झपाट्याने आटत आहेत.

पाण्याचं दुर्भिक्ष पाहून टँकरचा 'धंदा' मांडलेल्या लहान राजकारण्यांच्या एक पाऊल पुढे जाऊन शुद्ध दुधाचा तुटवडा पाहून राजकीय नेत्यांनी कृत्रिम दुधाचे व्यवसाय उभारले. दुधाच्या हौदात चार थेंब प्रीझरवेटिव्ह टाकून चार दिवस पुढची तारीख पाऊचवर चढवून दूध ब्रँड नावाने मुंबई- पुण्यासह इतर शहरांमध्ये पोचू लागलं. गोपालक मेला तरी चालेल पण 'ब्रँड' वाचले पाहिजेत. 'उद्योग मेला तर महाराष्ट्रात बेकारी येणार नाही काय? ' तुम्ही आम्ही, सर्वच झेंड्यांच्या सत्ताधाऱ्यांचा हा 'जीवघेणा खेळ 60-70 वर्षांपासून पाहात आलो. गुरांच्या चाऱ्याचे शेतातील धुरे कमी झाले. गायरानं मतदारांच्या म्होरक्यांनी फस्त केली व आता वनखात्याच्या अखत्यारीतील वनांमधील गवत संपलं!

पावसाळ्याच्या तोंडावर हिरवळ वाढण्यापूर्वीच इतर राज्यांमधील गुरे महाराष्ट्राकडे पद्धतशीरपणे कूच करू लागतात. यात प्रामुख्याने मेंढ्या तांड्यासह महाराष्ट्रात येतात. अलीकडे राजस्थानातून उंटवाले हक्काने महाराष्ट्रात यायला लागले आहेत. गुजराथ मधून आलेले काठेवाडी तर महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी 'हेटी'

वसवून स्थायिक झाले आहेत. दरवर्षीच्या त्रासदायक स्थलांतरापेक्षा आता त्यांनी 'अख्खा महाराष्ट्र आपुला म्हणून गावगावानजीकच्या 'हेट्यांमध्ये' बस्तान जमविले आहे. आदरातिथ्यासाठी साऱ्या भारतभर प्रसिद्ध असणाऱ्या आम्हा महाराष्ट्रीय माणसांनी काठेवाडी गुरांचे आक्रमण वैचारिक दृष्ट्या पचविले आहे. काही ठिकाणी तर यातून 'हेटी' व 'वस्ती' वाल्यांमध्ये वादही झाले आहेत. बऱ्याच गावांमध्ये आता काठेवाड्यांनी मराठी माणसांवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. अमरावती जिल्ह्यात काठेवाडी हेट्यांची व त्यांच्या गुरांची संख्या लक्षणीय आहे. महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींनी काठेवाडी बांधवांना सर्वधर्मसमभाव, बंधुभाव या आदर्श कल्पना लक्षात घेऊन, रेशनकार्ड व मतदानाचा हक्कही प्रदान केला आहे. मराठी माणसापेक्षा किंबहुना जास्त 'संघटित' असणाऱ्या या 'काठेवाडी हेटी' आता मतपेट्या व पैशाच्या भरवशावर मराठी माणसावरच राज्य करीत आहेत. आमच्या इथल्या दूध व्यापाऱ्यांना, दूध पुरवठा करून त्यांनी सहानुभूती मिळविली आहे. तर दुधाचा पैसा व मते पुरवून आमच्या राजकारण्यांची मनेही त्यांनी सांभाळली आहेत. असा हा बंधूभाव व काठेवाडीचे महाराष्ट्रात होत असलेले लाड पाहाता राजस्थानातून आता उंटवाल्याचे व मेंढपाळांचे लोंढेही येथे स्थायिक होण्याचा विचार करीत आहेत. आमच्या गुरांच्या तोंडचे गवत परप्रांतीय गुरे हिसकत आहेत.

महाराष्ट्रातील पडीक जमिनी, कुरणे, माळराने ह्या परप्रांतीय गुरांची आक्रमणे किती दिवस सोसणार? असंख्य गुरांच्या अनिर्बंध चराईमुळे व गुरांच्या खुरांमुळे जमिनीवरील मातीचा थर घट्ट होऊन गवताची उंची खुंटण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आमच्या येथील जमिनी, कुरणे, माळराने ओसाड पडत आहेत. ती दिवसेंदिवस वाढत आहेत. गवती रमण्यांचे अस्तित्व आता या पगडीवाल्यांच्या नजरेपासून दूर असलेल्या पट्ट्यांमध्येच पाहायला मिळते. त्यामुळे अशी चराई थांबविण्याकरिता चक्क एक शासकीय अध्यादेशच दि. 31 ऑक्टोबर 2011 रोजी काढण्यात आला आहे.

राजस्थान, गुजरात या राज्यातील गोपालक निदान महाराष्ट्रातील वनांत आपल्या गुरांना घुसवायला लागलेत. महाराष्ट्रातील गोपालक तेवढेही कष्ट नाहीत. एवढं करण्यापेक्षा आपली गुरे कसायाला विकतात. त्यामुळे कत्तलखाने घेत गुरांनी भरायला लागलेत. कारण काय तर गुरांची ताटं म्हणविणारी गायरानं व वनक्षेत्रं विराण झालीत! महाराष्ट्रातील सध्याच्या भाजपा-शिवसेना सरकारने गोहत्याबंदी कायदा आणला. पण फक्त कायदा आणून गुरांच्या हत्या थांबणार नाहीत. एकूणच गुराच्या व्यवस्थापनाकडे व चाऱ्याच्या निर्मितीकडे शासनास लक्ष देण्याची गरज आहे. कुणाला निराश करण्यासाठी म्हणून मी हे सांगत नाही. पण आपल्यात प्रवाहाच्या विरुद्ध पोहणारे काही आधुनिक गांधी आहेत. त्यांचं महत्त्व, त्यांनी केलेल्या कामाचं मोल, ही परिस्थिती मांडल्याशिवाय कळायचं नाही. असाच एक ध्येयवेडा युवक अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यात आहे. कत्तलखाण्यात जाणाऱ्या गुरांना सोडवून त्यांचं पालकत्व या युवकाने स्वीकारलं. भाकड गुरांना धष्टपुष्ट बनविले. गुरांना कसं पाळायचं यांच्या साध्या साध्या गोष्टी त्याने आत्मसात केल्या. 250 भाकड गुरांपासून 25 लिटर दूध देणाऱ्या परिस्थितीतून बाहेर येऊन या गोपालक मित्राने व्यवसाय उभारला. इंजिनीअर ते गोपालक असा प्रवास करणारे रवी पाटील त्यांचे ज्ञान आज गोपालकांना वाटताहेत! त्यांचा एकूणच प्रवास कुणालाही थक्क करणारा आहे! म्हणूनच आजच्या युवकांसाठी ते खरे हिरो आहेत. अमरावती

जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुक्यात पसरलेला मेळघाट हा पर्वतीय प्रदेश! येथे गेल्या अनेक पिढ्यांपासून गुरेचराईचा व्यवसाय करणारे गवळी बांधव राहातात.मेळघाटात फिरताना येथील गवळी बांधवांच्या व्यथा मी ऐकल्या होत्या. गोधनाला परमेश्वराप्रमाणे जपणारा हा समाज आज उन्हाळ्यात हिरवा चारा मिळत नसल्याने रडकुंडीला आलाय. एकीकडे भाकड गुरांची संख्या वाढलीय, दुसरीकडे गावानजीक जंगलातील चारा कमी झालाय. गावानजीकच्या जंगलातील गवताची जागा रायमुनिआ, रानतुळस व तरोट्याने व्यापली. चाऱ्याच्या टंचाईमुळे, संक्रांत झाली की मग हे गवळी बांधव आपली गुरे घेऊन मेळघाटाच्या पायथ्याशी येताना मेळघाटच्या जंगलाला पायदळी तुडवून उद्याचा मेळघाट होऊ पाहाणाऱ्या नैसर्गिक रोपांना फस्त करतात. गवळी बांधवांच्या गायी-म्हशींचे हे कळप हळुवार मार्गक्रमण करीत सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असणाऱ्या अंजनगाव, मोर्शी, परतवाडा या गावापर्यंत येतात. उन्हाळा कडक झाला की जंगलाच्या सावलीने परतीचा प्रवास सुरु होतो. मान्सूनपूर्वी हे गोपालक आपली गुरे घेऊन मेळघाटातील आपआपल्या गावांमध्ये परततात. एकीकडे व्याघ्र प्रकल्पांचे वन्यजीव संरक्षणाचे नियम कडक झाले. त्यामुळे गावाची सीमा ओलांडून जंगलात खोलवर चराई करण्यावर निर्बंध आलेत तर दुसरीकडे गावानजीकचा चारा संपला. या परिस्थितीने मेळघाटचा गवळी बांधव संकटात आला. या गवळी बांधवांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी रवी पाटील नावाचा गोपालक माणूस मेळघाटात येऊन गेल्याचं कळलं. मी थेट या माणसाकडे जाण्याचं ठरवलं.

अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार या तालुक्याच्या ठिकाणाहून उत्तरेकडे फक्त तीन कि. मी. अंतरावर बेसखेडा हे गाव आहे. तेथेच एका आठ एकर शेतावर रवी पाटील यांचा गुरांचा गोठा आहे. एक तिशीतला सडपातळ युवक. पायाला भिंगरी बांधल्यागत भल्या मोठ्या गोठ्याचं नियोजन रवी पाटील भराभर फिरून दाखवत होते. गुरांच्या मध्यभागी सिमेंटची बांधलेली गव्हाण, गव्हाणीच्या दोन्ही बाजूंनी सुमारे 30-40 गायी बांधलेल्या. यात गावरान गायींपासून पंजाबी सहीवाल व जर्सी,



होस्टेनपर्यंत सर्वांचाच समावेश. गोठ्यालगत उत्तरेकडे खुल्या जागेत चांगल्या प्रतीचा देखणा वळू' बांधलेला. त्याच्याच बाजूला तरुण कालवडी. नवीन जन्मलेली वासरे उनाडक्या करण्यात गुंग झालेली. गोठ्याच्या दक्षिणेकडे काही नवीन आलेल्या आजारी गायी तंदुरुस्त होऊन गोधनात समावेश होण्यासाठी आतुर झालेल्या. एवढंच नाही तर या गोधनाच्या अंगाखांद्यावर चुकून जर गोचिडासारखे परजीवी प्राणी आलेच तर त्यांना अलगद टिपण्यासाठी कोंबड्याही तयार ! काही कोंबड्या अंडे देण्यासाठी बसलेल्या तर काही दिलेल्या अंड्यांना उबविण्यासाठी बसलेल्या. गोठ्यानजीकच्या एका खोलीत रवी पाटील यांनी एक छोटेखानी दवाखानाही थाटलेला. गोठ्यामध्ये दोन्ही बाजूंनी व्यवस्थित उतार काढलेला. त्यामुळे गाईंचे गोमूत्र उताराच्या शेवटी असलेल्या नालीवाटे थेट शेणखताच्या गड्ड्यात जमा होते. त्यामुळे शेणखत व गोमूत्र यांची आंतरप्रक्रिया होऊन दोन्ही गोष्टीस चांगला भाव मिळतो.

रवी पाटील मला गोठ्याबाहेर शेतात घेऊन गेले. आठ एकर शेतापैकी तीनएकर शेतात त्यांनी बाजरी, लूसर्न, बरसिम, कांडीघास, ज्वारी व मका असा चारा लावला होता. हा हिरवा चारा पाहून रवी पाटील यांच्याबद्दलचा आदर माझ्या मनात अधिकच वाढला. आदिवासी युवकांना रोजगार देण्यासाठी बांबूपासून वस्तू बनविणाऱ्यांनीही कधी आपल्या शेतात बांबू लावल्याचं मी पाहिलं नाही. पण रवी पाटील यांनी हे खूपच नियोजनबद्ध केलं होतं. शेत क्षार पाणपट्ट्यातील असल्याने तुषार सिंचनाची म्हणजेच मायक्रो स्प्रिंकलरची व्यवस्था केली होती. आता महिन्याभरात बाजरीचा चारा येईल, दोन महिन्यांत मका तर तीन महिन्यांत ज्वारीचा ! बरसिम गवत दरवर्षी लावावं लागत. लूसने चार वर्षापर्यंत पाहावंच लागत नाही, तर कांडीघास एकदा लावलं की आयुष्यभर उत्पादन देत असतं. हिरव्या चाऱ्याचं नियोजन पाहून मी थक्क झालो.गुरांच्या त्यांच्या छोटेखानी दवाखान्याबाबत विचारलं तर पाटील म्हणाले की, हे काम पशुसंवर्धन विभागाचं. त्यांनी आमच्या गुरांच्या स्वास्थ्याची काळजी घेणं अपेक्षित आहे. पण माणसांच्याच आरोग्याची काळजी घेणाऱ्या सरकारी दवाखान्याची जिथे उपेक्षा होते तिथे गुरांचं न बोललेलंच बरं! पण त्यामुळे आम्हाला मोठा फटका बसतो म्हणून आता मीच माझ्या गुरांचा डॉक्टर बनतो. अगदी बोटावर मोजण्याइतपत डॉक्टर सोडले तर पशुसंवर्धन विभागाला पूर्णतः दुरुस्त करण्याची गरज आहे.'शिक्षणाने इलेक्ट्रिकल इंजिनीअर असणाऱ्या रवी पाटील यांची सुरुवात थक्क करून टाकणारी आहे. कत्तलखान्याकडे अवैध रीत्या जाणाऱ्या हडकुळ्या गायी त्यांनी पोलिसात तक्रार देऊन पकडून दिल्या. पण पुढे सुपूर्दनाम्यावर या गुरांची देखरेख करण्याची विनंती आल्यानंतर ही गुरं पाळणं किती कष्टप्रद काम आहे हे त्यांच्या लक्षात आलं. यातून ते स्टॉल फिडिंग म्हणजे गोठ्यातच चारा उपलब्ध करून देऊन गुरे कशी धष्टपुष्ट बनवायची हे शिकले.

'मुळात गुरांना सकाळ- संध्याकाळ दोनच वेळा चारा पाहिजे असतो. त्यातही 33 टक्के चारा ही गुरे वाया घालवितात. त्यामुळे चाऱ्यास चारा कापणी यंत्रामधून बारीक करून दिल्यास कमी चाऱ्यात जास्त गुरे आपण पाळू शकतो हे शिकलो. बारीक चाऱ्यामुळे गुरांचे पचन चांगले होते, गोठ्यातच चारा दिल्याने गुरे रवंथ जास्त करतात. दूध जास्त बनवितात. वळू चांगल्या प्रतीचा वापरल्यास भाकड गुरे कमी होऊन पुढची पिढी सुधारते. कोणत्या गायीपासून कोणत्या जातीचे पिलू काढायचे व कधी घ्यायचे हे पूर्णतः आपल्या हाती असते. गायी चरायला जंगलात सोडल्यास हे शक्य होत नाही. शिवाय त्यांच्या पायातील हाडामधील कॅल्शियम कमी होते. गायी-म्हशींना आराम मिळत नाही.



त्यामुळे रवंथ कमी केल्याने दूधनिर्मिती मंदावते. आज 25 लिटरवरून मी उत्पादन 250 लिटरवर नेलं आहे. ही किमया गोठ्यातच चारा दिल्याने साधली आहे, शिवाय शेणखत व गोमूत्राच्या उत्पादनातही वाढ होते.'देशातील 75 टक्के अल्पभूधारकांकडे गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्या हे पशूधन आहे.

किंबहुना पशुपालन हे या कुटुंबांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन बनले आहे. या पार्श्वभूमीवर गावानजीक असणाऱ्या गायरान जमिनींवर कुरण विकास करून त्याचा फायदा या अल्पभूधारक, भूमिहीन व पशुपालक शेतकऱ्यांना करून देणे आवश्यक ठरते..खुल्या अनिर्बंध चराईमुळे व गायरान जमिनींच्या योग्य व्यवस्थापनाच्या अभावामुळे गायरानांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. असलेल्या गायरानांची उत्पादकता कमी होत आहे. त्यामुळे इतर जमिनींवर चराईचा ताण वाढत आहे. अशा परिस्थितीत, पशुपालक लोक, ग्रामपंचायत, गावसमित्या व स्वयंसेवी संस्था हे सर्व एकत्र आल्यास अशा गायरान जमिनीतून किंवा पडीक जमिनींमधून पशुपालकांना चाऱ्याची उपलब्धता वर्षभर होऊ शकते. असे प्रयोग राजस्थानमध्ये 'गायरान विकास कार्यक्रम' राबवून करण्यात आले आहे. राजस्थान राज्याची ओळख चराऊ कुरणांचा प्रदेश म्हणून केली जाते.

राजस्थानातील बुंदी जिल्ह्यातील गुढा-गोकुळपुरा गावाच्या 40 हेक्टर गायरान क्षेत्रावर चारा व वृक्ष लागवडीचे काम स्थानिक ग्रामपंचायतीच्या सहभागातून यशस्वीपणे करण्यात आले. हा प्रयोग खूपच बोलका आहे. बुंदी जिल्हा अवर्षणप्रवण असून येथील सरासरी पर्जन्यमान 400 मि. मि. हून कमी आहे. गावात 270 कुटुंबांची मिळून एकूण 1285 लोकसंख्या असून, एकूण 1500 गाई, म्हशी, संकरित गाई व शेळ्या-मेंढ्या आहेत. ग्रामपंचायतीच्या अखत्यारीतील एकूण 75 हेक्टर गायरान जमिनीपैकी 40 हेक्टर जमिनीवर लोकसहभागातून गायरान विकास कार्यक्रम या गावात यशस्वीपणे राबविण्यात आला

आहे.गावातील जवळजवळ सर्व स्त्री-पुरुषांनी सहभागी होऊन गायरानाच्या सभोवताली 40 हेक्टर क्षेत्रावर प्रथम दगडी कुंपण घातले. त्यानंतर गायरान विकास कार्यक्रमाला एकात्मिक जलसंधारण प्रकल्पाची जोड देण्यात आली. गावकऱ्यांना गायरान जमिनीकडे चारा उत्पादनाचे एक साधन म्हणून पाहायला शिकविण्यात आले. गायरान विकसित झाले तर चांगला चारा उपलब्ध होईल व दूध उत्पादन नक्की वाढेल या गोष्टीची जाणीव गावातील महिला वर्गाला झाली. त्यांनी मग हा मुद्दा ग्रामसभेमध्ये लावून धरून गायरान विकासास प्राधान्य देण्याची मागणी केली.गायरान क्षेत्रावर धामण व स्टायलो या जातीच्या गवताची लागवड करण्यात आली.

धामण गवत अशा पडीक व निकृष्ट जमिनीवर चांगले येऊ शकते व स्टायलो गवत द्विदल वर्गातील असल्यामुळे जमिनीमध्ये नत्र स्थिरीकरण करते जमिनीवर जलद गतीने पसरत असल्याने ते मातीत ओलावा टिकविण्यास मदत करते. साधारणत: 600 किलो धामण व स्टायलो गवताचे बी 40 हेक्टर क्षेत्रावर येथे पेरण्यात आले. जमीन चढउताराची होती. काही ठिकाणी मातीची खोली खूप कमी होती. पक्ष्यांकडून, वाऱ्यामुळे किंवा पावसाच्या पाण्यात बियाणे वाहून वाया जाऊ नये व उगवणही भरघोस व्हावी म्हणून मातीच्या छोट्या छोट्या गोळ्यांमध्ये बियाण्यांचे मिश्रण करून ते पेरण्यात आले.मातीच्या संरक्षणासाठी जागोजागी उतारावर चर खोदण्यात आले. तसेच दगडांचे बांध घालून पाणी मातीत मूरविण्यासाठी व मातीची धूप थांबविण्याचे प्रयत्न केले गेले. संपूर्ण गायरानाचे क्षेत्र गवताने व्यापले जाईल अशा प्रकारे नियोजन करण्यात आले.अशा संरक्षण दिलेल्या गायरानामध्ये अनेक वृक्षप्रजातींच्या मुळांचा साठा नैसर्गिकच असतो. त्यांना फुटवे फुटून नैसर्गिक झाडोरा हळूहळू बाळसे धरतो. शेळ्या-मेढ्यांकरीता या वनस्पती व झाडोरा खूपच उपयुक्त असतो. त्यांच्या संवर्धनाकडे फक्त लक्ष द्यावे लागते. साधारणत: ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांत गवताचे बी खाली पडले की चारा कटाई करणे योग्य असते. हा चारा जनावरांना ऑक्टोबर ते जून या काळात उपलब्ध होतो. या काळातच चाऱ्याची खरी टंचाई असते. गायरानामध्ये पशूधनाला खुलेआम चराईसाठी प्रतिबंध केल्यामुळे चाऱ्याचे उत्पादन वाढते व चाऱ्याचे बी गायरानातच पडल्यामुळे पुढील वर्षी नैसर्गिक उगवणीतून अधिक क्षेत्र गवताखाली येते.अशाप्रकारे चाऱ्याचे उत्पादन प्रतिहेक्टरी 200 किलोपासून 600 किलोपर्यंत होऊ शकते. राजस्थानातील या प्रयोगात पहिल्या दोन वर्षांत संपूर्ण 40 हेक्टर क्षेत्रातून 22 टन चारा मिळाला. या गावाची गरज भागून, उरलेल्या चाऱ्याची विक्री शेजारच्या गावातल्या पशुपालकांना होऊ शकली. बाजारभावापेक्षा स्वस्त व उत्कृष्ट चाऱ्यामुळे गायरान समितीला चारा विक्रीतून चांगले उत्पन्न मिळू शकले.

राजस्थानातील गायरानामध्ये शीन व बुवारी या दोन स्थानिक गवतांच्या जाती नैसर्गिकत:च आढळतात. बुवारी गवताचा उपयोग स्थानिक महिला केरसुण्या तयार करण्याकरिता करतात. बंदिस्त गायरानामुळे या गवताची नैसर्गिक वाढ चांगली झाली. उदरनिर्वाहासाठी या गवतावर अवलंबून असणाऱ्या, गावातील व बाहेरील 200 हून अधिक गरीब कुटुंबांना हे गवत भरपूर उपलब्ध झाले. धामण गवताचे बी वजनाने हलके असल्यामुळे ते गोळा करणे कौशल्याचे काम असते. तेही या गावाने यशस्वीपणे केले.गायरान विकासाचे काम सुरू असतानाच या गावातील व परिसरातील जवळजवळ 70 हून अधिक कुटुंबांनी चाऱ्याचे वृक्ष लागवडीचे काम त्यांच्या वैयक्तिक पडीक जमिनीवर सुरू केले. आज इथले ग्रामस्थ गायरान समितीच्या माध्यमातून

गायरानाची देखभाल करीत आहेत. हे मेळघाटसारख्या भागातही शक्य आहे. शासन म्हणून मध्यप्रदेश सरकार यामध्ये यशस्वी झाले. केवळ वनक्षेत्रात चारा निर्मितीच्या धडक कार्यक्रमातून मध्यप्रदेशाच्या वनक्षेत्रांमध्ये अतिरिक्त चारा शिल्लक राहतो. छत्तरपूर वनवृत्ताचे तत्कालीन मुख्य वनसंरक्षक सतीश त्यागी यांच्याकडून वनविभागाच्या जमिनीवर चारा निर्मितीच्या धडक कार्यक्रमाची यशोगाथा ऐकून मी आश्चर्यचकित झालो.

भारतात अतिरिक्त चारा उत्पादन होऊ शकते यावर आता माझा विश्वास बसला.गवताच्या स्थानिक प्रजाती शोधून, त्यांचे बीज गोळा करून निवडलेल्या एका जागी विशिष्ट पद्धतीने रोपण करायच व हव्याहव्याशा चाऱ्याची वन्यजीवांसाठी जंगलातच निर्मिती करायची असा प्रयोग महाराष्ट्रातील व्याघ्र प्रकल्प व काही अभयारण्यांमध्ये डॉ. गजानन मुरतकर या गवततज्ज्ञाने केला आहे. याचे यश पाहून हा प्रयोग आता देशातील अनेक व्याघ्र प्रकल्प व अभयारण्यांमध्ये राबविण्यात येत आहे. रवी पाटील मेळघाटचं उदाहरण देऊन म्हणाले की, 'आमच्या मेळघाटचा 50 म्हशी व 12 गायी पाळणारा गवळी बांधव फक्त चार ट्रक शेणखत जमवितो. तेवढ्याच गुरांपासून मला मात्र 300 ट्रॉली (टॅक्टरची) शेणखत मिळते. शिवाय मेळघाटच्या गुरांचं शेणखत वापरल्याने शेतात तण जास्त निघते. मेळघाटातील गायी जंगल चरून गवताच्या अनेक प्रजाती व झाडांच्या बिया शेणावाटे बाहेर टाकतात. शेणावाटे येणारे हे बी अधिक रुजलेलं असल्याने या शेणखतापासून पिकामध्ये तण अधिक येतं. निंदण्याच्या खर्चामुळे शेतकऱ्याची कंबर मोडते. त्यामुळेच मेळघाटच्या गवळी बांधवांचं शेणखत 2000 तर माझ्याकडच्या शेणखताला 2300 रु. प्रती ट्रॉली मिळतात.' रवी पाटील 5 ते 6 लाख रुपयांचं शेणखत व गोमूत्र वर्षाकाठी विकतात.हा मेहनतीचा व्यवसाय आहे.

यादव व गवळी समाजाच्या कष्टकरी गोपालकांना आता भेसळयुक्त कृत्रिम दूध बनविणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या डेअरीशी स्पर्धा करावी लागते. आजचा युवक या व्यवसायात उतरला व गोपालकांच्या मुलांनी जंगलात गुरे चारण्यापेक्षा 'गोठ्यात चारा' पुरवण्याचे तत्त्व अवलंबिल्यास देशाच्या दूध उत्पादनात वाढ होऊ शकेल. याद्वारे जंगलाचा ऱ्हासही होणार नाही.. ऑस्ट्रेलिया व युरोपला जमले ते आम्हाला का जमणार नाही? रवी पाटील यांचा हा आत्मविश्वास त्यांच्या बोलण्यातून ओसंडून वाहात होता. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील काही गवळी बांधवांना ते या नियोजनबद्ध व्यवसायाची तालीम देत आहेत. ते मध्यप्रदेशातील पन्ना व्याघ्र प्रकल्पातही अशीच तालीम देण्यासाठी जाऊन आले. महाराष्ट्र शासनाने एक शासकीय अध्यादेश काढून रवी पाटील यांच्या या उपक्रमाचं कौतुक केलं आहे. त्यांच्यापासून बाकीही गोपालकांनी शिकावं तसेच दुग्धव्यवसायाच्या संपन्नतेतूनच वनसंरक्षण साधण्याचा मंत्र वनखात्यातील वनकर्मचाऱ्यांनी शिकावा असं या अध्यादेशात म्हटलं आहे. रवी पाटीलांच्या उपक्रमाचा कित्ता इतर गोपालकांनी गिरविल्यास महाराष्ट्र राज्य वनचराईमुक्त होऊन इथल्या वनक्षेत्रांमधील रोपे निर्भयपणे वाढू शकतील तसेच पशुपालकांसाठी पशुपालनाचा व्यवसायही खऱ्या अर्थाने फायदेशीर बनेल.....

◆ ◆ ◆







पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर खुर्सापार पर्यटन प्रवेश द्वार, येथे मे २०२३ मध्ये भीषण उष्णतेत पाण्यात विसावतानाचे वाघिणीचे हे छायाचित्र टिपले आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. अभिजीत ईलमकर यांनी.







# व्याघ्र संवर्धनाचा इतिहास

**श्री. किशोर मिश्रीकोटकर..**
निवृत्त वनअधिकारी

भारतात व्याघ्र संवर्धन हे पूर्वापार चालत आलेले आहे. मुळात वन्यजीव संवर्धन हे भारतीय संस्कृतीत खोलवर रुजलेले आहे म्हणूनच बहुतांशी सगळ्याच धर्मात वनस्पती आणि वन्यप्राणी यांना सन्मानाचे स्थान दिसते. कालानुरूप वन्यजीव संवर्धनासाठी कायद्याचा आधार घ्यावा लागला, प्रोजेक्ट टायगर आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण सारख्या व्यवस्था पुढे आल्या. भारतातला व्याघ्र संवर्धनाचा इतिहास विषद करत आहेत निवृत्त वनअधिकारी श्री. किशोर मिश्रीकोटकर..

**प्रस्तावना:-**

पृथ्वीतलावर हजारो वर्षांपासून वाघाचे अस्तित्व आहे. आशिया खंडात वाघाला धार्मीक व सांस्कृतीक महत्व आहे. आदिवासी संस्कृतीत तर वाघाला देव मानन्यात आले. हिंदू धर्मानुसार वाघ दुर्गादेवीचे वाहन आहे. वाघाच्या एकूण आठ ज्ञात प्रजाती होत्या. त्यापैकी सध्या 5 प्रजाती अस्तित्वात आहेत. तीन प्रजाती नामशेष झाल्या आहेत.

20 व्या शतकाच्या सुरूवातीला जगात वाघांची अंदाजीत संख्या 40,000 (चाळीस हजार) असल्याचे मानन्यात येते. वाघांची ट्रॉफी, कोट बनविण्याकरिता चामडे याकरिता शेकडो वर्षांपासून शिकार करण्यात येत होती. मानवाकरिता धोकादायक प्राणी म्हणून देखील त्यांची शिकार केल्या जात असे.

वाघाच्या विविध अवयवांचा जादूटोण्याकरिता तर चीनमध्ये पारंपारीक औषधी म्हणून उपयोग करण्यात येतो. तिबेट मध्ये वाघाच्या चामडयाचा पोषाख विशिष्ट प्रसंगी परिधान करण्याची परंपरा होती. राजे-महाराजांचा वाघाच्या शिकारी करणे हा आवडता छंद होता. ब्रिटीश अधिका-यांनी देखील खेळ म्हणून हजारो वाघांच्या शिकारी केल्या. केवळ शिकारीकरिता जंगले राखीव ठेवल्या जात असत. मध्यप्रदेशातील "रातापाणी" राष्ट्रिय उद्यानातील विश्रामगृहामध्ये कोणी किती वाघांच्या शिकारी केल्या याचा फलक होता. त्यामध्ये राजे/ महाराजे व ब्रिटीश अधिका-यांची नांवे दिलेली आहेत. काहींच्या नांवासमोर तर 1000 च्या वर वाघांच्या शिकारींची नोंद आहे.

साठच्या दशकापर्यंत वाघांच्या संख्येत प्रचंड घट झाली होती. जगात केवळ 3200 वाघ शिल्लक राहीले होते. South China Tiger सर्वाधिक नष्टप्राय प्रजाती होती. त्यांचे केवळ काही डझन प्राणी शिल्लक होते. मलायन वाघ-500; सायबेरीयन व सुमात्रन प्रजातींचे तर 500 पेक्षाही कमी ; इंडो-चायनीज -300 व जगातील अर्ध्यापेक्षा जास्त भारतातील बेंगाल टायगर प्रजाती सर्वाधिक म्हणजे 1600 प्राणी उरले होते. Caspian ; Javan व Bali प्रजाती नष्ट झाल्या होत्या. निसर्ग, जंगले, वन्यपशु- पक्षी हे अविनाशी आहेत या गैरसमजुतीतून त्यांची बेसुमार कत्तल केल्या गेली.

वने व वन्यप्राणी हे निसर्गाने दिलेले कधीही नष्ट न होणारे वरदान आहे असा समज होता. परंतु हा समज खोटा आहे हे साठच्या दशकातील तत्कालीन वनाधिकारी व या क्षेत्रातील तज्ञांनी राजकर्त्यांना सप्रमाण दाखवून दिले व त्याचे भविष्यात होणारे दुष्परिणाम पटवून दिले.

वन्यप्राणी/पक्षी यांचेकरिता वने हेच त्यांचे आश्रयस्थान/घर आहे व मानवाला ज्याप्रमाणे घराची आवश्यकता असते त्याचप्रमाणे वन्यजीवांना देखील अनुरूप आश्रयस्थान आवश्यक असते व त्यावरच त्यांचे अस्तित्व अवलंबून असते.

मानव हा निसर्गनिर्मीत साखळीतील एक कडी आहे. साखळी नाही हे विसरून त्याने विविध कारणांकरिता निसर्गाचा -हास केला. त्यामध्ये सर्वप्रथम बळी गेला तो वन्यजीवांचा. वन्यप्राण्यांना त्यांचे अवयवांना चांगली किंमत मिळते हे लक्षात आल्यानंतर तर त्याने स्वत:चे स्वार्थाकरिता अक्षरश: व्यवसायच सुरु केला. आंतरराष्ट्रीय बाजारात विक्रीकरिता वाघांचे शिकारीकरिता प्रसिध्द बहेलिया; बावरीया इत्यादी जमातीतील शिका-यांना हाताशी धरून वन्यप्राण्यांचे चामडे, हाडे व इतर अवयवांची पध्दतशीर तस्करी सुरु




केली.  सर्वसामान्य अचंबीत होतील इतक्या मोठया प्रमाणावर वन्यजीवांची/ त्यांच्या अवयवांची बाजारपेठ व अवाक करणारी किंमत आहे. जागतीक स्तरावर अवैधरित्या शस्त्रास्त्रांचा व्यापार, अवैधरित्या होत असलेला मादक पदार्थांच्या व्यापारानंतर वन्यप्राण्यांच्या अवयवांच्या अवैध व्यापाराचा क्रमांक आहे व त्यांचे आपसात लागेबांधे आहेत.  एकप्रकारे या सर्वांचा माफीया कार्यरत आहे.  या अवैध व्यवसायात प्रचंड पैसा असल्याने भ्रष्टाचाराने लिप्त समाजात त्यांचे आश्रयदात्यांचे प्रमाण देखील मोठे आहे.  त्यामध्ये नामांकितांचा समावेश आहे.

वाढती लोकसंख्या, औद्योगीकिकरण, शहरीकरण, धरणे, खनिज उत्पन्नाकरिता खाणी, रस्ते, शेतीकरिता जमीनीची उपलब्धता, अतिक्रमणे, वाढती पाळीव जनावरांची संख्या व त्यांचे चराईकरिता जंगलावरील अवलंबन तसेच वनांलगत असलेल्या गावांचे विविध गौण वनोत्पादनाकरिता जळावू लाकुड, ईमारती लाकूड ईत्यादी करिता लगतचे वनांवर असलेले अवलंबन, एकूणच वनक्षेत्रावर त्यांच्या उत्पादन क्षमतेपेक्षा जास्त ताणाचे व दबावाचे होते व आहे.

या सर्वांचा देशातील/ राज्यातील एकेकाळी जवळपास 40% असलेले वनक्षेत्र  20 % होण्यामध्ये झाला. वन्यजीवांकरिताचे आश्रयस्थान/ घर नष्ट झाल्याने त्यांची संख्यादेखील मोठया प्रमाणात कमी झाली.

वाघ हा वन्यप्राण्यांच्या नैसर्गीक अन्न साखळीच्या शिर्षस्थ असून त्याच्या अस्तित्वावरच निसर्गाच्या ईतर घटकांचे अस्तित्व अवलंबून असल्याने संपूर्ण साखळी अबाधीत ठेवावयाची असेल तर वाघांचे संरक्षण करणे आवश्यक आहे.  याबाबत व्याघ्र अस्तित्व असलेल्या देशांनी वाघाच्या संरक्षण संवर्धनाकरिता आवश्यक उपाययोजनांची आखणी केली. निसर्ग, वन्यप्राणी, पक्षी, जलचर यांच्या संरक्षणाचा संवर्धनाचा देखील इतिहास आहे.

इसवी सन पूर्व 300 वर्षापूर्वी सम्राट अशोकाद्वारे आदेशीत शिलालेखामध्ये नमूद वन्यपक्षी, प्राण्यांना अभय देण्यात आले होते.  विशेषत: जे वन्यप्राणी मानवी उपयोगाचे नाही त्यांची शिकार करु नये असे स्पष्ट नमूद आहे.

1873-मद्रास वन नियमांन्वये वन्य हत्तींना संरक्षण देण्यात आले होते. परंतु ते फक्त मद्रास प्रांतापूरतेच मर्यादीत होते.

भारताच्या ईतिहासात प्रथमत:च वन्यजीवांच्या संरक्षणार्थ Wild Birds Protection Act No. X of 1887 हा कायदा करण्यात आला. या कायद्यामुळे अनुसूचीत समाविष्ट वन्यपक्ष्यांना बाळगणे किंवा त्यांची विक्री करण्यावर सरकारने प्रतिबंध आणला. परंतु हा कायदा केवळ म्युनीसीपालटीचे व कॅन्टॉनमेन्ट चे क्षेत्रापूरता मर्यादीत होता.

देशात ग्रामीण क्षेत्रात वन्यप्राणी, पक्ष्यांच्या बेसुमार शिकारीवर कोणतेही निर्बंध नव्हते. त्यामुळे काही प्रजाती लुप्तप्राय झाल्या, काही नामशेष होण्याचा धोका निर्माण झाला होता.

1887 चा कायदा प्रभावी न ठरल्याने सरकारने 1912 साली Wild Birds and Animals Protection Act-VII of 1912 अमलांत आणला. याद्वारे कायद्यात नमूद वन्यप्राणी व पक्षी पकडणे, शिकार करणे, विक्री करणे, विकत घेणे किंवा बाळगणे यावर बंदी आणली. कायद्याचे उल्लंघन करणा-यास दंड रु.50/- व दुस-या गुन्हयाकरिता रु.100/- दंडाची तरतूद होती. सदर कायदा संपूर्ण देशात लागू करण्यात आला होता. परंतु या कायद्याद्वारे ग्रामीण भारतात खाद्य म्हणून शिकार करण्यात येत असलेल्या वन्यप्राणी/ पक्ष्यांचाच समावेश होता. हत्ती, वाघ, सिंह, बिबटे अस्वल, मगर ईत्यादी वन्यप्राणी ज्यांची राजे/ महाराजे, ब्रिटीश अधिकारी मृगया चिन्हांकरिता शिकार करीत असत व त्यांना निसर्ग किंवा मानवी उपयोगाचे समजत नसत अश्या वन्यप्राण्यांच्या शिकारीवर बंदी नव्हती.

1912 चा कायदा देखील वन्यप्राण्यांच्या/ पक्ष्यांच्या शिकारीवर नियंत्रण आणण्यास प्रभावी नसल्याने हौशीखातर व व्यावसायीक दृष्टीने प्रमुख वन्यप्राणी / पक्ष्यांची अतोनात शिकार होत असल्याचे सरकारच्या लक्षात आले.

त्यामुळे सरकारने 1935 मध्ये 1912 चा कायदा सुधारीत केला व Wild Birds and Animals Protection Act No. XXVII of 1935 अमंलात आणला. या कायद्याने प्रांतीय सरकारांना कोणत्याही क्षेत्रांना त्यामधील वन्यप्राणी व पक्ष्यांकरिता " अभयारण्ये" म्हणून अधिसूचीत करण्याचे अधिकार प्राप्त झाले. अभयारण्य क्षेत्रातील वन्यप्राणी/पक्षी पकडणे किंवा शिकार करण्यावर प्रतिबंध करण्यात आला. तसेच अनुसूची मध्ये सुधारणा करुन त्यामध्ये मोठया प्रमाणावर वन्यप्राणी व पक्ष्यांचा समावेश करण्यात आला. तसेच नियमभंगाकरिता रु.50/- पर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली होती. परंतु या कायद्यातील अनुसूचीमध्ये समाविष्ट नसलेले वन्यप्राणी/ पक्षी तसेच अभयारण्य क्षेत्राव्यतिरीक्तचे क्षेत्रातील सर्वच वन्यप्राणी व पक्ष्यांच्या शिकारीवर प्रतिबंध करण्यास हा कायदा देखील अपुरा ठरला.

2 ऑगस्ट 1935 ला Government of India Act अमलांत आला. यामुळे केंद्र सरकार व राज्य सरकारांच्या अधिकारांची विभागणी झाली. केंद्र सरकार पूर्ण देशाकरिता तर राज्य सरकारे राज्यापूरते कायदे करण्यास सक्षम झाली. अनुसूची-1 मधील विषयांकरिता केंद्र शासन कायदा करेल तर अनुसूची-2 मधील विषयांकरिता कायदा करण्याचा अधिकार राज्य सरकारला असेल. अनुसूची- III मधील विषयांकरिता केंद्र व राज्य सरकार दोघांनाही अधिकार असतील. परंतु या संबंधात केंद्र सरकारने केलेल्या कायद्याविरोधात राज्य

सरकारने कायदा केल्यास केंद्र सरकारचा कायदाच अमलांत राहील, अश्या तरतुदी होत्या.

दुर्देवाने "Protection of Wild Birds and Wild Animals" हा विषय राज्य यादी (अनुसूची II) मध्ये समाविष्ट करण्यात आला. त्यामुळे या संबंधात प्रत्येक राज्यात वेगवेगळे कायदे झाले. राष्ट्रीय स्तरावर वन्यजीव संरक्षण संवर्धनाकरिता कोणतेही नियोजन किंवा एकसंघपणा नव्हता.

राज्य सरकारांनी जमीन, पाणी, जंगले, खनिज यांचे स्वामित्वाचे कायदे केले. परंतु वन्यजीवांना मात्र "ज्याला सापडले त्याचे" या तत्वावर लोकांच्या मर्जीवर सोडले. एकाने दुस-याच्या जागेवर वन्यप्राण्याची शिकार केल्यास त्यावर मालकी मात्र जमीन मालकाची राहील हे तत्व होते. एका अर्थाने वन्यजीव संरक्षण/ संवर्धन हा अत्यंत दुर्लक्षित विषय होता.

त्यानंतर संपूर्ण जगात दुस-या महायुध्दाचे सावट होते. भारतात स्वातंत्र्यलढयाचे वातावरण होते. वन्यजीव संरक्षणाचा विषय पूर्णत: दुर्लक्षित होता. अंतत: 15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला. भारताचे संविधान अस्तित्वात आले. परंतु पुन्हा एकदा संघराज्य पध्दतीत Wild Life Protection हा विषय राज्य यादीत समाविष्ट केला गेला व याबाबतचे कायदे करण्याचे अधिकार राज्यांना प्राप्त झाले.

तत्कालीन बॉम्बे स्टेटमध्ये Bombay Wild Bird and Animal Protection Act 1951 अमलांत आला. 1961 मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर तो संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्यात आला. यामध्ये वन्यजीवांचे संरक्षण/संवर्धनाकरिता अभयारण्य (Game Sanctuary) घोषित करण्याचे अधिकार व विविध वन्यप्राणी/ पक्ष्यांची 3 अनुसूचीमध्ये Big game, Small Game व Special Game अशी विभागणी करण्यात आली होती. यामधील वन्यप्राणी/ पक्षी पकडणे, शिकार करणे, बाळगणे, विक्री करणे इत्यादी परवान्याशिवाय करण्यावर बंदी होती. नियमभंगाकरिता 6 महिने शिक्षा किंवा दंड रु.500/- किंवा दोन्हीही अशा शिक्षेची तरतूद होती. परंतु वन्यप्राणी संरक्षण/संवर्धनाबाबत व त्यांच्या -हासामुळे होणा-या दुष्परिणांमाबाबत पुरेशी जागरुकता नसल्याने हा कायदा देखील प्रभावी ठरला नाही.

"जागतीक स्तरावर एकेकाळी जैवविविधतेने, वन्यप्राणी, पक्षी यांच्या विविधतेने संपन्न असलेल्या भारतातील या वैभवाचा झपाटयाने होत असलेला -हास ही चिंतेची बाब आहे. ब-याच वन्यप्रजाती नष्ट झाल्या आहेत, ब-याच नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. अभयारण्य/ राष्ट्रीय उद्यानातील वन्यजीवांच्या संरक्षण/ संवर्धन प्रक्रियेत सुधारणा करणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत राज्यांनी केलेले कायदे कालबाहय असून गुन्हयाच्या तुलनेत शिक्षेच्या तरतुदी अत्यंत तोकडया आहेत. अवैध शिकारीद्वारे प्राप्त होणा-या आर्थिक लाभाच्या तुलनेत तर नगण्य आहेत" केंद्र सरकार या निष्कर्षाप्रत आले व 9 सप्टेंबर 1972 ला Wild Life (Protection) Act No. 53 of 1972 हा राष्ट्रीय स्तरावर कायदा संमत झाला. यामध्ये देखील वन्यप्राणी/पक्ष्यांची परवान्याद्वारे शिकार करणे व त्यांच्या अवयवांचा व्यापार करण्याची तरतूद होती. नियमभंगाकरिता 2 वर्षेपर्यंत शिक्षा किंवा रु 2000/- दंड किंवा दोन्ही अशी अत्यंत तोकडी तरतूद होती.

परंतु यामुळे राष्ट्रीय स्तरावर एकच कायदा अंमलात आला ही जमेची बाजू होती.

वाघाचे निसर्गसाखळीतील अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन त्याचे व त्याच्या आश्रयस्थानाचे तसेच एकूणच पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने केंद्र शासनाने "Project Tiger" हा राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्प सुरु केला.

सुरवातीला यामध्ये देशातील 9 प्रकल्पांची निवड करण्यात आली. त्यामध्ये महाराष्ट्रातील मेळघाट टायगर प्रोजेक्टचा समावेश होता. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व्यवस्थापन व आर्थिक पाठबळामुळे याचे दृश्य परिणाम दिसत आहेत.

1976 हे वर्ष वन्यजीवांच्या दृष्टीने ऐतिहासिक व दूरवर परिणामकारक ठरले. संसदेने संविधानातील सुधारणा Forty Second Amendment Act-1976 संमत केला. याद्वारे Article 48 A चा नव्याने समावेश केला गेला. राज्य सरकारांकरिता मार्गदर्शक तत्वांमध्ये पर्यावरण संरक्षण व संवर्धन तसेच देशातील वने व वन्यजीवांच्या संरक्षण/संवर्धनाची संवैधानिक जबाबदारी राज्यांवर टाकली.

त्याचप्रमाणे Article -51 A (g) चा नव्याने समावेश केला. याद्वारे “वने, तलाव, नद्या व वन्यजीवांचा समावेश असलेल्या निसर्ग पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे त्यांच्याबद्दल आस्था बाळगणे” यांचा प्रत्येक भारतीय नागरीकांचे कर्तव्यात समावेश केला. तसेच Protection of Wild Animal and Birds हा विषय राज्यसुचीमधून काढून संयुक्त सूचीमध्ये (Concurrent List-III) मध्ये समाविष्ट करण्यात आला. याद्वारे केंद्र व राज्य दोघांनाही यासंबंधात कायदे करण्याचे अधिकार प्राप्त झाले. राज्य सरकारे कायदा करून शकतील परंतु केंद्रीय कायद्यातील तरतुदी अंतीम राहतील.

जागतीक स्तरावर वन्यजीव व त्यांचे अवयवांचे अवैध व्यापारावर नियंत्रणाकरिता अनेक राष्ट्रांचा सहभाग असलेल्या “Convention on International Trade in Endangered Species of Wild Fauna and Flora” “CITES” मध्ये भारत सदस्य राष्ट्र म्हणून सहभागी झाला.



1982 मध्ये Wildlife (P) Act-1972 सुधारणा नियम अमंलात आले. याद्वारे वन्यप्राणी/ वन्यप्राणीजन्य वस्तुंचे व्यापाराकरिता द्यावयाच्या परवान्याशी संबंधीत सुधारणा करण्यात आल्या. तसेच लुप्तप्राय वन्यप्राण्यांचे वैज्ञानिकरित्या व्यवस्थापन व पर्यायी आश्रयस्थानामध्ये स्थलांतरणाचे प्रावधान करण्यात आले.

1986 मध्ये या कायद्यात पुन्हा सुधारणा करण्यात आली. याद्वारे संविधानातील Article 253 अंतर्गत वन्यजीवांच्या संरक्षणार्थ CITES मधील तरतुदींची अंमलबजावणी करणे व वन्यप्राणी व वन्यप्राणीजन्य वस्तुंचे व्यापारावर संपुर्ण बंदी केल्या गेली. परंतु व्यापारी न्यायालयांत गेल्याने न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष बंदी मे-1992 मध्येच लागू झाली.

20 ऑक्टोबर 1991 मध्ये या कायद्यामध्ये ऐतिहासीक सुधारणा करण्यात आली. याद्वारे वन्यप्राणी, पक्षी व वनस्पती प्रजातींच्या संरक्षणाची तरतूद करण्यात आली. प्रथमत:च वनस्पती प्रजातींचा कायद्यात समावेश करण्यात आला.

- अनुसूचीत वन्यप्राण्यांचे शिकारीवर पूर्णत: बंदी केल्या गेली.
- राष्ट्रीय उद्यान व अभयारण्य क्षेत्रातील तसेच लगतचे गावातील पाळीव प्राण्यांचे लसीकरण करणे बंधनकारक केल्या गेले.
- देशातील प्राणी संग्रहालयांचे व्यवस्थापन व विकासाच्या दृष्टीने केंद्रीय प्राणीसंग्रहालये प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली.
- हस्तीदंत आयात करण्यावर बंदी केल्या गेली.
- अनुसूची 1 व अनूसूची 2 च्या भाग 2 मध्ये समाविष्ट वन्यप्राण्यांच्या संबंधातील तसेच राष्ट्रीय उद्यान व अभयारण्यातील शिकारी संबंधातील गुन्हयांकरिता च्या शिक्षेत वाढ करून किमान 1 वर्षे ते सहा वर्षापर्यंत शिक्षा व दंड किमान रु 10000/- ची तरतूद करण्यात आली.

या कायद्यातील तरतूदींचे अनुकूल परिणाम दिसून आले. देशातील सर्वच स्तरावर पर्यावरण, निसर्ग, वन्यजीवांसंबंधी मोठया प्रमाणात जागरुकता निर्माण झाली व मानवाच्या अस्तित्वाकरिता निसर्ग व वन्यजीवांचे अस्तित्व आवश्यक असल्याची जाणीव निर्माण झाली. कायद्याची कठोर अंमलबजावणी केल्याने शिकार व अवैध व्यापारावर नियंत्रण मिळविण्यात यश आले.

आदरणीय दलाई लामा यांचे आवाहनावरुन वाघ व ईतर वन्यप्राण्यांच्या चामडयाचे पोषाख वापरणे बंद झाले. वाघांच्या संख्येमध्ये देखील वाढ झाल्याचे निदर्शनास आले.

सन 2003 मध्ये वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 मध्ये सुधारणा करण्यात आल्या. या सुधारणा मुलभूत स्वरुपाच्या आहेत. "देशाच्या निसर्ग परिसंस्था व पर्यावरणाच्या सुरक्षेकरिता वन्यप्राणी, पक्षी व वनस्पती प्रजातींचे संरक्षण करणे आवश्यक आहे" ही व्यापक प्रस्तावना स्विकारण्यात आली.

याद्वारे **"National Board For Wildlife"** ची स्थापना करण्याचे प्रावधान करुन त्याला कायदेशीर स्वरुप देण्यात आले. मा. पंतप्रधान हे या मंडळाचे अध्यक्ष असतात. यावरुन राष्ट्रीय स्तरावर वन्यजीव संरक्षण विषयाला प्राप्त महत्व अधोरेखीत होते.

- राष्ट्रीय उद्याने/ अभयारण्ये लगत विषेशत: दोन क्षेत्रामधील वनक्षेत्राला Conservation Reserve

म्हणून घोषीत करण्याचे प्रावधान आहे.

- कोणत्याही खाजगी व्यक्ती किंवा समुहाचे खाजगी क्षेत्र वन्यजीव व त्याचे अधिवासाचे संवर्धनाचे दृष्टीने Community Reserve म्हणून घोषीत करण्याचे प्रावधान.
- राष्ट्रीय उद्याने/ अभयारण्य अंतीमत: घोषीत करण्यापूर्वी करावयाच्या चौकशीचा कालावधी सिमीत केला गेला.
- National Board चे मान्यतेशिवाय राष्ट्रीय उद्यान/ अभयारण्याच्या सिमेत बदल करता येणार नाही.
- राष्ट्रीय उद्यान/अभयारण्यातील वनोपजाचा व्यापारीक कारणांकरिता उपयोग करता येणार नाही.
- National Board चे मान्यतेशिवाय राष्ट्रीय उद्यान/ अभयारण्य क्षेत्रात पर्यटन सुविधा, हॉटेल, प्राणीसंग्रहालय व सफारी ईत्यादी उभारता येणार नाही.
- राष्ट्रीय उद्यान/ अभयारण्य क्षेत्रातील अतिक्रमणे काढण्याचे अधिकार वनाधिका-यांना प्राप्त झाले.
- वन्यप्राण्यांसंबंधीच्या तडजोडपात्र गुन्हयांमध्ये वापरण्यात आलेली वाहने, शस्त्रे व ईतर साहित्य आरोपीस परत करता येणार नाही.
- वन्यजीव गुन्हयासंबंधात माहिती देणा-यास बक्षीसाची तरतूद
- मालकी प्रमाणपत्र असलेल्या वन्यप्राणी/ वन्यप्राणीजन्य वस्तु केवळ वारसा हक्कानेच हस्तांतरण करण्याची तरतूद.
- अतिशय महत्वाचे म्हणजे अनुसूची I व अनुसूची II च्या भाग-2 मध्ये समाविष्ट वन्यप्राणी/ पक्षी संबंधातील गुन्हयाकरिता किमान 3 वर्षे ते 7 वर्षे पर्यंत शिक्षा व किमान रु 10000/- दंडाची तरतूद केल्या गेली.

ही प्रमुख वैशिष्टे होती.

- **Chapter IV-C- Wild Life Crime Control Bureau**
- **व्याघ्र व ईतर लुप्तप्राय प्रजातींचे गुन्हे नियंत्रणाकरिता Tiger and Other Endangered Species Crime Control Bureau ची स्थापना करण्यात आली.**
- **Chapter VI-A- Forfeiture of Property derived from illegal hunting and trade**
- **अवैधरित्या वन्यप्राण्यांच्या शिकारी व त्यांच्या अवयवांचा व्यापाराद्वारे प्राप्त मालमत्ता जप्त करण्याचे अत्यंत महत्वपूर्ण प्रावधान करण्यात आले.**

1973 साली 9 व्याघ्र प्रकल्पांसह सुरु झालेल्या Tiger Project योजनेस 30 वर्षे पूर्ण होऊन गेल्यानंतरही वाघांच्या संख्येत म्हणावी त्या प्रमाणात वाढ दिसून येत नव्हती. व्याघ्र संरक्षणाचेही अनुकूल परिणाम दिसून येत नव्हते. National Board For Wildlife ने याची दखल घेऊन योग्य उपाययोजना सूचविण्याच्या दृष्टीने Task Force चे गठण केले. त्यांच्या अहवालानुसार Project Tiger योजनेला कायदेशीर स्वरुप देऊन प्रशासकीय अधिकार देणे व त्यांनी केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल संसदेसमोर मांडण्याकरिता केंद्र शासनाला देणे ही शिफारस होती. व्याघ्र संवर्धन व व्याघ्र प्रकल्पालगत राहणा-या आदिवासी बांधवाचे हक्काबाबत सुसंवादित्व व

सहजीवन प्रस्थापीत व्हावे याद्दष्टीने 2006 साली Wild Life Protection Amendment Act-2006 अमलांत आला.

याद्वारे- **National Tiger Conservation Authority (NTCA)** ची स्थापना करण्यात आली. NTCA चे अधिकार व कार्य निश्चीत केल्या गेले.

- राज्यांनी व्याघ्र प्रकल्पनिहाय तयार केलेल्या Tiger Conservation Plan ला मान्यता देणे.
- व्याघ्र प्रकल्पांचे Core व Buffer क्षेत्रात व्याघ्र संवर्धनाकरिता मार्गदर्शक तत्वे जारी करणे.
- व्याघ्र संरक्षणाकरिता करण्यात येत असलेल्या उपाययोजना, व्याघ्र गणना, रोग संनियंत्रण, मृत वाघांचे सर्वेक्षण, गस्ती व वैशिष्टपूर्ण घटना व इतर व्यवस्थापन बाबी, भविष्यातील नियोजन ई. बाबत नियमीत अहवाल प्राप्त करणे.
- वाघ, त्याचा अधिवास परिसर व सामाजीक-आर्थिक मुद्यांवरआधारीत संशोधन करणे.
- National Wild Board द्वारा NTCA चे सल्ल्याशिवाय व्याघ्र अस्तित्व असलेल्या वनक्षेत्राचे ईतर कामांकरिता वळतीकरणाला मान्यता न देणे.
- व्याघ्र प्रकल्प व्यवस्थापनाला मान्यताप्राप्त व्यवस्थापन आराखडयानुसार ग्रामपरिसर विकास योजनेद्वारे लगतचे क्षेत्रामध्ये स्थानिकांचा सहभाग सुनिश्चीत करणे.
- लगतचे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होण्याच्या द्दष्टीने नियोजन, व्याघ्र संरक्षणाकरिता अधिवास विकास करणे, योग्य प्रमाणात आवश्यक अधिका-यांची नेमणूक करणे, लगतचे क्षेत्रात स्थानिक व वन्यजीवांचे सहजीवन सुकर व्हावे याद्दष्टीने राज्यांनी Tiger Protection and Conservation Plan तयार करणे.
- व्याघ्र प्रकल्प व लगतचे वनक्षेत्रातील स्थानिकांकरिता कृषी विकास, रोजगार उपलब्धता व ईतर विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याकरिता प्रत्येक क्षेत्रात Tiger Conservation Foundation स्थापीत करणे.
- ही या सुधारणेची ठळक वैशिष्टे आहेत.
- त्यानंतर राज्यातील व्याघ्र प्रकल्पांमध्ये व्याघ्र संरक्षणाकरिता Special Tiger Protection Force (STPF) ची स्थापना करण्यात आली.
- RRT-शिघ्र कृती दलाची निर्मीती झाली.
- मानव-वन्यप्राणी संघर्षावर उपाययोजनेच्या स्वरूपात पिक नुकसानी, पाळीव प्राण्यांकरिता व मानवावरील संकटांकरिता नुकसान भरपाईचे प्रयोजन करण्यात आले.
- जखमी वन्यप्राण्यांच्या उपचाराकरिता सुसज्ज उपचार केंद्रे स्थापन केल्या गेली.
- प्रशिक्षीत मनुष्यबळाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे.

- नवीन प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे.
- नवनवीन संशोधन सुरू आहेत.
- व्यवस्थापन अधिक बळकट व उत्तरदायी करण्यात आले आहे.
- स्थानिकांच्या समस्या क्षमता विकास व अनेक रोजगारात्मक कौशल्य विकासाद्वारे सोडविण्यात येत आहे.
- ग्रामपरिसर विकास योजना, निसर्ग पर्यटन विकास योजनाद्वारे स्थानिकांचे जीवनमान उंचावण्याचे यशस्वी प्रयत्न होत आहेत.

या सर्वांचा एकत्रीत परिणाम म्हणून सुरवातीला 1800 च्या आसपास असलेली वाघांची संख्या 4000 चे वर गेलेली आहे. ज्या भागातून वाघांचे अस्तित्व नष्ट झाले होते तेथे पुन्हा वाघ दिसत आहेत. वाघांचे भ्रमणमार्ग सुरक्षित करण्याचे प्रयत्नांना यश मिळत आहे.

वनविभागाने अत्यंत परिक्षमपूर्वक राबविलेल्या योजना व कायद्याच्या अंमलबजावणीचे हे फलीत आहे. या यशामध्ये मा. न्यायालयांचा फार मोठा वाटा आहे. या क्षेत्रात कार्यरत अशासकीय संस्था, वन्यजीवप्रेमी, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात कार्यरत अधिकारी/ व्यक्तींचे योगदान व सर्वात महत्वाचे म्हणजे प्रसार माध्यमे त्यामध्ये वन्यजीवांविषयी तळमळ असणा-या पत्रिका व पत्रकार यांचे योगदान देखील अतुलनीय आहे.

वन्यजीव संरक्षण अधिनियम-1972 हा एकमेव कायदा असावा ज्यामध्ये अतिशय कमी कालावधीत मोठया स्वरुपाच्या मुलभूत सुधारणा करण्यात आल्या.

1980 च्या दशकातील वन्यजीव व्यवस्थापनाची स्थिती व आजच्या स्थितीत जमीन-अस्मानचा फरक झालेला दिसून येतो. वनविभागात वन्यजीव विभागाचे दुय्यम स्थान होते ते आज वनविभागाचा चेहरा झालेले आहे. व्यवस्थापनाच्या क्षेत्रात आमुलाग्र बदल झालेले आहेत. मनुष्यबळ, सोई-सुविधा, नवीन तंत्रज्ञानाचा वापर, संशोधने, मानव-वन्यजीव संघर्ष, संकटग्रस्त वन्यप्राणी बचाव, जंगल गस्त, वन्यजीव संबंधातील गुन्हयांचे अन्वेषण, न्यायालयीन प्रक्रिया, प्रशिक्षण यासोबतच स्थानिकांचे जिवनमान उंचावण्याकरिताच्या निसर्ग पर्यटन, ग्राम परिसर विकास योजना यामुळे निसर्ग स्थानिक जनता व शहरी जनता यामध्ये साखळी निर्माण झाली आहे.

राज्यात प्रथमच संकटग्रस्त वन्यप्राणी 'वाघाला' वाचवून, त्याचेवर उपचार करुन त्यांना पुन्हा निसर्गात मुक्त करण्याचा यशस्वी प्रयोग नागपूर वनविभागात झाला. त्यानंतर राज्यात मोठया प्रमाणात संकटग्रस्त प्राण्यांचा बचाव करुन वाचविण्यात विभागाचा हातखंडा झालेला आहे.

अनेक राष्ट्रीय उद्यान/ अभयारण्यामध्ये चितळ/ सांबर या वाघाचे तृणभक्षी खाद्य यशस्वीरित्या स्थलांतरण करण्यात आले. त्यामुळे त्या क्षेत्रात तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढून वाघांची देखील संख्या वाढ झाली.

राष्ट्रीय स्तरावर वाघांच्या शिकारीकरिता कुख्यात बहेलिया/ बावरियांच्या टोळयांवर राज्यात मोठया प्रमाणावर नियंत्रण मिळविण्यात विभागाने यश प्राप्त केले. त्याचा दृश्य परिणाम म्हणजे वाघाचे अस्तित्व नष्ट झालेल्या क्षेत्रात स्थलांतरण होऊन वाघ दिसायला लागले. सोबतच मानव-वन्यजीव संघर्ष देखील वाढला.

विकास प्रकल्पांमुळे बाधित क्षेत्रात वन्यप्राण्यांच्या दृष्टीने हितावह Mitigation Measures घेण्यात येत आहेत.

एकूणच संरक्षणामुळे संवर्धन होत आहे. दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर- सिंधुदुर्ग जिल्हयात कर्नाटकातून स्थलांतरीत हत्ती स्थिरावले आहेत तर छत्तीसगड मधून गडचिरोली/ गोंदिया जिल्हयात आलेला हत्तींचा कळप देखील स्थिरावण्याच्या स्थितीत आहे.

**2022 मध्ये केंद्र शासनाने वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 सुधारीत करून एप्रिल 2023 पासून अंमलात आलेला आहे.**

- याद्वारे अधिनियमाचे प्रास्ताविकात "वन्यजीवांचे संवर्धन, संरक्षण व व्यवस्थापन" असा बदल करण्यात आला.
- पूर्वी असलेल्या I ते VI अनुसूची कमी करून I ते IV अनुसूची करण्यात करण्यात आल्या. **यात महत्वाचा बदल म्हणजे vermin ची सुची आता रद्द करण्यात आली.**
- अनुसूची I – मध्ये अत्यंत धोकादायक नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या प्रजातींचा समावेश करून उच्चतम दर्जाचे संरक्षण प्रदान करण्यात आले आहे. यामध्ये 'वाघ' समाविष्ट आहे. **अनुसुची II मध्ये संरक्षीत वन्यजीव प्रजातींचा समावेश आहे. अनुसुची III मध्ये वनस्पती प्रजातींचा व अनुसुची IV मध्ये CITES मध्ये समाविष्ट प्रजातींचा समावेश केला आहे.**
- प्रकरण V B चा नव्याने समावेश करून CITES (Convention of International Trade in Endangered Species) या 186 देशांची संधी असलेल्या संघटनेला कायदेशीर स्वरूप देण्यात आले आहे व यामध्ये असलेल्या तरतुदींनुसार आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियमन करण्यात आले आहे. यामधील प्रजातींच्या आयात- निर्यातीवर नियमन करण्याकरिता केंद्र सरकार "व्यवस्थापन प्राधिकरण" व "शास्त्रीय प्राधिकरण" (Scientific Authority) स्थापन करेल.
- अभयारण्य व संवर्धन राखीव क्षेत्रांचे व्यवस्थापनाकरिता मुख्य वन्यजीव रक्षक, विधानसभा सदस्य, वन्यजीव क्षेत्रातील अशासकीय संस्था व पंचायत राज चे प्रतिनीधी यांची सल्लागार समिती ग्रामसभेच्या सहमतीने व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे प्रावधान आहे.
- जेथे कोठे लागू असले त्या अभयारण्य क्षेत्रांचे व्यवस्थापन वनहक्क कायद्याचे तरतुदीनुसार करण्याचे प्रावधान करण्यात आले आहे. ग्रामसभा व स्थानिक ग्राम संस्था एकत्रीतरित्या वने, वन्यप्राणी व जैवविविधता संरक्षणाचे व वन्यजीवांचे अस्तित्वाला धोकादायक बाबीं विरोधात कारवाई करतील.
- बाहेरून आणलेल्या प्रजाती स्थानिक परिसंस्थेला धोकादायक ठरू शकतात हे लक्षात घेऊन अश्या प्रजातींच्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्यात येईल. अश्या प्रजातींची आयात, व्यापार, बाळगणे व वाढ करण्यावर प्रतिबंध करणे, नियमन करण्याचे प्रावधान करण्यात आले आहे.
- सुरक्षित क्षेत्रातील रहिवाश्यांचे पुनर्वसन होईपर्यंत त्यांचे पाळीव प्राण्यांची चराई व पिण्याचे पाण्याचा वापर करण्याचे अधिकार अबाधित राहतील.

- काही अटी व शर्तींचे अधिन मालकी प्रमाणपत्र धारकाकडे असलेल्या पाळीव हत्तीचे धार्मिक व ईतर कामाकरिता हस्तांतरण, वाहतूक करण्यास परवानगीचे प्रावधान करण्यात आले आहे.
- मालकी प्रमाणपत्र धारक बंदिस्त वन्यप्राणी किंवा मृगयाचिन्ह शासनाकडे कोणत्याही मोबदल्याशिवाय समर्पीत करण्याचे प्रावधान करण्यात आले आहे.
- प्राणीसंग्रहालयाच्या व्याख्येत बदल करून त्यामध्ये वन्यप्राणी प्रदर्शनासह कृत्रीम वातावरणात संवर्धन करणे, बचाव केंद्र व प्रजनन केंद्राचा समावेश केला आहे.
- अनुसूची I मधील प्रजातीसंबंधात अपराधाबद्दल सध्याचे रू. 10,000/- दंडाच्या रकमेत रू. 25,000/- इतकी वाढ केली आहे. तसेच सर्वसाधारण गुन्हयाकरिता सध्याचे रू. 25,000/- दंडाच्या रकमेत रू. 1,00,000/- इतकी वाढ केली आहे. ही या सुधारणेची ठळक वैशिष्टे आहेत. तसेच तडजोडपात्र वन्यजीव गुन्हयापोटी अभिसंधानाच्या रकमेत रू. 25,000/- वरून रू. 5.00 लक्ष ईतकी वाढ करण्यात आली आहे.

अशाप्रकारे सुमारे 50 वर्षापूर्वी अस्तित्वात आलेल्या वन्यजीव संरक्षण अधिनियम-1972 मध्ये कालमान परिस्थितीनुरूप बदल झालेले आहेत. भविष्यात येणा-या परिस्थितीला प्रभावीपणे तोंड देण्याकरिता बरेच बदल अपेक्षित देखील आहेत व यथावकाश होतील देखील. मानव निर्मीत परिस्थितीवर मानव निर्मीत कायदे प्रभावी ठरून त्याचे प्रत्यक्ष अनुकूल परिणाम निसर्ग, वन्यजीव व जैवविविधतेवर झाल्यास मानवाचेच अस्तित्व अबाधीत राहणार आहे ही जाणीव मानवास सातत्याने राहावी, हीच आशा शुभेच्छा.




◆ ◆ ◆



# माळरानाचा राजा लांडगा




**डॉ धनंजय प्र.भोईटे**

**पशुवैद्यकीय तज्ञ**

पशुधन अनुवंश सुधारणा केंद्र

बारामती, जि. पुणे


वाघांच्या संख्येपेक्षाही भारतीय राखाडी रंगाच्या लांडग्यांची संख्या भारतात कमी झाली आहे. पर्यावरण संतुलनासाठी लांडग्यांच्या संवर्धनासाठी व्यापक प्रयत्न करणे गरजेचे आहे, नाहीतर माळरानाचा हा राजा लहानपणी ऐकलेल्या लांडगा आला रे आला...एवढ्याच गोष्टीपुरता शिल्लक राहील अशी परिस्थिती आहे. याबद्दल अधिक माहिती दिली आहे पशुवैद्यकीय तज्ञ डॉ. धनंजय प्र. भोईटे यांनी...



**लांडग्यांचे खाद्य –**

प्रामुख्याने लांडगे हे मध्यम आकाराच्या किंवा खुर असलेल्या सस्तन प्राण्यावर जगतात. हरणे, चिंकारा, रानडुकरे याचबरोबर बिळात राहणारे प्राणी जसे की ससे व उंदीर, मेलेली जनावरे यावर लांडगे गुजराण करतात.

**लांडग्याचा आधिवास–**

लांडग्याचा अधिवास गवताळ कुरणे, माळराने किंवा उघडया जगंलात असतो. याचबरोबर लांडगे मध्यम किंवा कमी पर्जन्यमान असलेया भागात जास्त आढळतात. एकमेकांशी लांडगे एका विशिष्ठ आवाजात कु ई कु ई आवाजामध्ये ओरडून संवाद साधतात. याला इंग्रजीत 'हाउलिंग' असं म्हटले जात.

अशाप्रकारे लांडगे आपल्या कळपाचा संपर्क शेजारील कळपाशी करण्याचा प्रयत्न करतात. तसेच याचा उपयोग लांडगे शेजारील इतर लांडग्याच्या कळपांनी किंवा इतर कुत्र्यांच्या कळपांनी आपल्या हद्दीमध्ये येऊ नये यासाठी आपल्या हद्दीचे संरक्षण करतात.

**लांडग्याची प्रचिती आणि इतिहास–**

आपणा सर्वांना माहित आहे की रुडयार्ड किपलिंग यांच्या 'द जगंल बकु' या कथेतनू मोगली आणि त्याला पाळणारे लांडगे यापासनू ही कथा तयार झाली आहे. यामध्ये लांडयांना आदर्श,सयंमी आणी कुटुंबाची काळजी घेणारे प्राणी असे दाखवले आहे. परंतु बऱ्याच वेळा चित्रपटांत मात्र लांडग्यांना क्रुर भक्षक दर्शवले गेले आहे. ते मात्र चुकीचे आहे. परंतु लांडग्याला माळरानाचा राजा किंवा जंटलमॅन म्हणावे लागेल. जसं वाघाच्या अधिवासाने जंगल टिकते तसेच लांडग्याच्या अधिवासाने माळरान टिकून राहते. भारतीय इतिहासामध्ये पंचतंत्र, जातक कथा, महाभारत, रामायण यासारख्या कथा किंवा पारंपारिक कथा, नृत्यकला यामये लांडग्याला हुशार आणि चिवट प्राणी असे उद्बोधले आहे.

**भारतातील लांडग्यांचा आढळ–**

भारतात लांडगे आढळणारे प्रमुख प्रदेश खालील प्रमाणे –

**पश्चिम भारत–** यामध्ये राजस्थान, गुजरात, महाराष्ट्राचा काही भाग तसेच थारचे इ. मध्ये वाळवटं लांडग्यांचा आधिवास आढळतो.

**मध्य भारत–** यामध्ये मध्यप्रदेश, छत्तीस गढमधील सातपुडा भागात लांडग्यांचा अधिवास आढळतो

**उत्तर भारत –** यामध्ये हरियाणा ,पंजाब, उत्तर प्रदेश, यामध्ये तो लांडगा आढळतो परंतु अधिवास नष्ट होणे, वाढती लोकसंख्या, भक्ष्याची

कमतरता तसेच लांडगा व मनुष्य यातील सघंर्ष इ मुळे या भागातून लांडगा संपत चालला आहे.

**पुर्व भारत–** झारखंड,ओरिसा, पश्चिम बंगाल या ठिकाणी लांडगा कमी प्रमाणात आढळतो

**दक्षिण भारत–** कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यात कमी प्रमाणात लांडगे आढळतात.

**हिमालयीन राज्ये–** हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मु आणि काश्मीर या राज्यांमध्ये लांडगे आढळयाचे प्रमाण दिसून येते.

सद्य स्थितीत भारतीय लांडग्याचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. एका अंदाजानुसार भारतात सध्या ३००० पेक्षा कमी लांडगे असावेत असा अंदाज आहे. अधिवास नष्ट होणे, भक्ष्याची चोरटी शिकार व कमतरता, मनुष्य–लांडगा संघर्ष, नवनवीन रोग इ. कारणांमुळे लांडग्यांची संख्या रोडावत चालली आहे. फिरस्त्या कुत्र्यांमुळे भक्ष्याबाबत होणारी स्पर्धा, तसेच रोग प्रसार, लांडगा–कुत्रे यातून होणारा संकर इ अनेक परिणाम लांडग्याच्या अस्तित्वाला येणाऱ्या भविष्यात धोकादायक ठरतील.

**लांडग्याचे जीवनमान–**

लांडगा कळपात राहणारा प्राणी आहे. कळपात राहिल्याने शिकार करून अन्न मिळवणे सोपे जाते तसेच निसर्गात तग धरण्याचे प्रमाण वाढते. कळपातील प्रमुख मादी वसंत ऋतूमध्ये जमीनीत खोदलेल्या गुहेमध्ये पिलांना जन्म देते. लांडग्यामध्ये गाभण काळ ६३ दिवसांचा असून पिले जन्माला आल्यानंतर पिलाच्या आई सोबतच कळपातील इतर सदस्य पिलांच्या पालनपोषण आणि संरक्षणाची जबादारी घेतात. सुरुवातीला लहान पिले आईच्या दुधावर जगतात. पिले जशी जशी मोठी होतील तशी कळपातील सदस्यांसोबत आसपासच्या परिसरात भटकंती करतात.कळपामध्ये प्रत्येक सदस्य त्याच्या अधिकारानुसार शिकार करणे,संवाद साधणे, कळपातील सदस्यांना सांभाळणे इ. कामे पार पाडताना दिसतो. वयात आलेले लांडगे काही वेळा कळप सोडून इतर ठिकाणच्या दुसऱ्या कळपात समाविष्ट होताना आढळतात. किंवा दिसऱ्या भागात स्वतःचा स्वतंत्र कळप प्रस्थापित करतात. एकत्र असल्याने कळपाच्या हद्दीत घुसणारे इतर लांडगे, तरस, कुत्रे किंवा बिबट्या सारख्या प्राण्यांना हुसकावून लावतात. सोबतच कळपातील म्हातारे लांडगे आजारी किंवा गाभण वा विलेल्या जनावरांचा सांभाळ करताना आढळतात. लांडग्याच्या या बार्बीचा मनुष्याने त्याच्या सामाजिक जीवनामध्ये आदर्श घेतला पाहिजे.

**धोकादायक स्थिती –**

पुर्वीच्या काळी मुबलक माळराने उपलब्ध होती तसेच हरणांसारखे मुबलक भक्ष्य लांडग्यांना उपलब्ध होत होते. मात्र जस जशी लोकसंख्या वाढत गेली. तसतसे औद्योगिकरण आणि शेती वाढत गेली आणि लांडयाचा अधिवास नष्ट होत गेला. भक्ष्य कमी होत गेल्याने आणि जंगलात व माळावर शेळ्या मेंढ्या चराई वाढल्यामुळे लांडग्यांनी आपला मोर्चा शेळ्या मेंढ्यांकडे वळवला व त्यातुंन मनुष्य–लांडगा हा संघर्ष वाढला आहे.

लांडग्यांची संख्या कमी होत असतानाच विषाणूजन्य आजार जसे की कॅनाईन डिस्टेंपर,रेबीज किंवा तत्सम आजार लांडग्यामध्ये पसरत आहेत. लांडग्यासारखे इतर प्राणी जसे की कोल्हा, तरस किंवा फिरस्त्या कुत्र्यांमुळे या रोगाचा प्रसार एकमेकात सहज होतान





आढळत आहे. लांडग्यामध्ये आजार प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्वात महत्वाचे म्हणजे फिरत्या कुत्र्यांचे निर्बिजीकरणाचा व प्रभावी रोग प्रतिबंधक लसीकरण या बाबी प्रामुख्याने हाताळल्या पाहिजेत. रोग सर्वेक्षण प्रणाली राबवून तेथील रोग प्रसार थांबवल्यास लांडग्यामधील रोग उद्रेकावर नियंत्रण करता येईल.

**लांडग्याची उत्क्रांती –**

लांडग्यांची उत्क्रांती साधारण ४० ते ५० दशलक्ष वर्षांपूर्वी कुत्र्यासारख्या सस्तन प्राण्यापासून झाल्याचे अभ्यासातून आढळले आहे. साधारण ५ ते ६ दशलक्ष वर्षांपूर्वी लांडग्यांच्या वेगळ्या जाती तयार झाल्या. म्हणजे आज आपल्याला दिसणारे कुत्रे किंवा लांडगे यांचे पूर्वज एकच होते. पृथ्वीचे वातावरण आणि हवामान जसे जसे बदलत गेले तस तसे लांडग्यानेही आपल्या मध्ये बदल केले याचे उत्तम उदाहरण म्हणजे राखाडी रंगाच्या लांडग्याने कळपात राहणे आणि वास घेण्याची कला आत्मसात करून बर्फाळ प्रदेशापासून वाळवंटापासून ते अगदी जंगलातील रहिवास करण्यास सुरुवात केली.

**लांडग्याचे अस्तित्व महत्वाचे का आहे..**

गवत खाणाऱ्या प्राण्यांच्या संख्येवर नियंत्रण– लांडगा हा शिकारी प्राणी असून हरण रानडुकरे आण लहान सश्यासारख्या प्राण्यांवरील संख्येवर शिकार करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे काम लांडगा करत असतो करतो. याद्वारे त्याचे स्वतः चे अस्तित्व आणि माळ रानाचे अस्तित्व टिकून राहते

**रोगप्रसार प्रतिबंध :**

गवत खाणाऱ्या जनावरातील कमकुवत किंवा आजारी जनावरांची शिकार लांडगा करतो जेणेकरून अश्या जनावरांपासून इतर जनावरांना रोग प्रसार होणे रोखले जाते.

**मेलेले प्राणी संपवणे–**

मेलेल्या किंवा आजारातून मृत झालेल्या जनावरांचे मांस खावून लांडगा एक प्रकारे रोग प्रसार थांबवण्याचे काम करतो. बऱ्याच ठिकाणी ब्रॉईलर पोल्ट्री फार्म मधील मेलेले पक्षी बाहेर टाकले जातात. ते पक्षी लांडगे खातात. या पक्ष्यांपासून माणसात होणारे आजार रोखले जातात.

**जैवविविधता वाढवणे:**

लांडगा वेगवेगळ्या गवत खाणाऱ्या प्राण्यांची शिकार करत असल्याने एकाच प्रकारच्या गवत खाणाऱ्या प्राण्याची संख्या गवताळ प्रदेशात वाढणे रोखत असल्याने गवताळ प्रदेशाचे जैव वैविध्य टिकून राहते.

**लांडग्याला कसे वाचवावे लागेल?**

**लांडग्यासाठी अभयारण्य–**

ज्या प्रदेशात लांडग्याचे अस्तित्व आहे अशा ठिकाणी या अधिवासाला संरक्षण दिले गेले पाहिजे किंवा हा भाग संरक्षित किंवा अभयारण्य म्हणून घोषित करून संरक्षणाचे काम सुरु केले



पाहिजे. भारतात वाघ, सिंह, हत्ती, चिंकारा, गेंडा, बिबटे, पक्षी इ. करता अभयारण्ये उपलब्ध आहेत. चीत्त्या सारख्या प्राण्यांना बाहेरून आणून त्यांना संरक्षित करण्याचे प्रयत्न सरकार करत आहे. जर लांडग्याचे अस्तित्व संपुष्टात येत असेल तर मात्र त्यांच्यासाठी सुद्धा संघटीत प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**सामाजिक सहभाग आणि जागृती –**

लांडग्यांचा अधिवास जिथे जिथे शिल्लक आहे. तेथी समाज घटकांना लांडगा संवर्धन आणि जागृती करता समाविष्ठ करण्याची प्रक्रिया सुरु केली पाहिजे. तेथील माळराने, चारा क्षेत्र जतन केल्यास भक्ष्याची विपुलता आढळेल परिणामी लांडग्याचा अधिवास टिकून राहील. त्या भागातील जनसमुदाय, तेथे काम करणाऱ्या संस्था,औद्योगिक संस्था, विद्यार्थी इ. चा सहभाग आवश्यक आहे.

**नुकसान भरपाई :**

माळरानात लांडग्यामुळे हल्ला झाल्यास बऱ्याच वेळा जनावरे दगावतात. परंतु अति दुर्गम भागात असल्यास नुकसान भरपाई मिळत नाही. दगावलेल्या जनावरांसाठी शासनाकडून लगेच भरपाई मिळाल्यास लांडग्यावर प्रती हल्ला मनुष्य करणार नाही.

यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर किंवा आर्टीफिशियल इंटेलीजंसचा वापर करून नुकसान भरपाई साठी लागणारा वेळ कमी केला पाहिजे.

**संशोधन आणि देखरेख :**

लांडगा तसेच माळरानातील इतर वन्य प्राण्यासाठी संशोधन करणाऱ्या संस्था, विद्यापीठे, सेवाभावी संस्था, वनविभाग आणि सरकार यांनी संशोधनाची व्याप्ती वाढविली पाहिजे. त्यासाठी लागणारे मनुष्यबळ, निधी उपलब्ध करून दिल्यास महत्वाचे संशोधन होईल. जेणेकरून लांडग्याची जीवनशैली, वावर, शिकार करण्याची पद्धती, त्याचे होणारे परिणाम बाबत माहिती आणि कार्यपद्धती अवलंबता येईल. सोबतच स्थानिक समुदायाचा यामध्ये सहभाग वाढवल्यास अपेक्षित परिणाम दिसू शकतील.

**चोरट्या शिकारी रोखणे–**

भक्ष्याची चोरटी शिकार रोखल्यास लांडगे वाचतील. भक्ष्याच्या अभावाने लांडगे आपला मोर्चा शेळ्या मेंढ्यांकडे वळवतात व संघर्ष निर्माण होतो

**रोग प्रसार रोखणे –**

उपलब्ध असलेल्या माळरानांमध्ये आता शेळ्या–मेंढ्या गुरे यांचा शिरकाव झाल्याने तसेच बरीच माळरानाची जमीन शेती खाली येत असल्यानेही लांडगा कमी होत चालला आहे. कारण त्याचे भक्ष्यही कमी होत आहे. कमी संख्या असलेल्या लांडग्यामध्ये रेबीज किंवा कॅनाईन डिस्टेंपर या सारख्या विषाणूजन्य रोगांचा प्रसार होताना दिसून येत आहे.

बहुतांश वेळा अधिवासामध्ये आढळणारी फिरीस्ती कुत्रीही जे लांडग्यांच्या भक्ष्यांवर हल्ला करताना आढळतात. सदर रोग प्रसार होण्यास कारणीभूत ठरत आहेत. लांडग्याना वाचवायचे असेल तर अशा फिरीस्ती कुत्र्यांवर निर्बंध आणणे, त्यांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण करणे, त्यांचे रोग प्रतिबंधक लसीकरण करणे आणि याकरता स्थानिक समुदाय, वन विभाग, शासन, सामाजिक संस्था इ चा सहभाग वाढवावा लागेल.

**लांडगा सफारी –**

आफ्रिकन देशाप्रमाणे आपल्याकडेही जंगलातील वन्य प्राणी पाहण्यासाठी सफारी नियोजित करता येऊ शकते. ग्रामीण भागातील तरूण–तरुणींना रोजगार उपलध व्हावा यासाठी जंगलामध्ये टायगर सफारी असते अगदी तशीच निवडक ठिकाणी लांडगा सफारी असल्यास लांडगा पण राहील आणि त्याचे संवर्धन हि काळजीने होईल.

लांडग्याबाबत असलेल्या अंधश्रद्धा संपुष्टात येतील व रोजगारीचे महत्वाचे साधन मिळेल.

**लांडग्या वरील संशोधनातील काही आधुनिक बाबी–**

**१. जी.पी.एस. कॉलर –** काही कळपातील मुख्य लांडग्यांना गळ्यामध्ये जी.पी. एस. कॉलर बसविली जाते जेणेकरून त्या लांडग्याच्या कळपाची हद्द, स्थलांतर पद्धती आणि लांडग्यांचा अधिवास इ. बाबत माहिती आणि संशोधन करता येते.

**२. ट्रॅप कॅमेरा –** या वेगवेगळ्या ठिकाणी लावलेल्या कॅमेराच्या मोशन सेन्सरच्या सहाय्याने लांडग्यांची परिसरातील संख्या आणि हालचाल इ बाबत माहिती मिळते.

**३. रेडीओ मेट्री –** हे उपकरण लांडग्याच्या शरीरावर बसवले जाते, त्यातून रेडीओ तरंग बाहेर सोडले जातात. याचा उपयोग लांडगा कुठे आहे, किंवा त्यांचा कळप कुठे आहे याचा शोध घेण्यासाठी होतो.

**४. डी.एन.ए. ॲनालिसिस –** यामध्ये जुनकीय तपासणी केली जाते जेणेकरून आंतरप्रजनन, रोग प्रतिकार शक्ती किंवा इतर आजार आहेत का याचा अभ्यास करता येतो.

**मनुष्य आणि लांडगा संघर्ष–**

माळरानातील लांडगा हा निसर्गाचा अविभाज्य घटक असून त्याच्या भूप्रदेशामध्ये मानवाने घुसखोरी केली आहे. हा संघर्ष कमी करण्यासाठी सर्व समावेशक धोरण आणि पद्धतीचा अवलंब केला गेला पाहिजे. लांडगा त्याचे भक्ष्य, अधिवास तसेच मनुष्य विकास कामे इ. वर धोरणात्मक लक्ष्य दिल्यास पुढील काळात लांडग्याचे अस्तित्व टिकेल. लांडग्याच्या संवर्धनासाठी शासन सोबतच तेथील जनसमुदाय, संस्था, विद्यार्थी आणि कंपन्या यांचा सहभाग वाढवावा लागेल.

◆ ◆ ◆





# आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिन: २४ ऑक्टोबर

हवामान बदल आणि त्याचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने तसेच हवामान बदलाचे घातक परिणाम रोखण्यासाठी कृती करण्याच्या आवश्यकतेवर भर देण्याच्या उद्देशाने दरवर्षी 24 ऑक्टोबर रोजी आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिवस साजरा केला जातो. विभागीय वन अधिकारी श्री. नरेंद्र चांदेवार यांनी या संकल्पनेबाबत अधिक माहिती या सदरात दिली आहे.



**श्री. नरेंद्र चांदेवार**
विभागीय वन अधिकारी, नागपूर

आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिनाचा इतिहास २००९ चा आहे, जेव्हा हवामान बदलावरील संयुक्त राष्ट्र फ्रेमवर्क कन्व्हेन्शन (UNFCCC) ने एनजीओ, पर्यावरण संस्था आणि हवामान बदल कार्यकर्त्यांचा एक गट एकत्र आणून एक जागतिक चळवळ तयार केली, जी हवामान बदल करणाऱ्या सरकारच्या निर्णयांना रोखण्यासाठी उद्युक्त करेल. कार्बन उत्सर्जन आणि हवामान बदलाला सामोरे जाण्यासाठी आवश्यक कृती करणे आवश्यक आहे. चळवळीची सुरुवात ३५०.org सारख्या मोहिमांनी झाली, ज्याने जागतिक कार्बन उत्सर्जन ३५० भाग प्रति दशलक्ष या शाश्वत पातळीवर कमी करण्याचे आवाहन केले गेलें.

आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिनाची उद्दिष्टे म्हणजे, हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी तत्काळ उपाययोजना करण्यासाठी सरकार आणि निर्णय घेणाऱ्यांवर दबाव आणणे, व्यक्तींना पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्यास प्रोत्साहित करण्यासाठी व्यापक जनजागृतीला प्रोत्साहन देणे आणि पर्यावरणास अनुकूल तंत्रज्ञानाचा विकास, व संशोधनाला प्रोत्साहन देणे.

वातावरणातील बदलामुळे पर्यावरण आणि मानवी जीवनावर विनाशकारी परिणाम होत असल्याने या दिवसाचे महत्त्व आहे. हरितगृह वायू उत्सर्जनात वाढ झाल्यामुळे जागतिक तापमानवाढ झाली आहे, ज्यामुळे विविध पर्यावरणीय समस्या उद्भवल्या आहेत, जसे की हिमनद्या वितळणे, समुद्राची वाढती पातळी, सागरी जीवनाला धोका निर्माण करणारे महासागर

आम्लीकरण आणि चक्रीवादळ, त्सुनामी आणि बर्फ वितळणे यांसारख्या अत्यंत प्रतिकूल असे हवामानाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

२४ ऑक्टोबर २०२३ रोजी आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिनाची थीम पृथ्वी पुनर्संचयित करणे: हवामान कृतीसाठी तांत्रिक उपाय आहे. जागतिक नेत्यांना पृथ्वी पुनर्संचयित करण्यासाठी, मानवी-इकोसिस्टम परस्परसंवाद बरे करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर हवामान कृती योजनांना पुढे नेणारे तांत्रिक उपाय निवडण्यासाठी चर्चा करण्याची आणि त्यावर उपाय शोधण्याची संधी प्रदान करण्याचे उद्दिष्ट आहे.

भारतात, हवामान बदलाचा सामना करण्यासाठी अनेक उपाय योजले गेले आहेत, जसे की नॅशनल ॲक्शन प्लॅन ऑन क्लायमेट चेंज (NAPCC), हवामान बदलाचा सामना करण्यासाठी देशाचे अनुकूलन आणि कमी करण्याच्या प्रयत्नांना एकत्रित करणारी एक फ्रेमवर्क आणि पॅरिस करारासाठी भारताची प्रतिज्ञा, असे एकंदर उपाय योजना राष्ट्रीय स्तरावर योजले गेले आहे.

नूतनीकरणक्षम ऊर्जेचा वाटा वाढवून आणि ऊर्जा कार्यक्षमता आणि कचरा व्यवस्थापन सुधारून देशातील कार्बन फूटप्रिंट्स कमी करण्याचे भारत सरकारचे उद्दिष्ट आहे.

जागतिक स्तरावर, ग्रीन न्यू डील, क्लायमेट लीडरशिप कोलिशन आणि C40 सिटीज उपक्रम यांसारख्या अनेक उपक्रमांसह अनेक देशांनी हवामान बदलाशी लढण्यासाठी आपली वचनबद्धता दर्शविली आहे.

जागतिक हवामान कृती दिन, हवामान बदल, हवामान बदलाच्या परिणामांविरुद्ध कृती करण्याची तातडीची गरज जगाला आठवण करून देण्यासाठी आणि प्रत्येकाला पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्यासाठी आणि शाश्वत उपाय शोधण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आवश्यक आहे. जगभरातील कार्बन उत्सर्जनाला आळा घालण्यासाठी आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी आपल्या ग्रहाच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आपण तात्काळ कारवाई केली पाहिजे आणि टिकाऊ धोरणे, धोरणे आणि तंत्रज्ञानाची अंमलबजावणी केली पाहिजे.

◆ ◆ ◆



# मानव वन्यजीव संघर्ष व उपाययोजना



**श्री. धीरज ढेंबरे**
वन परिक्षेत्र अधिकारी, गडचिरोली

महाराष्ट्र राज्यात मागील काही वर्षात वन्यजीव व्यवस्थापनात अनेक सुधारणा झालेल्या आहेत. संरक्षित क्षेत्रात सुद्धा वाढ झालेली आहे त्यामुळे वाघासोबतच इतर वन्य प्राण्यांची संख्या सुद्धा वाढलेली आहे. यासोबत विकासाच्या योजना व इतर कारणांनी होत असलेले विखंडनीकरण, मानवी लोकसंख्येत होत असलेली वाढ या कारणाने मानव-वन्यजीव संघर्ष दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. या संघर्षाची सद्यस्थिती आणि संघर्षावर शासनाच्या वतीने केल्या जाणाऱ्या उपाययोजना यांचे संकलन केले आहे वन परिक्षेत्र अधिकारी श्री. धीरज ढेंबरे यांनी..

मानव वन्यजीव संघर्षाला त्यात समाविष्ठ वन्यप्राण्यांचा प्रकारानुसार वर्गीकृत केल्यास मुख्य करून मानव–वाघ (विशेषतः चंद्रपूर जिल्हा), मानव–इतर मांस भक्षक आणि तृण भक्षक (संपूर्ण राज्यात) व मानव जंगली हत्ती (सिंधुदुर्ग, कोल्हापूर, गडचिरोली व गोंदिया) या ३ प्रकारचे संघर्ष–दिसतात. राज्य शासनाकडून या तिन्ही प्रकारच्या मानव वन्यजीव संघर्षाला कमी करण्यासाठी विविध–उपाययोजना करण्यात आलेल्या आहे किंवा येत आहे.

### अ. मानव वाघ संघर्ष

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली व भारतीय वन्यजीव संस्था, देहरादुन यांचे वतीने चौथ्या भारतीय प्रगणना–२०१८ नुसार राज्यात ३१२ वाघांचे अस्तित्व आढळून आले असून त्यापैकी अंदाजीत १६६ वाघ फक्त चंद्रपुर जिल्ह्यात आढळून येतात. सदरील वाघ ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पासोबतच चंद्रपूर आणि गडचिरोली वनवृत्ताचे संरक्षीत क्षेत्राबाहेरील वनक्षेत्रात सुद्धा मोठ्या प्रमाणात आढळून येतात त्यामुळे मानव–वाघ संघर्ष वाढलेला आहे. सध्या असलेली वाघांची संख्या व त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.





मानव–वाघ संघर्ष कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. जनजागृती कार्यक्रम राबवविणे

एकटे जंगलात जावू नये यासाठी ग्रामसभेत आवाहन, धोक्याच्या इशाऱ्याची दवंडी देणे, प्रत्येक गावकऱ्याच्या घरी जावून (door to door campaign) काय करावे व काय करू नये याची सर्व कुटुंबास माहिती देणे, वरील सूचनांची प्रसिद्धी फ्लेक्स लावून गावात देणे, महत्त्वाच्या दिवशी वन्यजीव संवर्धनाचा संदेश देणारे कार्यक्रम साजरे करून मानव–वन्यप्राणी सह अस्तित्व बाबत जनजागृती करण्यात येत आहे.

२. भरकटलेल्या वन्य प्राण्यांची सुटका, पकडणे आणि स्थलांतर करणे

मानवी वस्तीत शिरलेल्या तसेच मानवी जिवीतास धोकादायक ठरलेल्या वन्यप्राणांना जेरबंद करण्यासाठी जलद बचाव पथक (RRT) तसेच स्थानिक स्तरावर निरीक्षण, जनजागृतीसाठी प्राथमिक बचाव दलाची (PRT) मदत घेण्यात येते. चंद्रपुर जिल्ह्यातील मानव–वन्यजीव संघर्षावर प्रतिबंधासाठी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांसह आवश्यक साहित्य उपलब्ध करून सुसज्ञ जलद बचाव पथक (RRT) तयार करण्यात आले आहे. मानव–वाघ संघर्ष प्रकरणी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मानवी जिवीतास धोकादायक ठरलेल्या वाघांच्या प्रकरणात प्रमाणभूत प्रचलित पद्धतीनुसार (SOP) विशेष समिती गठीत करून त्यांच्या अहवालानुसार

| अ.क्र. | क्षेत्र | वाघांची सध्या असलेली संख्या |
|---|---|---|
| 1 | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प | 86 |
| 2 | चंद्रपूर वनवृत्त (प्रादेशिक) | 117 |
| 3 | गडचिरोलीवनवृत्त (प्रादेशिक) | 27 |
| | **एकूण** | **230** |

वाघ व इतर वन्य प्राण्यांकडून मानवी जीवीतास हानी झाल्याच्या घटना खालील प्रमाणे आहेत.

| वर्ष | वन्यप्राण्यांकडून हानीची झालेली प्रकरणे | | | |
|---|---|---|---|---|
| | वाघ | बिबट | इतर | एकूण |
| 2017 | 24 | 14 | 16 | 54 |
| 2018 | 15 | 11 | 7 | 33 |
| 2019 | 24 | 8 | 7 | 39 |
| 2020 | 39 | 32 | 16 | 87 |
| 2021 | 54 | 24 | 6 | 84 |
| 2022* | 76 | 14 | 10 | 100* |

वरीलपैकी चंद्रपूर जिल्ह्यात वर्ष 2022 मध्ये वाघाद्वारे झालेली मनुष्य हानी खालील प्रमाणे आहे.

| जिल्हा | वाघाद्वारे झालेली मनुष्य मृत्यू संख्या (2022) |
|---|---|
| चंद्रपूर | 45 |
| गडचिरोली | 24 |
| **एकूण** | **69** |



संबंधित मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक/उप वनसंरक्षक यांच्याकडुन प्राप्त परिपूर्ण प्रस्तावांची छाननी करून राज्याचे मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य यांची तशी खात्री झाल्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या कलम (११) (१) (क) मध्ये प्राप्त अधिकारानुसार संबंधीत वाघास जेरबंद करण्याचे आदेश जारी करण्यात येतात. सद्यस्थितीत जानेवारी २०२२ पासून चंद्रपुर वनवृत्तात-१२ वाघांना मानवी जिवीतास धोकादायक ठरल्यामुळे जेरबंद करण्याचे आदेश जारी करण्यात आले असून त्यापैकी ६ वाघांना आतापर्यंत जेरबंद करण्यात आले असुन ६ वाघांच्या प्रकरणात कार्यवाही सुरु आहे.

**३. सानुग्रह अनुदान/नुकसान भरपाई**

वन्यप्राण्यांच्या हल्लयात मनुष्यहानी/जखमी, पशुधनहानी, शेतपिक नुकसान भरपाई देण्याची तरतूद राज्य शासनाकडून उपलब्ध करण्यात आली असून देण्यात येणारी सानुग्रह अनुदान/नुकसान भरपाईची रक्कम हि देशात सर्वात जास्त आहे. सदर ची बाब हि Right to Service अंतर्गत समाविष्ठ करण्यात आली असून घटने नंतर नुकसान भरपाई तातडीने दिली जाते.

**४. वाघांचे संवर्धन स्थानांतरण (Conservation/Translocation)**

चंद्रपूर जिल्हातील मानव वाघ संघर्ष अभ्यास समितीने केलेल्या शिफारशीला अनुसरून -प्रथम टप्प्यात ब्रह्मपुरी वनविभागातील ५ वाघ नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात स्थानातरण करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली असून आवश्यक ती मंजुरी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण व केंद्र शासनाकडून घेण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष वाघ जेरबंद करण्याची प्रक्रिया भारतीय वन्यजीव संस्थान मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

**५. मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी तांत्रिक समितीची शिफारशी**

विशेषतः चंद्रपुर जिल्ह्यात मानव वाघ वाढत्या संघर्षाच्या घटना पाहता शासनाने मुख्य वनसंरक्षक (प्रा) चंद्रपुर यांचे अध्यक्षतेखाली तज्ञांची तांत्रीक समीती मानव-वाघ संघर्षांच्या समस्येवर अभ्यास करण्यासाठी व उपाययोजना सुचविण्यासाठी स्थापित केली होती. सदर तांत्रीक समीतीने चंद्रपुर जिल्ह्याची क्षेत्रवार वर्गवारी करून वर्गवारी ३ च्या क्षेत्रातील तरुण वाघीनींचे वाघांसाठी योग्य अधिवासात लिप्यंतर स्थानांतरणाची व चंद्रपुर शहरालगत चंद्रपुर महाऔष्णिक विद्युत केंद्र, वेल्टर्न कोलफिल्डस् सारखे औद्योगिक क्षेत्र वर्गवारी ४ मधील क्षेत्रातुन वाघांची ईतर सुयोग्य क्षेत्रात स्थलांतरणाची शिफारस केली आहे. सदर तांत्रिक समितीच्या अहवालात राज्य वन्यजीव मंडळ तसेच राज्य शासनाने मान्यता दिली असून शासनाव्दारे समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची अमंलबजावणी करण्याचे निर्देश दिले असुन त्यादृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

**६.गावकऱ्यांचे वनांवरील अवलंबन कमी करणे**

गावकऱ्यांचे वनांवरील अवलंबन कमी करण्यासाठी अश्या प्रकारे बाधित गावांसाठी सर्वकष बाबीचा उपाय योजना समाविष्ठ असलेली डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना वर्ष २०१५-१६ पासून सुरुवात करण्यात आली असून वर्ष २०२१-२२ पर्यंत सदर योजने अंतर्गत

राज्यात एकूण १११२ गावांचा समावेश झालेला असून त्यापैकी चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात एकूण ३३३ गावांचा समावेश आहे.

**७. संरक्षित क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन**

राज्यात संरक्षित क्षेत्राच्या आत असलेले ११४ गावांपैकी आतापर्यंत ६६ गावांचे पुनर्वसन केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या धोरणानुसार स्वखुशीने झालेले आहे.

**मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी भविष्यात करणारे उपक्रम**

१. ज्या गावामध्ये मानव वन्यजीव संघर्ष तीव्र आहे अश्या संवेदनशील गावामध्ये अधिक प्रमाणात जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. विशेषत: तयार करण्यात आलेले जनजागृती वाहन गावागावात जावून जनजागृती करतील तसेच अशासकीय स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने जनजागृतीसाठी गावागावात पथनाट्य इत्यादी उपक्रम करण्याचे योजले आहे.

२. संवेदनशील गावांमधील कुटुंबातील किमान एक सदस्याला मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी काय करावे आणि काय करू नये याबाबतचा संदेश प्रसारित करण्यासाठी प्रशिक्षण देण्याचे योजले आहे.

३. कृषी, पशुधन, आदिवासी विकास, समाजकल्याण आणि इतर विविध विकास संस्थांचा समावेश असलेल्या समितीद्वारे पर्यायी उपजीविकेच्या क्रियाकलापांची ओळख करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे योजले आहे.

४. वाघांसाठी संवेदनशील गावामध्ये आधुनिक तंत्राच्या मदतीने शेताजवळ वाघांच्या हालचालींवर लक्ष ठेवून शेतकऱ्यांना लवकर इशारा देण्याचे उपक्रम करण्याचे योजले आहे.

५. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सध्यस्थितीत असलेल्या ४ जलद बचाव दल (RRT) यांना आधुनिक संयंत्र पुरवून सदर दलात प्रशिक्षित सदस्यांची नियुक्ती करणे व त्यांना नियमित प्रशिक्षण देणे तसेच राज्यातील इतर ठिकाणी असलेल्या जलद बचाव दल (RRT) यांना चंद्रपूर जिल्हासाठी पाचारण करण्याचे योजले आहे.

६. मानवी जीवतास हानी झाल्यास साध्या देय असलेली रक्कम रू.२० लाख वरून वाढवून रु. २५ लाख करण्याबाबतचे शासन निर्णय झाला आहे.

**ब. पशुधन हानी व पिकनुकसानी बाबत**

मागील काही वर्षात तृण भक्षक प्राण्यांची संख्या संपूर्ण राज्यात वाढलेली आहे. विकास कामामुळे अनेक ठिकाणी विस्तृत जंगल क्षेत्र हे विखंडीत झालेले आहे. गुरे ढोरे संख्या वाढलेली असल्याने त्यांची वनांवरील अवलंबनात वाढ झालेली आहे. त्यामुळे जंगलात नैसर्गिक गवत कमी झालेले असल्याने त्रण भक्षक प्राण्यांकडून शेत पिकांची नुकसानीची प्रकरणे वाढलेली आहे. त्याच प्रमाणे गुरे ढोरांचे जंगलात जाण्याचे प्रमाण वाढलेले असल्याने वन्यप्राण्यांकडून त्यांची जीवित हानीची संख्या सुद्धा वाढलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे. सदर परिस्थितीला आटोक्यात आणण्यासाठी राज्य शासनाकडून विविध उपाय योजना करण्यात येत आहे व नियोजित आहे.





| वर्ष | पिक नुकसानी | पशुधन हाणी प्रकरणे | |
|---|---|---|---|
| | | जखमी | मृत |
| **2019-20** | 90481 | 107 | 9600 |
| **2020-21** | 97742 | 183 | 9455 |
| **2021-22** | 87675 | 815 | 12145 |
| **2022-23** | 37623 | 522 | 7021 |

**पशुधन हानी व पिक नुकसानी कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.**

१. जनजागृती करणे

२. नुकसान भरपाई अदा करणे

३. गावकऱ्यांचे वनांवरील अवलंबन कमी करणे

४. संरक्षित क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन

(वरील उपाय योजने बाबत तपशील

अ. मानव-वाघ संघर्ष यामध्ये समाविष्ठ

५. शेताला/जंगलाला कुंपण करणे आहे)

ज्या शेतकऱ्यांची शेती जंगलाला लागून आहे असे शेतकऱ्यांना ७५% शासकीय अनुदानाने सौर उर्जा कुंपण/चेन लिंक कुंपण देण्यात येत आहे.

**पशुधन हानी व पिक नुकसानी कमी करण्यासाठी भविष्यात करणारे उपक्रम-**

१. वनक्षेत्रात गुरे चरू नयेत यासाठी मनरेगा आणि डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेच्या माध्यमातून गावागावात स्टॉल फीडिंगला चालना देण्याचे योजले आहे.

२. वन्य प्राण्यांमुळे पिकांचे नुकसान कमी करण्यासाठी पर्यायी पिकांबद्दल माहिती देण्यात येईल आणि त्याबाबत त्यांना प्रोत्साहन देण्यात येईल आणि मूल्यवर्धनाद्वारे कृषी उत्पन्न वाढविण्याबाबत योजले आहे.

३.सध्या देय असलेली शेत पिक नुकसानीच्या रकमेत दीडपट वाढ करण्याबाबतचे प्रस्ताव तयार करण्याचे प्रक्रिया विभाग स्तरावर सुरु आहे.

**क. मानव- जंगली हत्ती संघर्ष**

महाराष्ट्र राज्यात हत्ती सन २००४ पासुन सिमावर्ती कर्नाटक राज्यातून कोल्हापुर व सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये प्रवेश करतात व पाच सहा महीने राहुन नंतर ते परत कर्नाटकात जातात. सद्या कोल्हापुर वनवृत्तामध्ये ७ हत्ती आहेत. त्यातील १ टस्कर हत्ती हा आजरा तालुक्यात स्थानिक झालेला आहे. बाकी ६ हत्ती कोल्हापुर-सिंधुदुर्ग जिल्हयात ये-जा करत असतात. मागील दोन वर्षांपासुन सिमावर्ती छत्तीसगड राज्यातून राज्यातील गडचिरोली जिल्ह्यात हत्ती प्रवेश करतात व गडचिरोली, गोदिया जिल्ह्यात राहुन परत जातात. याहीवर्षी सिमावर्ती छत्तीसगड राज्यातून ऑगस्ट २०२२ मध्ये २३ हत्तीच्या कळपाने गडचिरोली जिल्ह्यात प्रवेश केला असून



गडचिरोली, वडसा वनविभागात ४०-५० दिवस राहून त्यांनी २४ सप्टेंबर २०२२ ला गोंदिया वन विभागात प्रवेश करुन व जवळपास २० दिवस राहून पुन्हा गडचिरोली जिल्हयात परत गेले व पुन्हा गोंदिया जिल्ह्यात दि. ०७ नोव्हेंबर २०२२ पासून परतले असुन भंडारा वनविभागात गोंदिया वनविभागात त्यांचे भ्रमण सुरु आहे.. हत्तीच्या गडचिरोली, वडसा, गोंदिया व कोल्हापुर वनविभागात भ्रमणकाळात खालीलप्रमाणे मनुष्यहानी,

पिक नुकसानी व मालमत्ता नुकसानीच्या घटना घडलेल्या आहेत.

**मानव जंगली हत्ती संघर्ष कमी करण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.**

१. वनहत्तींना प्रतिबंध करण्याकरीता वनकर्मचारी व हंगामी संरक्षण मजुर यांचे गस्ती पथक/हाकारा गट स्थापन करण्यात आलेले आहे व सदर पथकामार्फत फटाके, मशाल इत्यादी वस्तूंचा वापर करुन वनहतींना मानव वस्तीपासुन दुर करण्याचे कार्य करण्यात येत आहे.

२. हत्तींना जंगलाच्या दिशेने मार्गस्थ करण्याकरिता अनुभवी १४ लोकांची चमू (हुल्ला पार्टी) प. बंगाल राज्यातून बोलविण्यात आलेली आहे. सदर हुल्ला पार्टी प्रशिक्षित व अनुभवी असल्याने हत्तीच्या कळपाबरोबर राहुन हत्तीपासुन घर नुकसान व पिक नुकसान कमी करणे व हत्तीचा कळप गावात येण्यापासुन अटकाव करणे याबाबत दिवसरात्र कार्यवाही करत आहे. तसेच त्यांचेकडुन वनमजुरांना प्रशिक्षण देणे चालु आहे..

३. जंगली हत्तींचा कळप जंगलात कोणत्या ठिकाणी आहे व कोणत्या दिशेने वाटचाल करत आहे याची स्थिती समजण्यासाठी थर्मल ड्रोनचा वापर प्रभावीरित्या करण्यात येत आहे. त्यामुळे स्थानिकांना आगाव सुचना देवून पिक नुकसान व घर नुकसान कमी होण्यास मदत मिळत आहे.

४. कोल्हापुर वनवृत्तात हत्ती मालकी क्षेत्रामध्ये येवु नये म्हणुन वनहद्दी

| अ.क्र. | वनविभाग | पिक नकसानी च्या घटना | दिलेली नुकसान भरपाई | मानवी मृत्यु घटना | अर्थ सहाय्य रक्कम | मालमत्ता नुकसानी च्या घटना | नुकसान भरपाई रक्कम | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | रक्कम (लक्षामध्ये) |
| 1 | गडचिरोली | 44 | 4.99 | 1 | 20 | 29 | 7.89 | 32.28 |
| 2 | वडसा | 144 | 14.66 | 0 | -- | 11 | 0.55 | 15.54 |
| 3 | गोंदीया | 202 | 18.48 | 1 | 20 | 11 | 12.62 | 51.1 |
| 4 | कोल्हापूर | 170 | 14.8 | -- | -- | -- | 0.22 | 15.02 |
| **एकूण** | | **560** | **35.26** | **2** | **40** | **51** | **21.28** | **114.54** |

लगत हत्ती प्रतिबंधक चर (EPT) खोदण्यात आलेले आहेत.

५. नैसर्गिक अधिवासांच्या गुणवत्तेत बांबू, कुरण विकासाची कामे करुन तथा विशेष वनतळे तयार करुन वाढ करण्यात येत आहे. त्यामुळे वनहत्ती चाऱ्या व पाण्याकरीता गाव तलावावर येणार नाही व पिकहानी तसेच मनुष्यहानी होणार नाही.

६. ज्या ठिकाणी हत्तींच्या उपद्रवामुळे शेतीचे व घराचे/मालमत्ता/शेतीपुरक अवजारे यांचे नुकसान झालेले आहे. अशा प्रकरणी तात्काळ पंचनामे करण्यात येत असुन शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई रक्कम देण्यात येत आहे.

७. कर्मचाऱ्यांना हत्ती या वन्यप्राण्याबाबत व वन्यप्राण्यांच्या सवयी, त्यांचे खाद्य, पाणी, भ्रमंती मार्ग इत्यादीचा शास्त्रोक्त पध्दतीने अभ्यास होण्याकरिता प्रशिक्षण देण्यात आले/येत आहे.

८. वनहत्तीपासुन होणाऱ्या नुकसानीबाबत वनकर्मचारी व संयुक्त वनव्यवस्थापन समिती मार्फत ग्रामसभा घेवून लोकांना हत्तीपासून शेतपिक नुकसान न होणे व स्वतः जिवीताचे संरक्षण करणेबाबत जनजागृती करण्यात येत आहे. वनक्षेत्रपाल यांच्या सर्व वाहनांवर अम्लीफायर लावण्यात आले असुन त्याद्वारे दररोज गावामध्ये सकाळ-संध्याकाळ दवंडी देण्यात येत आहे. तसेच हत्ती बाधीत क्षेत्रात माहिती फलक लावण्यात येत आहेत.

◆ ◆ ◆





# अर्जुन
# आजन

श्रीमती गीता नन्नावरे
विभागीय वन अधिकारी, नागपूर

आयुर्वेदामध्ये अर्जुन या झाडाला खूप मोठे महत्त्व आहे. शरीराच्या विविध व्याधींवर विशेषतः हृदयरोगावर अर्जुन हे रामबाण औषध मानले जाते. पर्यावरणात देखील अर्जुनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. विभागीय वन अधिकारी श्रीमती गीता नन्नावरे यांनी अर्जुनाच्या झाडाबद्दल अधिक माहिती या सदरात दिलेली आहे.

## शास्त्रीय नाव - *Terminalia arjuna*
## *Family -Combretaceae Terminalia*
## फांद्या, उपफांद्यांच्या टोकाला पाने व फुले (मोहोर) येणारा वृक्ष

अर्जुन वृक्ष हा नेहमी नदी नाल्याच्या काठावर वाढत असल्यामुळे पानगळ होत नाही परंतु, इतरत्र वाढणाऱ्या अर्जुनाची पाने मार्च-एप्रिल महिन्यात गळून पडतात व लगेच नवीन पालवी फुटते. एप्रिल-मे महिन्यात फांद्यांच्या टोकांना फुलांचे तुरे येतात, सुरुवातीला पांढुरके असणारे तुरे नंतर पिवळसर होत जातात. तुऱ्यांमध्ये ४ ते ५ मिलिमीटर आकाराची फुले दाटीवाटीने एकवटलेली असतात. फुलांमध्ये, पाच संदल एकत्र येऊन पेल्याचा आकार परिधान करतात, त्यातून पाच मोठे व पाच छोटे पुंकेसर बाहेर डोकावत असतात.

तब्बल एक वर्षानंतर म्हणजेच पुढील एप्रिल-मे महिन्यात फळे परिपक्व होतात. फळे सुरुवातीला हिरव्या रंगाची व ३ ते ५ सेंटीमीटर लांबीची असून त्याला ५ ते ७ अरुंद पंख असतात. फळे परिपक्व झाल्यावर कडक व तपकिरी रंगाची होतात, परिपक्व झालेली फळे खाली गळून पडतात व नाल्याच्या प्रवाहासोबत वाहत जाऊन किनाऱ्यावर रोपे उगवून येतात.

अर्जुन हा अत्यंत गुणकारी औषधी वृक्ष आहे. अर्जुनारिष्ट हे हृदयासाठी असलेलं सुप्रसिद्ध औषध याच्या सालीपासूनच तयार करतात. विंचू दंशावर देखील अर्जुनाच्या सालीचा लेप लावला जातो. कातडे कमावण्यासाठी तसेच रंगवण्यासाठी देखील अर्जुन सालीचा उपयोग केला जातो. पाने रेशीम किड्याच्या पोषणासाठी वापरली जातात.

मुख रोगात देखील अर्जुनाची पाने आणि सालीचा रस वापरला जातो. अर्जुनाचे लाकूड लालसर रंगाचे असते, त्याचा उपयोग बैलगाडी, शेतीची अवजारे, होड्या बनवण्यासाठी केला जातो. लाकडाला भेगा पडत असल्याने त्याचा फर्निचर तसेच इमारती बांधकामासाठी वापर केला जात नाही. नदी-नाल्याच्या काठची धूप थांबवण्यासाठी तसेच पाण्यातील क्षारता कमी करण्यासाठी अर्जुन वृक्षाची लागवड करणे गरजेचे आहे.

◆ ◆ ◆









# अरवलीच्या व्याघ्र वस्तीतील भटकंती

## रणथंबोर व्याघ्र प्रकल्प, राजस्थान

**अतुल धामणकर**
**वन्यजीव लेखक**

वन्यजीव लेखक श्री. अतुल धामणकर...भारतातली बहुतांश संरक्षित क्षेत्रे अक्षरशः पालथी घातलेले व्यक्तिमत्त्व. या सदरातून भारतातल्या वेगवेगळ्या व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये याची माहिती आपल्याला या सदरातून मिळणार आहे. अरवली पर्वतात विसावलेल्या रणथंबोर व्याघ्र प्रकल्पाची भ्रमंती या महिन्यात आपल्याला करता येणार आहे.



**राज्य–राजस्थान**

**जिल्हा–सवाई माधोपूर**

**कुठे आहे–अरवली आणि विंध्य पर्वतरांगांच्या मध्ये**

**अंतर–सवाई माधोपूरपासून १५ कि.मी.वर आहे.**

भर दुपारचा हॉटेलमध्ये आलेल्या कँटरमध्ये बसून मी बाहेर पडलो. एप्रिल महिना असल्याने राजस्थानची उष्णता अंगाला चांगलेच चटके देत होती. गरम वाऱ्याच्या उष्ण झळा श्वासासोबत आतवर जाऊन घसा वारंवार कोरडा पाडत होत्या. लवकरच रणथंबोरच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोहोचलो आणि समोरच अरवली पर्वतरांगांमध्ये वसलेलं रणथंबोरचं सुप्रसिद्ध जंगल दिसू लागलं. उष्णकाळ सुरू असल्याने या जंगलाची पार रयाच गेली होती. फक्त काही जागी डोंगरउतारावर फुललेल्या पळसाच्या रक्तीम लालिमेचा डोळ्यांना दिलासा वाटला. बाकी सगळे जंगल पानगळीचा शाप भोगत करडं पडलं होतं.

सगळे सोपस्कार पार पडले आणि आमचे कँटर प्रवेशद्वारातून आत शिरून वेगाने धावू लागले. डावीकडे एक मोठा नाला होता. त्याच्या काठावर झाडांच्या सावलीत दोन मगरी आरामात पसरल्या होत्या. एवढ्या दुपारी मगरींना 'बास्किंग' करताना पाहून मला जरा आश्चर्यच वाटलं.

आमचा तीन नंबरचा रूट होता. मुख्य द्वारालगतच्या वडाच्या झाडावर बरीच वानरं पळापळीचा खेळ खेळत होती. काही वानरं उष्णतेने त्रासून डोळे मिटून पेंगत होती. आयांनी आपापली पोरं पोटाशी नीट धरून ठेवली होती; पण तरीही एखादं वात्रट पोरगं हळूच जाऊन दुसऱ्याची शेपूट खेचून यायचं. उजवीकडे उंचच उंच कड्यावर गेलेला रणथंबोरचा प्रचंड किल्ला दिसला. पायथ्याशी एका चौथऱ्यावर बऱ्याच जागी दाणे, चणे–फुटाणे टाकले होते. तिथे टकाचोर, पोपट, पीतकंठी चिमण्या आणि वानरांची एकच झुंबड उडाली होती.

रणथंबोरचा किल्ला राजा हमीरने बांधला होता. या किल्ल्यावर एक गणेश मंदिर असून तिथे भक्तांची बरीच गर्दी दर्शनासाठी जमते; पण या गर्दीमुळे या व्याघ्र प्रकल्पाला बराच त्रास सहन करावा लागतो. वन्यजीव–पाखरांना खाणं टाकणं, प्लास्टिक कचरा इतस्ततः टाकणं, दिवसरात्र लोकांची वर्दळ याचा त्रास इथल्या वाघ व वन्यजीवांसाठी रोजचाच झाला आहे.

कँटर आत शिरताच मला डावीकडे, रस्त्यालगतच निळ्याशार पाण्याने भरलेले तलाव दिसले. या रखरखीत, करपल्यासारख्या दिसणाऱ्या अरण्यात हा डोळ्यांना सुखावणारा देखावा होता. हा आहे 'पद्म तलाव.' यात जागोजागी कमळं फुलतात म्हणून याला हे नाव पडलं आहे. उष्ण काळात वन्यजीवांच्या अंगाची लाही–लाही होतच असणार. मग त्यांची पावलं आपसूकच या तलावाकडे वळतात. आत्तादेखील तलावाकाठी वानरांची एक टोळी पाणी पिण्यासाठी जमली होती; पण जंगलात पाण्याच्या जागा या सगळ्यात धोकादायक असतात, हे यांना अनुभवानं माहीत असावं. दोन–तीन वानरं पाण्याला तोंड लावायची तेव्हा बाकीची चौफेर नजरा फिरवून धोक्याचा अदमास घेत होती. काठावरचे चार कांडेसर, दोन टिटव्या, तीन चक्रवाक शांतपणे बसले होते.

पद्म तलावावरून आम्ही राजबाग तलावावर गेलो. हे खरे वाघांचे ठिकाण. आजवर रणथंबोरवर अनेक देशी–विदेशी वन्यजीव प्रकाश चित्रकारांनी उत्तम फिल्म्स बनवल्या आहेत. त्यातील पन्नास टक्के फिल्म्सचं शूटिंग याच तलाव आणि त्याच्या आसपासच्या परिसरात झालेलं आहे. या तलावाच्या काठावर कंबरेएवढं उंच गवत माजलेलं होतं. त्यात लपून बसणं



वाघांसाठी खूपच सोईचं होतं.

पण आता मात्र इथं गुडघाभर पाण्यात उतरून चार-पाच सांबरं निवांतपणे पाणवनस्पती खाण्यात गुंग झाली होती. त्यांचा आकार मध्य भारतात आढळणाऱ्या सांबरांपेक्षा जास्तच मोठा दिसत होता. कदाचित डोंगराळ भागात ते वावरत असल्यामुळे तसं असावं. थोड्या वेळाने परत तिथं येण्याचं ठरवून आम्ही निघालो.

मलिक तलाव हे आणखी जवळचे एक पाणस्थळ. एकाच परिसरात जवळ-जवळ तीन मोठे तलाव असणं, हीच वन्यजीव आढळण्याची मोठी संधी होती. मलिक तलावाकडे जाताना चितळांचा एक मोठा कळप रस्ता ओलांडून गेला. त्यातील पाच-सहा नरांची शिंगं तर फारच मोठी होती. पुढे एका जागी दोन नीलगाई दिसल्या. मध्येच राखी तितर, मोठा माळकुरलचेही दर्शन झाले. मलिक तलावावर जाऊनही आम्ही रिकाम्या हातानेच परतलो. मग मी संध्याकाळचा वेळ राजबाग तलावावरच घालवायचं ठरवलं. तिथं वन्यजीव दिसण्याची शक्यता जास्त होती.

परत राजबागला परतलो तर पार पलीकडचा राजाचा 'शिकार महल' दृष्टीला पडला. आता ओस पडलेल्या या महालात बऱ्याचदा जंगलाचा राजा वास्तव्याला येतो. तसे फोटो प्रसिद्ध झाल्यामुळेच रणथंबोर वाघांचे एक वेगळे जंगल म्हणून जगप्रसिद्ध झाले आहे.

राजबाग तलावावर पोहोचून एक मोकळी जागा पाहून कँटर पार्क केला. इथून सगळा तलाव माझ्या नीट दृष्टिक्षेपात येत होता. आता पाण्यात उतरलेल्या सांबरांची संख्या वाढून दहा-बारा झाली होती. एखाद्या सांबराच्या पाठीवर बसून बगळा फुकटची सवारी करीत होता. सगळं जंगल कसं शांत, निवांत भासत होतं..

पण ही वादळापूर्वीची शांतता होती. मला तेवढ्यातच मागच्या अरण्यात फार दुरून चितळाचा 'अलार्म कॉल' ऐकू आला. मी सजग झालो आणि दुर्बीण हातात घेऊन तो परिसर बारीक नजरेने चाळू लागलो. थोडाच वेळ गेला आणि वाळक्या 'धोंक' वृक्षांच्या मागे झालेली थोडीशी हालचाल माझ्या डोळ्याने टिपली. दुर्बिणीतून पाहून ती वाघीण असल्याची माझी खात्री झाली. झाडा-झुडपांचा आडोसा घेत ती वाघीण आली आणि काठावरच्या वाळक्या गवतात शिरली.

मी श्वास रोखून तिच्याकडे पाहू लागलो. ही 'टी-१९' नाव दिलेली तरुण वाघीण होती. जगभर प्रसिद्धी पावलेल्या 'मछली'ची ही पिलू. हिच्या गळ्यात संशोधनासाठी 'रेडिओ कॉलर' लावलेला होता. 'टी-१९' ची नजर पाण्यात उतरून चरणाऱ्या सांबरांवर खिळली होती. ती सावली सरकावी तशी गवताचा आडोसा घेऊन हळूहळू पुढे सरकू लागली. आज शिकार बघायला मिळणार या जाणिवेने माझे ओठ सुकले, हृदय जोरजोरात धडधडू लागले.

शेवटी हळू हळू पुढे येत 'टी-१९' गवताच्या काठापर्यंत आली. इथून पुढे गवताचा आडोसा नव्हता. बाजूलाच माझा कँटर उभा होता. त्यानंतर तिने एक फारच अनपेक्षित गोष्ट केली. ती चक्क गवताचा आडोसा सोडून आमच्या कँटरमागे आली. मी चकित झालो. पर्यटकांच्या कँटर किंवा जिप्सीचा आडोसा घेऊन शिकार करणारी वाघीण मी माझ्या २३ वर्षांच्या व्याघ्र अभ्यासात कधीच पाहिली नव्हती.

कँटरमधून अगदी खाली आलेली वाघीण पाहून अनेकांच्या काळजाचा ठोकाच चुकला. हळूहळू पुढे सरकत ती बाहेर निघाली; पण त्याच वेळी एका सजग सांबराची तिच्यावर नजर पडली. त्याने जोराचा 'पॉक' असा इशारा दिला. पुढचा पाय पाण्यात आपटला. आता सांबरं सावध झाली आणि





वाघिणीकडे पाहू लागली. वाघीण उघड्यावर असली तरी दगडासारखी निश्चेष्ट झाली होती. अचानक पाण्याचा खळबळाट उडवत सांबर पळू लागली. त्यांना वाट ओलांडण्यापूर्वीच धरावं, म्हणून टी-१९ ही वेगाने रस्त्याला समांतर धावली; पण सांबरांचं दैव बलवत्तर होतं. त्यांच्यातील एक सांबर तर अवघ्या तीन-चार फुटांच्या अंतराने वाघिणीच्या तावडीत सापडण्यापासून बचावला. मी या रोमांचक नाट्याने स्तिमित झालो. हीच रणथंबोरच्या जंगलाची न संपणारी जादू आहे.

**अरण्याबद्दल थोडंसं -**

एके काळी जयपूरच्या महाराजांचं खासगी शिकारीचं अरण्य असलेलं रणथंबोर १९७३ साली 'व्याघ्र प्रकल्प योजने'खाली वाघांसाठी संरक्षित करण्यात आलं. त्याआधी १९५५ साली या जंगलाला 'सवाई माधोपूर वन्यजीव अभयारण्य' असा संरक्षण दर्जा मिळालेला होता. २७४ चौ.कि.मी. क्षेत्रफळाचे जंगल १९८० साली राष्ट्रीय उद्यान घोषित करण्यात आले. १९९२ साली केलादेवी अभयारण्याचा ६७४ चौ.कि.मी., सवाई मानसिंग अभयारण्याचा १२७ चौ. कि. मी. आणि बुवालजी अभयारण्याचा ७.५८ चौ. कि.मी.चा भागदेखील या राष्ट्रीय उद्यानात जोडून याचं क्षेत्रफळ १,१७४ चौ. कि.मी. एवढं वाढवण्यात आलं.

**कशी कराल भ्रमंती**

रणथंबोरला सकाळी आणि दुपारी अशा दोन जंगल सफारीच्या साधारणतः तीन ते साडेतीन तासांच्या वेळा ठरलेल्या आहेत. इथे पार्कमध्ये फिरण्यासाठी सामान्यतः १६ ते २० सीटचे उघडे कँटर आणि ६ माणसं बसू शकतील अशा जिप्सी उपलब्ध आहेत. जिप्सी फार महाग असल्याने कँटरची सफारीदेखील मजेशीर ठरू शकते. फोटोग्राफर असल्यास जिप्सी घेणे श्रेयस्कर. कारण कँटरमध्ये फक्त पिकनिकला आलेली लोकंदेखील येत असून त्यांचा ताप होऊ शकतो.

इथे प्रत्येक वाहनानी वनखातं आधीच एक विशिष्ट रूट नंबर देतं. केवळ त्याच रस्त्याने फिरण्याचं बंधन असतं. २, ३, ४, ५ हे रस्ते तलाव व घनदाट जंगलातून जात असल्याने वन्यजीव निरीक्षणाची जास्त संधी असते. १ व ६ या लहान वाटा असून काही वेळेस इथेही वाघ दिसतो.

**कशासाठी जाल**

वाघ, कलंदर (caraeal), पक्षी व उत्तम पर्वत व किल्ल्यांचा मनमोहक देखावा.

**वनस्पती**

रणथंबोरचे जंगल काटेरी, शुष्क पानगळीचे असून इथे डोंगर-दऱ्यांची कमतरता नाही. धोंक (Dhonk) हे इथले प्रमुख वृक्ष असून त्यानेच ६० टक्के जंगलाचा भाग व्यापलेला आहे. त्याशिवाय इथे करू, धावडा, साग, बाभळी, बोर, खैर या सोबतच विविध जातींच्या निवडुंगाची देखील इथं गर्दी झाली आहे.

**वन्य प्राणी**

रणथंबोरला जाणाऱ्या पर्यटकांचे प्रमुख आकर्षण बहुतेक वेळा वाघच असतो. इथले जंगल बरेच मोकळे व विरळ असल्याने वाघाचे अगदी दुरूनदेखील दर्शन होऊ शकते. मागील कित्येक दशकांपासून पर्यटक व त्यांच्या गाड्या पाहून इथल्या वाघांना त्यांची सवय झालेली आहे. त्यामुळे रणथंबोर हे वन्यजीव प्रकाशचित्रकारांचे नंदनवन समजले जाते. खुलं जंगल, मुबलक प्रकाश, सहजतेने दिसणारे वाघ व इतर वन्य प्राणी यांची प्रकाशचित्रकाराला भुरळ पडतेच.

वाघाशिवाय इथे बिबळ्या व कलंदर या वनमार्जारांचाही वास आहे. बिबळ्या क्वचित कड्यांवर बसलेला दिसू शकतो; मात्र माळरानातच वावरणारा दुर्मीळ कलंदर दिसणं हा कपिलाषष्ठीचाच योग समजायला हवा. इथल्या प्रमुख वन्य प्राण्यांमध्ये झिपरे अस्वल, चितळ, सांबर, चौशिंगा, चिंकारा, रानडुक्कर, साळिंदर, तरस, कोल्हा, नीलगाय, वानर, खवल्या मांजर यांचा समावेश आहे.

**पक्षीजीवन**

इथे प्रामुख्याने टकाचोर, सर्पगरुड, करकोची चोचीचा खंड्या, शबल खंड्या, कांडेसर, लावे, तितर, पोपट, नीलपंख, वेडा राघू, राजगिधाड व इतर गिधाडं, शृंगी घुबड, पठाणी होला, सुताराचे अनेक प्रकार, हुदहुद व पाणपक्ष्यांमध्ये स्थलांतरित चक्रवाक, लालसरी, चिखले, सरगे हे बदक, जलकपोत, नीलकमल, जांभळी पाणकोंबडी हे पक्षी प्रामुख्याने दिसतात. एकूण ३०० पेक्षा जास्त पक्षी इथे आढळतात.

**सरपटणारे जीव –**

इथल्या तलावात सकाळी उन्हात पहुडलेल्या मगरी (Marsh Crocodile) नेहमीच दिसतात. त्याशिवाय घोरपड, अजगर, रानसरडा, सापसुरळी, पाणकासव, नाग, घोणस, फुरसे, पाणदिवड, धामण यांचेही वास्तव्य आहे.

**काय – कुठे बघाल –**

तीनही तलावांच्या परिसरातलं वन्यजीव व पक्ष्यांचं वास्तव्य उत्तम आहे. रूट नं. २ व ६ नं. ला वर चिंकारा बऱ्याच वेळेस दिसतो. फिरताना उंच कड्यांवर नजर असावी, कारण अनेकदा तिथं बिबळा किंवा गिधाडं बसलेली असतात.

**रणथंबोरच्या आसपास**

१) रणथंबोर किल्ल्यावरचं गणेश मंदिर व किल्ला.

२) जोगी महल. त्यामागेच भारतातील दुसऱ्या क्रमांकाचं मोठं वडाचं झाडही बघू शकाल.

**कसे जाल –**

जवळचे विमानतळ–जयपूर–१७६ कि.मी.

टॅक्सी व बसने सवाई माधोपूरला येता येतं. जवळचे रेल्वे स्टेशन सवाई माधोपूर (१५ कि.मी.) मुंबई–दिल्ली रूटच्या सगळ्या गाड्या इथे थांबतात. सगळी हॉटेल्स आणि रिसॉर्टस् सवाई माधोपूरच्या जवळपासच स्थित आहेत. टॅक्सी किंवा ऑटो रिक्षाने जाता येतं. जवळचे बस स्थानक सवाई माधोपूर (१५ कि.मी.) कुठे राहाल

रणथंबोरमध्ये भरपूर हॉटेल्स आणि रिसॉर्टस् आहेत. अगदी पंचतारांकितपासून कमी बजेटच्या हॉटेल्सची इथे उपलब्धता आहे. आरटीडीसीच्या वेबसाईटवरून पण त्यांच्या हॉटेलचे बुकिंग करता येईल. इथे येताना आधीच हॉटेलचं बुकिंग करून जाणं चांगले.

१) आरटीडीसी झूमर बावडी – आरटीडीसी वेबसाईटवरून बुकिंग.

२) हॉटेल देवविलास –

(फोन) ०११–५१५१४१२०

३) पगमार्क रिसॉर्ट –

(फोन) – ०११– ४१६४४९४९

पार्क सफारीसाठी–इथे पार्क सफारीच्या प्रवेशपत्राचं ऑनलाईन बुकिंग होत.

त्याकरिता राजस्थान वन विभागाच्या वेबसाईटवर जाऊन बुकिंग करता येतं. बुकिंग लवकरात लवकर केल्यास चांगलं. त्यामुळे रणथंबोरची सफर आनंदाने व मजेने करून वन्यजीव निरीक्षणाचा मनसोक्त आनंद लुटता येईल. ◆ ◆ ◆









# कुख्यात 'खवलेमांजराची शिकारभूमी' ते 'खवलेमांजर संवर्धकभूमी' कडील प्रवास

**श्री. मदन क्षीरसागर**
वनपरिक्षेत्र अधिकारी,
सावंतवाडी वनविभाग

सदरची यशोगाथा ही, महाराष्ट्रातील पश्चिम घाटात वसलेल्या जैवविविधत संपन्न अशा सावंतवाडी वन विभागातील, दोडामार्ग परीक्षेत्रामध्ये स्थानिक शेतकरी व नागरिकांच्या मदतीने वन विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी पृथ्वीतलावर दुर्मिळ होत चाललेल्या तसेच जगात सर्वात जास्त शिकार करून तस्करी होत असलेल्या खवलेमांजर (Pangolin) या अद्‌भुत सस्तन प्राण्याच्या संरक्षणासाठी उचलेल्या एका छोट्याशा पाऊलाचे संक्षिप्त वर्णन आहे.

दोडामार्ग तालुक्याचे अनन्यसाधारण भौतिकस्थान दोडामार्ग तालुका हा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे तसेच महाराष्ट्र राज्याचे अगदी दक्षिणेकडील टोक आहे. गोवा व कर्नाटक या दोन्ही राज्यांची सीमा लाभलेला महाराष्ट्रातील हा एकमेव तालुका. 'महाराष्ट्राचे ॲमेझोन' म्हणून ओळख असलेल्या, जैवविविधतेने समृद्ध अशा, तिलारी जंगलाचा समावेश असलेला असा हा प्रदेश. इथल्या समृद्ध जंगलांमुळे खवले मांजरासारख्या असंख्य दुर्मिळ वन्यजीवांचा अधिवास येथे असल्याचे दिसून येते. मागील काही वन्यजीव शिकारींच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपींवरून महाराष्ट्र राज्यासह शेजारीच असलेल्या कर्नाटक व गोवा राज्यातील वन्यजीव तस्करांचा देखील या तालुक्यामध्ये अवैद्य वन्यजीव शिकार व तस्करीसाठी वावर असल्याचे दिसून आलेले आहे.

**दोडामार्ग परीक्षेत्र –**
**कुख्यात 'खवले मांजराची शिकारभूमी'**

यापूर्वी सावंतवाडी वन विभागामध्ये उघड झालेल्या खवल्या मांजर शिकारींच्या काही वनगुन्ह्यांमध्ये आरोपींनी दोडामार्ग भागातून खवलेमांजर पकडले असल्याचे उघड झालेले आहे. त्यादृष्टीने दोडामार्ग तालुक्याची 'खवलेमांजरांची शिकारभूमी' म्हणून कुख्याती झालेली होती.

तसेच सावंतवाडी वन विभागाच्या शेजारी असणाऱ्या कोल्हापूर, सातारा व सांगली या वन विभागामध्ये देखील उघड झालेल्या खवल्यामांजर शिकारींच्या काही घटनांमध्ये कोकणात खवलेमांजर पकडून त्या भागात त्याची तस्करी केली जात असल्याच्या घटना दिसून आलेल्या आहेत. शेजारीच असलेल्या गोवा व कर्नाटक राज्यांतील खवलेमांजर तस्कर दोडामार्ग भागात शिकारीसाठी फिरत असल्याची देखील शक्यता नाकारता येत नव्हती.

**१) दोडामार्ग परीक्षेत्राचा 'खवलेमांजर संवर्धकभूमी'कडील प्रवास**

वरील सर्व आव्हानात्मक परिस्थितींमध्ये स्थानिक नागरिकांच्या सहकार्यातून दोडामार्ग परीक्षेत्रातील वनकर्मचारी यांचेकडून खालील काही मार्गांनी खवलेमांजर या कोकणातील दुर्मिळ ठेव्याचे जतन करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. खवलेमांजर या दुर्मिळ वन्यजीवाला संरक्षित करण्यासाठी 'खवलेमांजर वाचवा मोहीम' स्थानिक नागरिक व शेतकरी वर्ग यांच्या सहकार्य व सहभागाशिवाय अशक्य असल्यामुळे दोडामार्ग परिक्षेत्र कार्यालयातील वनकर्मचारीवर्ग यांनी आपल्या मोहिमेमध्ये स्थानिक नागरिक व शेतकरी वर्ग सामील करून घेण्यासाठी प्रयत्न सुरु केले. त्यासाठी गावांच्या ग्रामसभा, जत्रा या सार्वजनिक मेळाव्यांच्या ठिकाणी मोठ्याप्रमाणावर नागरिकांचे व शेतकरी बांधवांचे प्रबोधन करून व खवलेमांजराचे आपल्या परीसंस्थेतील असलेले अनन्यसाधारण महत्व लोकांना पटवून देण्यात आले. तसेच प्रबोधनपर माहितीफलक बसविण्यात आले. खवलेमांजराविषयी असलेल्या भ्रामक कल्पना, गैरसमज व अंधश्रद्धा यांचे निराकारण करण्यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्था, निसर्ग अभ्यासक यांची मदत घेण्यात आली.

**२) स्थानिक प्रथा-परंपरा व 'खवलेमांजर वाचवा मोहिम'यांची सांगड.**

दोडामार्ग भागात असलेल्या सातेरी मंदिरांची वारूळ पूजण्याची पारंपारिक प्रथेची सांगड 'खवले मांजर वाचवा' या मोहिमेला देण्यात आली. 'खवलेमांजर संवर्धनही आपल्या कोकणवासीयांची पुर्वजांपासून सुरु असलेले प्रथा-परंपरा, दैवी कार्य आहे. आपल्या पूर्वजांनी कोकणातील प्रत्येक गावात एक सातेरी मंदिर स्थापन केले. ज्यामध्ये आपण वारुळाची पूजा करतो, त्याचे संरक्षण-संवर्धन करतो. त्या वारुळात राहणाऱ्या मुंग्या, वाळवी हेच खवल्यामांजराचे प्रमुख खाद्य आहे. म्हणजे आपल्या सामाजिक प्रथांमधून आपले पूर्वज सुद्धा अनंत काळापासून या अद्भुत वन्यजीवाचे संरक्षण करीत आलेले आहेत, हे समाजमनावर बिंबविण्याचे कार्य यामुळे घडून आले. ज्यामुळे खवलेमांजर संरक्षणाकडे समाजातून एका दैवी कार्याच्या दृष्टीकोनातून पहिले जाऊ लागले.






**३) खवले मांजर वाचवा मोहिमेमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहनपर बक्षीस.**

खवले मांजर नागरीवस्तीमध्ये आढळून आल्यास त्याला संरक्षण देऊन वन विभागाला कळविणाऱ्यास, अथवा संकटात सापडलेल्या खवले मांजराचे प्राण वाचविणाऱ्यास 'खवलेमांजर संवर्धक' म्हणून परिक्षेत्र कार्यालयाकडून १००० रु. चे प्रोत्साहनपर बक्षीस देऊन त्यांचा सन्मान करण्यात येई. त्याच प्रकारे खवलेमांजर शिकारीविषयी परिक्षेत्र कार्यालयास गुप्त बातमी देणाऱ्यास देखील त्याचे नाव गुपित ठेवत सदरचे प्रोत्साहनपर बक्षिस देण्याची घोषणा करण्यात आली.

**४) शाळा, कॉलेज मधील विद्यार्थ्यांच्या प्रबोधनातून स्थानिक युवाशक्तीचा 'खवलेमांजर वाचवा मोहिमे' मध्ये सहभाग**

दोडामार्ग तालुक्यामध्ये असलेल्या महाविद्यालयीन तसेच कॉलेजमधील विद्यार्थी बांधवांमध्ये विविध जनजागृतीपर कार्यक्रमांच्या माध्यमातून खवलेमांजराविषयी प्रबोधन केले गेले. ज्यामुळे ही युवाशक्ती वनविभागाच्या खांद्याला खांदा लावून खवलेमांजर वाचविण्यासाठी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवू लागली. महाविद्यालयीन तसेच कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या सोशल मीडिया ग्रुप्सवर खवलेमांजर जनजागृतीपर संदेश, छायाचित्र पाठवून ते सर्व विद्यार्थी मित्रांपर्यंत पोहोच केले गेले. ज्यामुळे व्हॉटसप, फेसबुक या समाजमाध्यमांचा देखील यामध्ये उपयोग झाला.

**५) खवलेमांजर शिकार रोखण्यासाठी व गुप्तवार्तेसाठी पोलीस खात्याशी समन्वय.**

खवलेमांजर वाचवा या मोहिमेअंतर्गत खवलेमांजर शिकाऱ्यांना पायबंद घालण्यासाठी व गुप्तवार्ता मिळविण्यासाठी पोलीस खात्याशी समन्वय ठेवून शिकार रोखणेबाबत उपाययोजना करण्यात आल्या. यासाठी पोलीस निरीक्षक दोडामार्ग यांचे अध्यक्ष्यतेखाली वन विश्रामगृह भेडशी येथे तालुक्यातील सर्व गावांच्या पोलीस पाटलांची बैठक घेण्यात आली. ज्यामध्ये त्यांना खवलेमांजर शिकारीसारख्या वनगुन्ह्यांना रोखण्यासाठी व वन विभागाला त्यासंबंधी गुप्तवार्ता पुरवण्यासंबंधी सूचना व मार्गदर्शन करण्यात आले.

**६) परिक्षेत्र कार्यालयीन अधिकारी व कर्मचारीवृंद यांचे खवलेमांजर शिकार रोखण्यासाठी वनकायदे बाबतचे प्रशिक्षण कार्यशाळा.**

खवलेमांजर तसेच इतर दुर्मिळ वन्यजीवांची शिकार व तस्करी करणाऱ्या अपप्रवृत्तींना कायदेशीर पायबंद घालणेसाठी क्षेत्रीय कर्मचारी वृंद, वनपाल, वनरक्षक यांना कायदेविषयी असलेल्या ज्ञानात भर पडावी यासाठी वनकायदे बाबतच्या प्रशिक्षण कार्यशाळा पार पडल्या. या कार्यशाळांमध्ये शिकारीबाबतच्या वन गुन्ह्यांना कसा पायबंद घालावा व प्रत्यक्षात शिकारीचा गुन्हा घडून आल्यानंतर आरोपींच्या विरोधात करण्यात येणारी कागदोपत्री प्रक्रिया याबबत प्रामुख्याने प्रशिक्षण देण्यात आले. 'खवले मांजर वाचवा मोहिमे'ला दोडामार्ग वासियांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद स्थानिक शेतकरी बांधव व दोडामार्गवासीय यांचेकडून या खवलेमांजर संवर्धनाच्याकामी मोलाचे सहकार्य व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेला, जो खवलेमांजर वाचविण्याच्या खालील घटनांवरून दिसून येतो.

**१) दोडामार्ग तालुक्यातील उगाडे गावामध्ये जाळीत अडकलेल्या खवलेमांजराला जीवदान.**

मौजे उघाडे येथील शेतकरी सखाराम राणे यांनी आपल्या घराच्या भोवती लावलेल्या नायलॅनच्या संरक्षण जाळीमध्ये अडकलेल्या खवलेमांजराविषयी तत्काळ दोडामार्ग परिक्षेत्र कार्यालयात संपर्क करून माहिती दिल्यामुळे त्या खवलेमांजराची सुखरूप सुटका करून त्याला नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.

**२) दोडामार्ग तालुक्यातील मौजे पिकुळे येथे मानवीवस्तीत आढळून आलेल्या खवलेमांजराची सुखरूप सुटका.**

मौजे पिकुळे येथे मानवीवस्तीत आढळून आलेल्या खवले मांजराची ग्रामस्थांनी कुत्र्यांपासून सुटका करून सुखरूपरित्या ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांनी लगेच वनपरीक्षेत्र कार्यालयाला याबाबत माहिती दिली. यामुळे ते खवलेमांजर पुन्हा नैसर्गिक अधिवासात मुक्त करता आले. यापुढे देखील या 'खवलेमांजर वाचवा मोहिमे'चा प्रवास यशस्वीपणे सुरु ठेवणे व त्यात उत्तरोत्तर प्रगती करत राहणे यासाठी सावंतवाडी वन विभाग कायमच कटिबद्ध आहे. खवलेमांजर या अद्भुत वन्यजीवाच्या संरक्षण व संवर्धनकार्यात असाच स्थानिक जनतेचे जास्तीतजास्त सहकार्य व सहभाग मिळविण्यासाठी सावंतवाडी वन विभागामार्फत नवनवीन संकल्पना राबविण्याचा भविष्यातही असाच आटोकाट प्रयत्न राहील.

◆ ◆ ◆




# माळढोक, तणमोर पक्ष्यांच्या संख्येत लक्षणीय घट

## 'स्टेट ऑफ इंडियन बर्डस् २०२३' अहवाल प्रसिद्ध



संकलन
**श्री. राहुल मनोहरराव शिंदे**
वन परिक्षेत्र अधिकारी,
पेंच व्याघ्र प्रकल्प, महाराष्ट्र

महाराष्ट्रासह सर्वच राज्यांमध्ये सर्वदूर आढळणाऱ्या पाणभिंगरी (Small Pratincole), कंठेरी चिखल्या (Little ringed plover), मोठा करवानक (Great Thick knee) तसेच आर्क्टिकमधून स्थलांतरित लिटल टर्न अशा पक्ष्यांच्या प्रमुख प्रजातींची संख्या गेल्या काही वर्षांमध्ये 50 ते 80 टक्के घटली असून वेळीच दखल घेतली नाही तर हे छोट्या आकाराचे देखणे पक्षी लुप्त होतील, अशी भीती स्टेट ऑफ इंडियाज बर्ड्स (SoIB) अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. या चार छोट्या पक्ष्यांशिवाय माळढोक (Great Indian Bustard), तणमोर (Lesser florican) या गवताळ प्रदेशातील पक्ष्यांनाही मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंचन प्रकल्प, वाळू उत्खनन, मानवी हस्तक्षेप आणि वाढते प्रदूषण आदी कारणांमुळे नदीपात्रांजवळचा नैसर्गिक अधिवास धोक्यात आला असून त्यामुळे पक्ष्यांची संख्या नजीकच्या भविष्यकाळात आणखी घटू शकते. अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.




## अहवाल काय सांगतो ?

हा अहवाल भारतभरातील ३० हजारांहून अधिक पक्षीनिरीक्षक आणि संशोधकांच्या ३० पेक्षा अधिक दशलक्ष क्षेत्रीय निरीक्षणांवर आधारित आहे. मोठ्या संख्येने सामान्य प्रजाती संकटात असल्याचे निरीक्षकांना आढळले. बऱ्याच प्रजातींचे मूल्यांकन करण्यासाठी डेटा (माहिती) चा अभाव आहे. या अहवालात नमूद ९४२ प्रजातींपैकी ४४ टक्के प्रजातींचा दिर्घकालीन कल मोजलेला नाही आणि ३१ टक्के प्रजातींबाबत चालू वार्षिक कल काय याचा अंदाज लावता आला नाही. या अहवालात निष्कर्षांवरून येणाऱ्या परिणामाच्या नोंदी आणि पक्षी संवर्धनासाठी शिफारशी करण्यात आल्या आहेत. गवताळ प्रदेशात आढळणारा माळढोक पक्षी अनेक राज्यांतून जवळपास नामशेष झाला आहे. महाराष्ट्र व राजस्थानमध्ये तो काही प्रमाणात शिल्लक आहे. तणमोरांच्या संख्येतील घटही चिंताजनक असल्याचे अहवाल म्हणतो. करकोचा, सारस, गिधाड व गरुड हे आकाराने मोठे असलेले पक्षी ऊर्जा क्षेत्रातील पायाभूत विकासाचे बळी ठरत आहेत. विशेषतः रासायनिक शेती तसेच माती व हवेच्या प्रदूषणामुळे या पक्ष्यांचा श्वास कोंडला गेला आहे. करकोचा, माळढोक, क्रेन, गिधाडे, गरुड यांसारखे मोठे शरीर असलेल्या पक्ष्यांबरोबरच

## किनारपट्टीवर गंभीर संकट

या अहवालात सागरी किनारपट्टीवरील पक्ष्यांच्या अधिवासावर गंभीर संकट असल्याचे ठळकपणे नोंदविण्यात आले आहे. अधिवासातील मानवी हस्तक्षेप, विकासकामे, नद्यांच्या मुखांना अडथळे, अपारंपरिक मीठ उत्पादन यामुळे किनारपट्टींवर आढळणाऱ्या पक्ष्यांचा अधिवास धोक्यात आला आहे. भारताच्या किनारपट्टीवरील टेरेक सँडपायपर, कर्ल्यू सँडपायपर, युरेशियन कर्ल्यू, व्हिम्ब्रेल आणि लेसर सँड प्लोव्हर या पक्षांच्या संख्येत ८० % पर्यंत प्रचंड घट झाल्याबद्दल अहवालात गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे.



लिटल टर्न



इतर लहान प्रजातींना जास्त धोका आहे. राजस्थानात पवनऊर्जा आणि वीजवाहिन्यांमुळे माळढोक पक्ष्यांना धोका निर्माण झाला आहे. किनारपट्टीवरील अधिवास ऱ्हास, जमिनीचा वापर बदल, अधिवासांजवळील विकासात्मक उपक्रम, नदीचा मार्ग अडवणे, व्यावसायिक जलसंवर्धन, अपारंपरिक मीठ उत्पादन, पक्ष्यांची शिकार यांसारख्या प्रमुख धोक्यांकडे या अहवालात लक्ष वेधण्यात आले आहे. पक्ष्यांच्या प्रजातींवर आणि ऊर्जा परिणामावरही या अहवालात प्रकाश टाकण्यात आला आहे. भारत हा जगातील चौथ्या क्रमांकाचा पवन ऊर्जेचा उत्पादक देश आहे. ऊर्जा पायाभूत सुविधांमुळे पक्ष्यांच्या अधिवासांना धोका आहे.

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी या प्रमुख संशोधन संस्थेसह १३ सरकारी आणि खासगी संस्थांच्या गटाने संयुक्तपणे 'स्टेट ऑफ इंडियन बर्ड्स २०२३'चा अहवाल तयार केला आहे. अशोका ट्रस्ट फॉर रिसर्च इन इकोलॉजी अँड द एन्व्हायर्नमेंट, फाउंडेशन फॉर इकोलॉजिकल सिक्युरिटी, नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस, नेचर कॉन्झर्वेशन फाउंडेशन, वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, सलीम अली सेंटर फॉर ऑर्निथोलॉजी अँड नॅचरल हिस्ट्री यांसह विविध संस्थांचा यात समावेश आहे.

◆ ◆ ◆


तणमोर


मोठा करवानक


कंठेरी चिखल्या




**श्री. मनोज बारबोले**
वन परिक्षेत्र अधिकारी,
सामाजिक वनीकरण, सोलापूर

# आयर्नमॅन.... एक सत्यात उतरलेलं स्वप्न !




आयर्नमॅन ही जागतिक स्तरावरील सर्वाधिक कठीण समजल्या जाणाऱ्या मानवाच्या शारीरिक व मानसिक क्षमतेची परीक्षा बघणारी एक जागतिक स्पर्धा आहे. जगात अनेक ठिकाणी या स्पर्धेचे आयोजन केले जाते परंतु भारतात मागील तीन वर्षांपासून फक्त गोव्यात ही स्पर्धा होते. यात 1.9 किमी समुद्रात स्विमिंग, लगेच 90 किमी सायकलिंग व त्यापाठोपाठ 21.1 किमी रनिंग करायची असते. जगात इतरत्र होणाऱ्या आयर्नमॅन स्पर्धांपेक्षा  गोवा आयर्नमॅन 70.3 ही स्पर्धा अधिक कठीण समजली जाते. ऑक्टोबर 2023 मध्ये ही स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण करून वन परिक्षेत्र अधिकारी श्री. मनोज बारबोले आयर्न बनले. त्यांच्या आयर्नमॅन बनण्याचा संघर्षाची कथा त्यांच्याच शब्दात...




आयर्नमॅन ही जागतिक स्तरावरील सर्वाधिक कठीण समजल्या जाणाऱ्या मानवाच्या शारीरिक व मानसिक क्षमतेची परीक्षा बघणारी एक जागतिक स्पर्धा आहे. जगात अनेक ठिकाणी या स्पर्धेचे आयोजन केले जाते परंतु भारतात मागील तीन वर्षांपासून फक्त गोव्यात ही स्पर्धा होते. दि. ०८ ऑक्टोबर २०२३ रोजी गोव्यातील मीरामार बीच येथे झालेल्या आयर्नमॅन ७०.३ या स्पर्धेत ५० देशातील १६०० पेक्षा जास्त स्पर्धकांचा समावेश होता. ७०.३ याचा अर्थ ७०.३ मील म्हणजेच ११३ किमी अंतर स्पर्धकाला सलग निर्धारित वेळेत पूर्ण करायचे असते. यात १.९ किमी समुद्रात स्विमिंग, लगेच ९० किमी सायकलिंग व त्यापाठोपाठ २१.१ किमी रनिंग करायची असते. जगात इतरत्र होणाऱ्या आयर्नमॅन स्पर्धांपेक्षा गोवा आयर्नमॅन ७०.३ ही स्पर्धा अधिक कठीण समजली जाते. कारण यात स्पर्धकाचा गोव्याच्या वातावरणात असणारी प्रचंड आर्द्रता, ऑक्टोबर हीट व सायकल तसेच रनिंगला असणाऱ्या अत्यंत चढउताराच्या रोडला सामोरे जावे लागते.

स्वच्छ सूर्यप्रकाश पडल्यावर सकाळी साधारण ७:०० वाजता समुद्रात पोहण्यापासून ही स्पर्धा सुरु होते. समुद्रातील लाटा, पाण्याखालील पाण्याचे विविध करंट, चावणारे जेली फिश इत्यादी सहन करत त्यावर मात करून १.९ किमी अंतर ७० मिनिटात पूर्ण केले तरच स्पर्धक पुढे सायकलिंग करू शकतो. त्यानंतर पुढे अत्यंत ६ मोठ्या चढाना सामोरे जात ९० किमी सायकलिंग पूर्ण करून लगेच दुपारच्या भर उन्हात २१.१ किमी रनिंग करावी लागते. गोव्यात भर दुपारी १२:०० च्या दरम्यान रनिंग करावी लागल्याने त्यावेळी तेथील प्रचंड आर्द्रता व वाढलेल्या तापमानावर विजय मिळवण्यासाठी रनिंग दरम्यान ७ ते ८ वेळा बर्फाचे खडे भरलेले मोठे मग डोक्यावर व शर्टात ओतून रनिंग करावी लागली. एकूण ८:३० तासात ही स्पर्धा पूर्ण करणे बंधनकारक असताना ७ तास ३९ मिनिटात ११३ किमी अंतर यशस्वीरित्या पूर्ण करून मी जागतिक आयर्नमॅन ७०.३ हा किताब मिळविला.

सर्वसाधारणत: आपणाला एका वेळी संपूर्ण जेवणातून १५०० ते १९०० कॅलरी मिळत असतात. या स्पर्धेदरम्यान सदरील अंतर पार करण्यासाठी आपणाला ४५०० ते ५५०० कॅलरी लागणार असतात त्यामुळे स्पर्धेदरम्यान चालूचालूत पाणी व कॅलरी घेत राहणे अनिवार्य असते. इलेक्ट्रल, जेल्स, खजूर, केळी इत्यादीच्या माध्यमातून सदरील स्पर्धेसाठी लागणाऱ्या कॅलरीज घेत राहणे व त्याचे मॅनेजमेंट करणे तितकेच महत्वाचे असते. सदरील स्पर्धेसाठी पुणे येथील प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. योगेश सातव यांनी कोणतीही फी न घेता तयारी दरम्यान स्पर्धेसाठी सर्वाधिक महत्वाचा असणारी कोचची भूमिका निभावली.

**पूर्व तयारीचा दिनक्रम :-**

नोकरीमध्ये साधारणत: काही अपवाद वगळता सकाळी ५:०० ते ९:०० दरम्यान विशेष काम नसते. हा वेळ व्यायामासाठी वापरणे गरजेचे आहे. दररोज सकाळी न चुकता व्यायाम करणे गरजेचे असते. येणाऱ्या आठवड्यातील रनिंग, स्विमिंग, सायकलिंग, जिम, स्ट्रेचिंग, योगा हे आधीच प्लॅन करून ठरविलेले असतात. साधारणत: दररोज २ तास प्लॅनिंग नुसार व्यायाम करावा. नर्सरी अथवा ते क्षेत्रीय भेटीला मी गाडी न वापरता अनेकदा सायकलचा वापर केला. कोणतेही

अनैसर्गिक औषध न घेता घरगुती संतुलित आहार घेण्यावर भर दिला. तसेच सोशल मिडियावर कमीत कमी वेळ वाया घालवून सदरील वेळ नोकरी, परिवार इत्यादीसाठी देणे गरजेचे आहे. शासकीय कोर्ट केसेस, मिटिंग इत्यादी कामांमुळे परगावी जावे लागले तरी सोबत शूज घेऊन असेल तेथे रनिंग केली. अनेकदा काही कारणास्तव बाहेर जेवणाची वेळ आली तरी चिकन, अंडे, हिरव्या भाज्या, सॅलड, पनीर, दही, ताक, फळे इत्यादी जे उपलब्ध होईल ते खाण्यावर विशेष भर दिला.

**घामातून आत्मविश्वासाची अनुभूती :-**

दररोज सरावादरम्यान येणाऱ्या घामातून आपले शरीरातील घाण बाहेर पडत असते. तसेच त्यातून आपला आत्मविश्वास वाढत असतो. परिणामी आपण दिवसभर एकदम ताजेतवाने राहून कामात जास्त एकाग्रपणे लक्ष देऊ शकतो.

**कानमंत्र :** दररोज किमान १ तास व्यायाम आपणाला वाढत्या वयासोबत येणाऱ्या बि.पी, शुगर, हृदय विकार इत्यादीपासून शेकडो मिल दूर ठेवतो. ❊ रोज किमान ५ ते ६ लिटर पाणी पिणे, ७ तास झोप, घरगुती संतुलित आहार यामुळे शरीर फिट राहून मनही आनंदी होते.❊ परिवारात, समाजात आपल्या व्यायामामुळे एक उत्तम संदेश जातो. आयर्नमॅन पदवी मिळवणे हे अवघड असले तरी जीवनाला योग्य शिस्त लावून मेहनत केल्यास अशक्य नाही.

◆ ◆ ◆





लेपर्ड लेडी

# मी, बिबट्या आणि पहिला रेस्क्यू



**कु. प्रियांका लगड**
वन परिक्षेत्र अधिकारी

आपल्या वन कारकिर्दीच्या पहिल्याच नियुक्तीमध्ये बिबट रेस्क्यू चे अनेक प्रसंग यांच्यावर आले मात्र त्या डगमगल्या नाहीत. उलट पुढच्या प्रत्येक अडचणीच्या रेस्क्यू वेळी त्या अधिक निडर आणि कणखर होत गेल्या. वन परिक्षेत्र अधिकारी कु. प्रियांका लगड यांनी आपल्या पहिल्या वहिल्या बिबट रेस्क्यु चे अनुभव येथे मांडले आहेत. विशेष म्हणजे पुढच्या चार वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी 36 च्या वर बिबट यशस्वीपणे रेस्क्यू करून दाखवले. या कारणाने त्यांना लेपर्ड लेडी सन्मानाने म्हंटले जाते.

जून 2018 मध्ये रत्नागिरी परिक्षेत्राचा कार्यभार हाती तर घेतला परंतु याक्षणी भविष्यात काय आव्हाने समोर उभी असतील याची तिळमात्र कल्पना देखील मला नव्हती; परंतु नुकतीच 18 महिन्यांची ट्रैनिंग संपून जॉईन झालेली असल्यामुळे एक उत्साह होता, काहीतरी निसर्ग आणि वन्यप्राण्यांच्या संवर्धना साठी नक्की करायचे, मनाशी हे ठाम केलेलं होतं. जून महिना म्हटलं की, नुकताच पावसाळा सुरू झालेला. माझ्या सारख्या मराठवाड्यातून (काही लोकांच्या म्हणण्यानुसार दुष्काळातून) आलेल्या व्यक्ती साठी हा मुसळधार पाऊस एक परम सुख देणारा होता. कोकणातला मुसळधार पाऊस मी पहिल्यांदाच अनुभवत होते. हिरवीगार झालेली डोंगर, छोटे छोटे असंख्य धबधबे असं अप्रतिम निसर्ग सौंदर्य डोळ्याचं पारण फेडणार होत. एक एक दिवस या सगळ्यांची अनुभूती घेत नव नवीन शिकण्यात चाललेला होता.

असाच एका मुसळधार पावसाच्या रात्री दि. 24/06/2018 रोजी सायंकाळी साधारणतः 7.30 वाजता मौजे शेलारवाडी येथील पोलीस पाटील यांचा फोन आला की, गावातील शेतकऱ्याच्या शेतात फासकी मध्ये बिबट्या अडकला होता. मग काय पहिलं रेस्क्यू करायचं. एक नवीन आव्हान बरीच काही शिकवण देऊन जाणार होतं. मग माझ्या सर्व स्टाफसह मी गावात पोहचले. गावात गावकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर बिबट्या कुठे अडकला आहे याची माहिती घेतली आणि त्या ठिकाणी जायचं ठरलं . इथेच पहिलं आव्हान होत, रात्रीचे 8.30 वाजलेले होते. बिबट्या गावापासून साधारणतः 1.5-2 किमी उंचीवर डोंगरावर अडकलेला होता. इथून खरी शर्थ सुरू झाली.

डोंगर कधी सरळ असतो का?, धो धो पाऊस सुरू होता. डोंगर चढून जाताना दोन कमरे इतके तुडुंब भरलेले ओढे ओलांडून आम्ही जात होतो. हातात बॅटरी घेऊन रस्ता काढत होतो. बिबट्या असलेल्या ठिकाणावर जाण्यासाठी रात्रीचे 11 वाजले. त्या अंधारात बॅटरीने पाहिल्यास फक्त बिबट्याचे डोळे चमकत होते. वरिष्ठाना संबंधित परिस्थितीची माहिती फोनद्वारे दिली व कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. ही पूर्ण परिस्थिती माझ्यासाठी पूर्णतः



नवीन होती आणि कर्मचाऱ्यांना यातील सर्व गोष्टींची संपूर्ण माहिती होती. अनुभव हाच रोजच्या आयुष्यातला सर्वात मोठा गुरू असतो. मग चर्चे अंती रेस्क्यू सकाळी करण्याचे ठरले.

डोंगर उतरून गावात आलेनंतर गावकऱ्यांशी चर्चा केली व त्यांना काय काळजी घ्यायची याबाबत माहिती दिली. 3 , 4 कर्मचारी गावातच थांबाविले. प्रणिसंग्रहालयच्या व राष्ट्रीय उद्याना बाहेर पहिल्यांदाच मी प्रत्यक्षात बिबट्याला पहिले होते. वरिष्ठाशी व कर्मचाऱ्यांशी झालेल्या चर्चे मध्ये अशी माहिती मला कळाली होती की, फासकीत अडकलेला बिबट्या रात्रभर अडकून राहिला तर त्याची जिवंत राहण्याची शक्यता फार कमी असते. आपल्याला कितीही वाटले तरी काहींवेळा परिस्थिती अशी असते की, परिस्थितीसमोर आपण हतबल असतो. अशीच काहीशी माझी स्थिती त्या रात्री झालेली होती. रात्रभर वारंवार हाच विचार येत होता की आपल्याला त्या बिबट्याला वाचवायचे आहे आणि तेच आपलं परम कर्तव्य आहे आणि आस्तिक असणारी मी देवाला प्रार्थना करत होते त्याला रात्रीत काही होऊ देऊ नकोस आणि रात्रभर वाट पाहत होते ती सकाळ होण्याची...

सकाळ झाली, मी आणि माझे कर्मचारी पहाटेच्या 5.30 वाजता सर्व साहित्यानिशी जागेवर पोहचलो होतो. वरिष्ठाच्या मार्गदर्शना नुसार व सर्व कर्मचाऱ्यांच्या अनुभवातून जे काही ऐकलं होत त्यानुसार स्टाफचे काही गट पाडले. या गटामध्ये गावातील तरुण मुलांना देखील घेतले. या रेस्क्यूमध्ये सर्वात अवघड गोष्ट होती बिबट्याला रेस्क्यू करण्यासाठी लागणार पिंजरा जागेवर नेणे; पण यात एक गोष्ट अनुभवता आली गावाकडील लोकांचा मदतीचा दृष्टिकोन सर्व तरुण मंडळी व माझे कर्मचारी यांच्यासमवेत आम्ही पिंजरा डोंगरावर घेऊन आलो. इथे आल्यास दुसरी महत्वाची गोष्ट करावयाची होती ती म्हणजे अतिउत्साही लोकांना आवर घालण्याची. प्रश्न पडला असेल ना, इतक्या उंचीवर लोक कसे पोहचले? ' बिबटया ' पाहायला मिळणार ही उत्सुकता साहजिकच सगळ्यांना होती. मग इथे



परत काही कर्मचारी अतिउत्साही लोकांना आवर घालण्यासाठी नेमले कारण एखादी गोष्ट छोटीशी चूक देखील जीव घेणी होऊ शकते याची पुरेपूर कल्पना मला आली होती. मी आणि काही कर्मचारी पिंजरा पूर्णपणे बिबट्याच्या तोंडाजवळ सरकवत होतो. आता बिबट्या आणि आम्ही यात फक्त एका पिंजऱ्या इतकं अंतर होतं. तो रात्र भर भुकेलेला, दमलेला होता; पण माणसं दिसली की आवेगाने डरकाळी फोडत होता. याक्षणी सर्वांनी अतिशय अलर्ट राहणे गरजेचे होते.आणि सकाळी 9 वाजता मोठ्या शर्तीने व शक्कल लढवून पिंजऱ्याच्या सहाय्याने बिबट्याला फसकीतून सोडून घेण्यास आम्हाला यश मिळाले. आणि बिबट्याने देखील सुटकेचा निःश्वास सोडला. मग सर्व गावकरी जी जागेवर होती त्यांना बिबट्या पाहू दिला. त्यांनी केलेल्या सर्वोतोपरी मदतीची ही छोटीशी परतफेड असेल की, त्यांना देखील बिबट्याला पाहण्याचा आनंद उपभोगू द्यायला हवा ना.

यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी बिबट्याची तपासणी केली तो पूर्णतः सदृढ होता मग ही पोचपावती मिळाल्यास त्याला सुखरूप त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडून आम्ही सर्व कर्मचाऱ्यांनी देखील आनंद उत्सव साजरा केला.माझं पहिलं 'रेस्क्यू 'मी यशस्वीरित्या पार पाडलं होतं आणि यात मला माझ्या स्टाफची मोलाची साथ लाभली होती. एक वेगळाच आनंद आज होता. 'आपण एका जीवाला जीवदान देऊ शकलो ', याचं समाधान काही औरच होतं ते शब्दात नाही सांगता येणार. आपण पार पाडलेल्या कर्तव्याच समाधान आज पहिल्यांदाच जाणवत होत आणि त्या सोबतच अशी अनेक आव्हाने पुढे पार पाडावयाची आहेत याची जाणीव झाली. या पहिल्या रेस्क्यू ने खूप मोठा आत्मविश्वास सोबतीला दिला होता.. जसं पहिलं प्रेम, पाहिला विजय पाहिला नंबर तसंच माझं हे पहिलं रेस्क्यू या आत्मविश्वासासोबत नेहमीच खास, खूप काही शिकवण देणारं, समाधान देणारं आणि नेहमी कर्तव्याची जाणीव करून देणारं राहील हे मात्र नक्की....

◆ ◆ ◆





# वन महिलांचं हक्काचं व्यासपीठ: एक्सप्लोरिंग वुमनहुड फाऊंडेशन

वन आणि वन्यजीव क्षेत्रात काम करणाऱ्या महिला अधिकारी आणि कर्मचारी यांच्या हक्काचं व्यासपीठ म्हणजे ' एक्सप्लोरिंग वूमनहुड फाऊंडेशन.' 2019 पासून वन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांना वन दुर्गा पुरस्कार देऊन गौरवलं जातं, त्यांचा सन्मान केला जातो. याशिवाय बरेच वेगवेगळे उपक्रम राबवून महिलांना प्रेरित केलं जातं. एक्सप्लोरिंग वूमनहुड फाऊंडेशन बद्दल अधिक माहिती देत आहेत फाऊंडेशन च्या संचालिका सौ. दिपाली अतुल देवकर.



**सौ. दिपाली अतुल देवकर**
संचालिका
एक्सप्लोरिंग वूमनहुड फाऊंडेशन







आम्ही एथऋ म्हणून, तांत्रिक सहाय्य, बचाव साधने, स्व–संरक्षण तंत्र इ. प्रदान करून महिला रेंजर्सना त्यांच्या क्षमता वाढीसाठी मदत करतो. आम्ही क्षमता बांधणी, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ आणि हिंसाचार विरुद्ध कायदेशीर तरतुदींबद्दल तसेच मार्गदर्शनपर व्याख्याने आणि कार्यशाळा आयोजित करतो आणि महिला वन कर्मचाऱ्यांचे मनोबल उच्च ठेवण्यासाठी कार्य करतो.

निसर्ग संवर्धनासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या अनेक महिला रेंजर्स आहेत पण या पुरुष प्रधान कार्यसंस्कृतीत त्या बाजूला पडतात. महिला रेंजर्सकडून होत असलेल्या सर्वोत्तम कामांना व्यवस्थित प्रसिध्दी देवू शकलो तरच इतरांना अशा उपक्रमांची माहिती मिळू शकेल. म्हणून आम्ही २०१९ मध्ये वन दुर्गा संकल्पनेसह एक पुरस्कार सुरू केला. वन संरक्षण – संवर्धन, इको–टूरिझम आणि निसर्ग शिक्षण यासारख्या विविध विभागांमध्ये काम करणाऱ्या महिला रेंजर्स आणि इतर रेंजर्सना प्रेरित केले. अधिक चांगले काम केलेल्या महिलांना पुरस्कारासाठी निवडले जाते. आमच्याकडे क्षेत्रीय वन कर्मचारी यांच्या वैवाहिक जोडीदारासाठी देखील एक विशेष पुरस्कार आहे. रेंजरची पत्नी असल्याने, मी त्याच्या कर्तव्यातील सर्व अडचणी, अनियोजित कामे, घरी एकटे राहण्याची जोखीम, त्याच्या अनुपस्थितीत कुटुंबाचे व्यवस्थापन केले. त्यामुळे निसर्ग संवर्धनासाठी त्याच्या/तिच्याकडून चांगले होण्यासाठी रेंजरच्या जोडीदाराची भूमिकाही महत्त्वाची असते, ही गोष्ट समजून आली. एथऋला विश्वास आहे की रेंजर्सना त्यांच्या कौटुंबिक कल्याणाची आणि सुरक्षिततेची खात्री दिल्यास ते अतिशय चांगली कामगिरी करू शकतात. त्यामुळे हा नाविन्यपूर्ण आणि जगातील अश्या प्रकारचा या क्षेत्रातील पहिलाच पुरस्कार असल्याने या विशेष पुरस्काराला जगभरातून आणि आंतरराष्ट्रीय रेंजर फेडरेशनकडूनही प्रसिध्दी मिळत आहे. विशेष म्हणजे, यावर्षी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांना सन्मानित केले जाणार आहे. 'वनदुर्गा' हा सोहळा यावर्षी आसाममधील गुवाहाटी येथे येत्या चार ते आठ डिसेंबरदरम्यान िळरप ठरपसशी उेपषशीशपलश या विशेष कार्यक्रमात आयोजित केला जाणार आहे. महाराष्ट्रातील एक्सप्लोरिंग वुमनहूड फाऊंडेशनच्यावतीने दिल्या जाणाऱ्या 'वनदुर्गा' पुरस्काराचे वितरण देखील याच व्यासपीठावर केले जाणार आहे. या कार्यक्रमाला आसामचे मुख्यमंत्री, आसामचे वनमंत्री तसेच महाराष्ट्राचे वनमंत्री उपस्थित राहतील. या पुरस्काराची प्रक्रिया करताना महिला वनकर्मचाऱ्यांकडून अर्ज आल्यानंतर वनखात्यातील उच्च वनाधिकाऱ्यांकडून त्याची छाननी केली जाते. भ्रमणध्वनीवरून त्यांची मुलाखत घेतली जाते आणि त्यांची पार्श्वभूमी तपासली जाते. त्यानंतर संबंधित वनाधिकाऱ्यांशी चर्चा करून वनदुर्गा पुरस्काराची निवड केली जाते.

स्थानिक समुदाय यांचा सहभाग देखील वन संवर्धनात महत्वाचा आहेत. २०१५ मध्ये णछ ने घोषित केलेल्या १७ शाश्वत विकास उद्दिष्टे या तत्त्वांवर एथऋ काम करत आहे. स्थानिक समुदायातील महिलांच्या बचत गटांना






रोजगार मिळवून देण्यासाठी किंवा कौशल्य विकासासाठी मदत करणे हे जंगलावरील त्यांचे थेट अवलंबित्व कमी करण्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. पर्यायी रोजगार उपलब्ध करून देऊन जैवविविधतेचा उपयोगी वापर वाढल्याने त्यांचा निसर्गावरील विश्वास दृढ होईल. याच धर्तीवरExploring Womanhood या नावाने Sustainability Fashion हा व्यवसाय सुरू करण्यात आला आहे. यात भारतातील अनेक राज्यात स्थानिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या हातमाग वापरून केलेल्या कपड्यांना विकण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे. यात स्थानिकांना जास्त रोजगार मिळून आर्थिक प्रगती होत आहे. या विशेष उपक्रमास राष्ट्रीय स्तरावरीलSustainability Innovators ward 2023 या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आरोग्य तपासणी कार्यक्रम आयोजित करणे, सॅनिटरी पॅडचे वाटप करणे, कौशल्य विकासासाठी कार्यशाळा आयोजित करणे त्यांच्या चांगल्या उपजीविकेसाठी आणि जीवनासाठी गरजा पूर्ण करेल.

एक्सप्लोरिंग वुमनहुड फाउंडेशन महिला रेंजर्स आणि त्यांच्या कुटुंबियांच्या भल्यासाठी काम करत आहे. या धर्तीवर रेंजर वर्कफोर्समध्ये महिलांना अधिक चांगले प्रतिनिधित्व मिळण्याची अपेक्षा आपण करू शकतो. वाढत्या प्रतिनिधित्वामुळे निश्चितपणे चांगल्या कार्यस्थळाची मागणी आणि भूमिकेची जनजागृती निर्माण होईल. त्यामुळे एथ्क्र सर्व सहकारी महिला रेंजर्सना विनंती करते की त्यांनी आदर्शवत कामे करून इतर मुलींना निसर्ग संवर्धनाच्या या उदात्त क्षेत्रात येण्यास प्रवृत्त करा. आपल्या वासुंधरेच्या संवर्धनासाठी ते करत असलेल्या कामासाठी मोठ्या व्यासपीठावर महिला रेंजर्सचे अभिमानाने कौतुक करायचे आहे. एथ्क्र मार्फत आम्ही या विषयाला G२० च्या व्यासपीठावर मांडले आणि महिला वन कर्मचाऱ्यांची, स्थानिक महिला समुदायाची संवर्धनाबाबत योगदान आणि गराजेबाबत भूमिका विषद केली. या प्रस्तावाची विशेष दखल ही भारताच्या अध्यक्षतेखाली जाहीर केलेल्या G२० जाहीरनाम्यात घेण्यात आली आहे!

आम्हाला भेदभावाची रेषा मोडून काढायची आहे आणि महिलांना सामाजिक स्तरावर अधिक आत्मविश्वासपूर्वक वातावरण निर्माण करायचे आहे. जागतिक पर्यावरणीय संकटाच्या या युगात, ५०% लोकसंख्या असलेल्या स्त्रिया त्याविरुद्ध लढा देत आहेत. त्यात यश येण्यासाठी महिला वन कर्मचारी यांनी केलेल्या कामाला चालना देण्याची वेळ आली आहे. यासाठी या क्षेत्रात काम करत असलेल्या सर्वांनी आपल्या सहकारी असलेल्या महिलांना योग्य मार्गदर्शन आणि सहकार्य केल्यास आणि योग्य सन्मान दिल्यास महिलांकडून देखील वन संवर्धन आणि संरक्षणाच्या कार्यात होणाऱ्या एकूण योगदानात आणि महिलांच्या या क्षेत्रातील प्रमाणात चांगली वाढ होईल आणि निसर्ग संवर्धनाच्या जागतिक लक्ष्याचे उदिष्ट पूर्ण करणे शक्य होईल..

◆ ◆ ◆








# बांबु लागवड – शेतकऱ्यांसाठी वरदान



**श्री. हरिश्चंद्र वाघमोडे**
विभागीय वन अधिकारी
सामाजिक वनीकरण विभाग, सातारा

सातारा सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातुन रोपवन कामे- रस्ता दुतर्फा, कालवा दुतर्फा, गटलागवड, रोपवाटीका निर्मिती, उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान निर्मिती, कन्या वन समृध्दी योजना वृक्षाची जोपासना हिच निसर्गाची उपासना, छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार योजना, प्रचार प्रसिध्दी, राष्ट्रीय हरित सेना योजना तसेच मग्रारोहयो अंतर्गत शेतकऱ्यांच्या बांधावर व शेतावर वृक्षलागवड इत्यादी योजना राबविण्यात येतात. या लेखाच्या माध्यमातून महत्वाकांक्षी बांबू लागवड योजनेची माहिती दिली आहे विभागीय वन अधिकारी श्री. हरिश्चंद्र वाघमोडे यांनी.

सातारा हा पश्चिम महाराष्ट्रातील महत्वाचा जिल्हा असुन भौगोलिकदृष्ट्या पश्चिमेकडील वाई, मेढा, महाबळेश्वर, पाटण, सातारा या तहसिलचा बहुतांशी भाग हा पश्चिम घाटात येत असुन महाबळेश्वर तालुक्यात पाऊसमान 6000 mm पर्यंत असुन पुर्वेकडील माण तालुक्यात 500 m m पर्यंत कमी आहे. म्हणजेच सर्वाधीक पाऊसमान व सर्वात कमी पाऊसमान याच जिल्हयात आढळुन येते, त्यामुळे भौगोलिकदृष्टया पश्चिमेकडील अति पावसाचा, डोंगर व घाट माथ्यांचा प्रदेश, तिव्र उतार व वनाच्छादन मोठया प्रमाणा असलेला आहे, तर पुर्वेकडील माण, खटाव, कोरेगांव, कराड, फलटण, खंडाळा हे तालुके सपाट व गवत वर्गीय व काटेरी वने प्रकारात मोडतात. कृष्णा व भिमा या प्रमुख नदया जिल्हयातुन वाहतात, कोयना, धोम, कन्हेर उरमोडी, विर जलसिंचन प्रकल्पाचे महत्वाचे योगदान जिल्ह्याच्या विकासामध्ये आहे. जिल्ह्यात वनक्षेत्र हे 137900 हेक्टर असुन भौगोलिक क्षेत्राच्या 13.15 % आहे. सातारा सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातुन रोपवन कामे- रस्ता दुतर्फा, कालवा दुतर्फा, गटलागवड, रोपवाटीका निर्मिती, उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान निर्मिती, कन्या वन समृध्दी योजना वृक्षाची जोपासना हिच निसर्गाची उपासना, छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार योजना, प्रचार प्रसिध्दी, राष्ट्रीय हरित सेना योजना तसेच मग्रारोहयो अंतर्गत शेतकऱ्यांच्या बांधावर व शेतावर वृक्षलागवड इत्यदी योजना राबविण्यात येतात.

बांबू हे शेतक-यांचे बुह उपयोगी पिक आहे. बांबू हे गवत असून बांबूला तोडायला, कापायला व वाहतुकीला केंद्र सरकारने 2017 पासून परवानगी दिलेली आहे. शेतक-यांना या माध्यमातून जोड धंदा मिळवा म्हणून शासनस्तरावर प्रयत्न केले जात आहे. ऊसापेक्षा कितीतरी अधिक पटीने जास्त उत्पादन देणाऱ्या आणि कपड्यापासून टुथ ब्रश पर्यंत आणि टोपी, चप्पल-बुटापासून ईथेनॉलपर्यंत हजारो वस्तू तयार होणाऱ्या बांबूच्या जाती आहेत. सध्या भारतात देखील बांबूपासून सध्या 1800 प्रकारच्या वस्तू बनवल्या जातात. सर्वसाधारणपणे ऊस लागवडीमधून किमान हेक्टरी उत्पादन 100 टन व भाव प्रति टन 2500 मिळतो तसेच बांबू लागवडीमधून किमान हेक्टरी उत्पादन 100 टन व भाव प्रति टन 4000 मिळतो. त्यामुळे शेतकरी आर्थिकदृष्टया सक्षम होणार आहेत.

## महाराष्ट्रातील बांबूच्या प्रमुख प्रजाति व क्षेत्र

जगात बांबूच्या एकूण 1200 प्रजाती आहेत. त्यापैकी भारतात 125 प्रजाती आढळून येतात.
महाराष्ट्रामध्ये बांबूच्या 3 स्थानिक प्रजाती आढळून येतात. त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहेत.

1. **मानगा (Pseudoxytenanthera Stocksii):-** हा साधारणत: भरीव व 25 ते 40 फूट वाढणारा बांबू महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग, कोल्हापूर, रत्नागिरी, सातारा, रायगड, पुणे, ठाणे व थोडा बहुत नाशिक या जिल्ह्यामध्ये खाजगी जमिनीवर आढळून येतो. याचे क्षेत्र अंदाजे 5200 वर्ग कि.मी आहे दरवर्षी 3 ते 5 हजार ट्रक बांबूची बाजारपेठेत विक्री होते असा कयास आहे.
2. **कटांग (Bambusa Bambos) :-** हा मोठ्या आकाराचा बांबू असून 50 ते 60 फुटापर्यंत वाढतो याचे क्षेत्र नागपूर व गडचिरोली या जिल्ह्यातील काही भागात सीमित आहे. एकूण क्षेत्र फारच नगण्य आहे.
3. **मानवेल (Dendrocalamus Strictus):-** हा साधारणत: भरीव व 25 ते 40 फूट वाढणारा पोकळ बांबू असून विदर्भातील नागपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर व अमरावती जिल्ह्यातील वनक्षेत्रात आढळून येतो. याचे क्षेत्र अंदाजे 6300 वर्ग कि.मी आहे.

### बांबूच्या महात्वाच्या प्रजातींची माहिती खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| शास्त्रीय नांव | : *Dendrocalamus Strictus* |
| स्थानिक नांव | : लाठी बांबू |
| मराठी नांव | : मानवेल |
| पुनरुत्पादन | : बियापासून, शाकीय व उती संवर्धनाने ( Tissue Culture) |
| लागवडी योग्य अंतर | : 4 ते 6 मीटर |
| आढळस्थान | : महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश |

**उपयोग :-** वरील प्रजाती मध्यम प्रकारची असून ती कमी पाण्याच्या क्षेत्रात सुद्धा सहजरीत्या आढळून येते. लहान आकाराचा हा बांबू भरीव असल्याने याला लाठी बांबू म्हणून प्रामुख्याने ओळखतात आणि पोलीस विभागात मोठ्या प्रमाणात या बांबूचा वापर दंड्यासाठी होतो. इतर ठिकाणी सुद्धा जसे की

शेतकाम, फर्निचर, बास्केटरी आणि बांधकामात या बांबूचा उपयोग होतो. थोडक्यात "मूर्ती लहान पण कीर्ती महान" अशा प्रकारची ही बांबू प्रजाती असून जवळपास सर्वच ठिकाणी या बांबूचा उपयोग आढळून येतो.

| | |
|---|---|
| शास्त्रीय नांव | : *Bambusa Balcooa* |
| स्थानिक नांव | : भीमा बांबू |
| पुनरुत्पादन | : शाकीय व उती संवर्धनाने (Tissue Culture) |
| लागवडी योग्य अंतर | : 5 ते 6 मीटर |
| आढळस्थान | : उत्तर पूर्व भारत, नागालँड, बिहार, उत्तर पदेश |

**उपयोग:-** बल्कोवा हा मोठ्या प्रकारचा आणि अतिशय मजबूत असल्या कारणाने प्रामुख्याने इमारत बांधकामात वापरला जातो. स्कॅफोल्डिंग व शिड्या बनवण्यासाठी सुद्धा याचा विशेषतः वापर केल्या जातो. इतरत्र सुद्धा जसे की कागद कारखाने, हस्तकला, अगरबत्ती आणि घरातील शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी या बांबूचा उपयोग होतो.

| | |
|---|---|
| शास्त्रीय नांव | : *Bambusa Tulda* |
| स्थानिक नांव | : देव बांबू |
| पुनरुत्पादन | : बियापासून, शाकीय पध्दतीने व उती संवर्धनाने |
| लागवडी योग्य अंतर | : 5 ते 6 मीटर |
| आढळस्थान | : उत्तर पूर्व भारत, आसाम, बिहार, मिजोरम, अरुणाचल प्रदेश, उत्तर प्रदेश |

**उपयोग:-** इतर बांबू चा तुलनेत टुल्डा बांबू मधील खड्ड्याचे अंतर जास्त असल्यामुळे याचा उपयोग मुख्यत्वे अगरबत्ती कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणात होतो. या प्रजातीच्या पानांमध्ये औषधी गुण सुद्धा आढळतो. वरील बांबू पासून एक विशेष आकाराची बासुरी सुद्धा बनविल्या जाते. ज्याचा पूजेमध्ये वापर होतो. अरुणाचल प्रदेश क्षेत्रात अशी मान्यता आहे की या बासुरीच्या आवाजातील सुरांनी सर्व आसुरी शक्तीचा विनाश होतो. इतरत्र सुद्धा जसे की बांबूच्या पट्ट्या काढून चटई, वेणकाम, टोपल्या, धान्याच्या कोठ्या इत्यादी वस्तू बनवण्यात या बांबूचा उपयोग बघायला मिळतो.

| | |
|---|---|
| शास्त्रीय नांव | : *Bambusa Bambos* |
| स्थानिक नांव | : कटांग |
| पुनरुत्पादन | : बियापासून, शाकीय पध्दतीने व उती संवर्धनाने |
| लागवडी योग्य अंतर | : 5 ते 6 मीटर |
| आढळस्थान | : केरळ, पूर्व भारत, महाराष्ट्रात तुरळक प्रमाणात |

**उपयोग:-** या बांबूच्या फांद्यांना काटे असल्यामुळे याला कटांग नावाने संबोधतात. या बांबूचा उपयोग लगदा, बाण, फर्निचर, बासरी, इमारती माल, फळ्या, कुंपण इत्यादीसाठी होतो. तसेच या बांबूचे कोंब व बिया खाण्यासाठी योग्य आहेत. तसेच या बांबूच्या पानांचा उपयोग चारा आणि औषधी म्हणून देखील केला जातो.

| | |
|---|---|
| शास्त्रीय नांव | : *Pseudoxytenanthera Stocksii* |
| स्थानिक नांव | : माणगा |
| पुनरुत्पादन | : शाकीय पध्दतीने व उती संवर्धनाने |
| लागवडी योग्य अंतर | : 4 ते 6 मीटर |
| आढळस्थान | : महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ |

**उपयोग:-** मध्यम आकाराचा असलेला हा बांबू टोपल्या बनवण्यापासून ते घर बांधणी कामात उपयोगी पडतो. इतर क्षेत्रात सुद्धा जसे की हस्तकला, अगरबत्ती, फर्निचर, बांधकाम, बास्केटरीमध्ये या बांबूचा प्रयोग केल्या जातो. हा बांबू जास्त पावसाच्या प्रदेशात आढळतो. उदाहरणार्थ कोकण किनारपट्टीवर.

## बांबु लागवड

**(1) मृदा :-** बहुतांश बांबू सुयोग्य निचरा असलेल्या मातीत वाढतात आणि रासायनिक ते अंशतः रासायनिक मृदेस प्राधान्य देतात लाल आणि लाल चिकल माती श्रेयस्कर असली तरीही बांबूची वाढ काळी कसदार ते कोरडवाहू या श्रेणीतल्या मृदेत होऊ शकते. आता बांबूची वाढ क्षारयुक्त जमिनीत सुद्धा करता येते असे आढळून आले आहे.

| वृक्षांची संख्या | प्रति एकरअंतर |
|---|---|
| 200 वृक्ष प्रति एकर | 5 मीटर X 4 मीटर |
| 160 वृक्ष प्रति एकर | 5 मीटर X 5 मीटर |

**(2) ऋतू आणि वृक्ष लागवड :-** बांबू लागवडीकरिता साधारणत: मार्च महिन्यापूर्वी 45 सेंमी X 45 सेंमी चे खड्डे करून ठेवावेत. जवळपास दीड महिना हे खड्डे कडक उन्हात राहिल्यामुळे त्यातील मातीची मशागत होऊन रोखण्यासाठी उपयुक्त होते. 15 मे नंतर सदर खड्डे सुपीक माती, शेणखत व निमकेक याचे मिश्रणाने 3/4 पर्यंत भरून घ्यावे. पहिला पाऊस सुरु होताच रोपांची लागवड करावी. कमी पावसाचे प्रदेशात लागवड करताना पॉलीपॉट हिंग व हळद याचे मिश्रणात बुडवून घ्यावी. महाराष्ट्रात एकूण पावसाचे दिवस हे 90 ते 120 पर्यंत असतात याची जाणीव ठेवून शक्यतो लवकरात लवकर रोप लागवड करून घ्यावी पाऊस सुरू होण्यापूर्वी रोपे जागेवर वाहतूक करून ठेवता आली तर उत्तम आवश्यकता भासल्यास सप्टेंबर, ऑक्टोबर व पुढील मार्च ते मे या काळात रोपांना पाणी देण्याची व्यवस्था करावी. बांबू रोपांचे कंद रानडुकराद्वारे खोदून काढून खाण्यात येतात. त्याकरिता विशेष काळजी घेण्यात यावी. तसेच हिरवा चारा खाणारे जनावरे उदा गाय, बकरी, चितल, सांबर यांचे पासून सुद्धा बांबू रोपांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. कमी पावसाचे प्रदेशात खड्ड्या ऐवजी 2 मीटर X 60 से.मी. X 30 से.मी. आकाराचे समपातळी चर खोदून त्यात बांबूची लागवड करावी.



**(3) हवामान :-** बांबू हा पर्यावरणाच्या एका विस्तृत श्रेणीत वाढू शकतो आणि पावसाबरोबरच त्याची उणीव भरून काढणाऱ्या सिंचन प्रक्रियेची गरज असते.

**(4) निंदणी व खत देणे :-** बांबू वृक्षाच्या जलद वाढीकरिता आणि ते लवकर स्थापित व्हावे याकरिता 3 वर्ष नोंदणी नित्याने करणे आवश्यक असते. प्रथम वर्षी 3 निंदण्या 2 वेळा माती काम द्वितीय वर्षी 2 निंदण्या 1 वेळा माती काम तृतीय वर्षी 1 निंदणी व 3 वेळा माती काम करण्यात यावे. पावसाळ्यानंतर लगेच स्थळाची अवस्था आणि भूखंडावर उपलब्ध तनाच्या प्रमाणानुसार स्वच्छ विळ्याने खुरपणी करावी. बांबू वृक्षाच्या सभोवतालचा निदान 2 फुटाचा भूभाग तन आणि मुख्यत्वे वेली यापासून स्वच्छ ठेवावा. बांबू स्वतःची पाने गाळू लागतो त्यावेळी तो भोवतालची तणवाढ आपोआप नियंत्रणात आणतो.

प्रथम वर्षी NPK 50: 50: 50 हे रासायनिक खत दोन वेळा 50 ग्रॅम प्रति रोप या प्रमाणे जुलै महिन्यात देण्यात यावे. उपलब्धतेनुसार सेंद्रिय खते सुध्दा देण्यात यावीत. (जैविक खते भरपूर प्रमाणात दिल्यास रासायनिक खताची आवश्यकता नाही.) सेंद्रिय खते आणि कंपोस्ट पोषक द्रव्याचे उत्तम स्त्रोत असून तयार करण्यास आणि वापरास सोपी आहेत. सेंद्रिय आणि नैसर्गिक खातांचे अजूनही बरेच स्त्रोत आहेत. सेंद्रिय खते मातीला एक दर्जेदार पोषकद्रव्य पुरवितात. ते सूक्ष्मजीव क्रियाकलापास प्रोत्साहन

देतात जे खताला मातीस अधिकअधिक कालमर्यादेपर्यंत पोषण पुरविण्यात मदत करते. रासायनिक खतांचे विपरित सेंद्रिय खत पावसाचे पाणी क्वचितच निघून जाऊ देते.

**(5) आंतर रोपण :-** बांबू रोपांची लागवड काही अंतर सोडून केली जाते सुरुवातीच्या काही वर्षात शेतकरी मधल्या जागेत कमी कालावधीचे आळीपाळीचे पीक घेऊन उत्पन्नात वाढ करू शकतात. विविध कृषी पिके जसे टोमॅटो, टरबूज, बीट, मका, गहू, मसूर, वाटाणा, पोपट, मोहरी, आले, हळद इत्यादींचे यशस्वी उत्पादन घेतले गेले आहे. शेवटची दोन पिके तुलनेने सावली असणारे असून उन्हाळ्यातील पर्ण गळती होत असल्याने छत अंशतः झाकले जाते. बांबू लागवडीत आंतरपिके म्हणून काही औषधी रोपेही लावली जाऊ शकतात. ईशान्येकडील राज्यात सोयाबीन आणि मका सारख्या पिकांचे सुरुवातीच्या काळात उत्पन्न घेतात. नायट्रोजनची उपलब्धता वाढावी याकरिता नायट्रोजन पूरक रोपे वापरण्याचा सल्ला दिला जातो. पाण्यापासून याचा अच्छादक म्हणून वापर किंवा विकास आर्द्रता संवर्धक म्हणून पूरक ठरते. ती तिच्यातील अच्छादक आणि पर्ण गळती प्रवृत्तीमुळे आंतर पिकांचे अस्तित्व देखील मृदेची पोषकता पुन्हा मिळवून देण्यास आणि तनवाढ रोखण्यास मदत करते. आंतर पिकांचा कालावधी बांबू लागवडीत सोडलेल्या जागेवर अवलंबून असतो.



मा. मुख्यमंत्री यांचे सुचने नुसार सातारा जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत शेतकऱ्याच्या सलग शेतावर, बांधावर बांबु लागवड ही महत्वकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना ही कृषी विभाग, वनविभाग, जिल्हा परिषद, सामाजिक वनीकरण व वन्यजीव या विभागा मार्फत राबविण्यात येत आहे. सातारा सामाजिक वनीकरण विभागास 1000 हेक्टर क्षेत्रावर वृक्षलागवडीचे जिल्हाधिकारी सातारा यांनी उदिष्ट दिले आहे. सदर योजना यशस्वीपणे राबविण्यातसाठी क्षेत्रीय पाहणी करून बांबु लागवडीचे महत्व , उपयोगिता भविष्यातील बाजार पेठ इत्यादी बाबत मार्गदर्शन करण्यासाठी श्री. नंदकुमार, अप्पर मुख्य सचिव (रोहयो), मुंबई यांनी मा. मुख्यमंत्री यांचे गावात मौजे. दरे येथे दि. 8/4/2023 रोजी जिल्हा स्तरावील अधिकारी व ग्रामस्त यांची सभा घेवुन महाबळेश्वर तालुक्यातील कोयना बॉक वॉटर भागातील 16 गावामध्ये प्रथमता बांबु लागवड करणेबाबत सुचविले दि. 16/05/2023 रोजी श्री. पाशा पटेल मा. आमदार व कृषी मुल्य अयोगाचे माजी सदस्य यांनी मौजे बामणोली व मौजे दरे येथे अधिकारी व ग्रामस्थ यांची सभा घेवुन बांबु लागवडीसाठी ग्रामस्थांना मार्गदर्शन करून जास्तीजास्त बांबु लागवड करणेबाबत प्रोत्साहीत केले. दि. 17/05/2023 रोजीचे मा. जिल्हाधिकारी सातारा यांचेकडील अदेशान्वये सामाजिक वनीकरण विभाग सातारा यांना 10000 हे. बांबु लागवडचे मग्रारोहयो अंतर्गत उदिष्ट देण्यात आले. सदर योजना राबविण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाकडे जिल्ह्यात अतिशय कमी कर्मचारी वर्ग आहे. वनरक्षक वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी असे एकुण 43 अधिकारी व कर्मचारी उपलब्ध



| अ.क्र. | तालुका | सामाजिक वनीकरण विभागाकडे प्राप्त प्रस्ताव | | कृषी विभागाकडून सामाजिक वनीकरण विभागाकडे हस्तांतरीत केलेले प्रस्ताव | | कृषी विभागाकडील छाननी अंती कार्यवाहीस पात्र प्रस्ताव | | तांत्रिक मान्यता दिलेले प्रस्ताव | | प्रशासकीय मान्यता दिलेले प्रस्ताव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | हेक्टर | संख्या | हेक्टर | संख्या | हेक्टर | संख्या | हेक्टर | संख्या | हेक्टर |
| 1 | जावली | 9 | 2.21 | 37 | 15.49 | 37 | 15.49 | 46 | 17.7 | 41 | 16.89 |
| 2 | कराड | 19 | 6.63 | 7 | 3.45 | 3 | 2.2 | 22 | 8.83 | 15 | 4.07 |
| 3 | खंडाळा | 19 | 13.3 | 74 | 48.14 | 55 | 41.63 | 67 | 50.23 | 45 | 34.35 |
| 4 | खटाव | 11 | 6.18 | 195 | 153.7 | 75 | 53.31 | 85 | 59.31 | 78 | 55.64 |
| 5 | कोरेगांव | 18 | 8.30 | 91 | 66.87 | 77 | 37.34 | 68 | 34.49 | 35 | 19.18 |
| 6 | महाबळेश्वर | 9 | 3.20 | 0 | 0.00 | 0 | 0 | 9 | 3.20 | 9 | 3.20 |
| 7 | माण | 22 | 11 | 141 | 106.8 | 132 | 103.49 | 153 | 113.2 | 111 | 77.89 |
| 8 | पाटण | 10 | 2.32 | 58 | 33.07 | 34 | 16.68 | 44 | 19 | 41 | 16.84 |
| 9 | फलटण | 10 | 6.01 | 97 | 64.23 | 74 | 46.03 | 84 | 52.04 | 79 | 45.94 |
| 10 | सातारा | 23 | 3.55 | 90 | 56.53 | 84 | 51.07 | 101 | 50.16 | 73 | 37.58 |
| 11 | वाई | 2 | 1.97 | 106 | 70.16 | 106 | 70.16 | 108 | 72.13 | 96 | 60.12 |
| **एकूण** | | **152** | **64.67** | **896** | **618.4** | **677** | **437.4** | **787** | **480.3** | **623** | **371.7** |

आहेत, त्यामुळे उदिष्ट पुर्तता करणे बाबत मा. जिल्हाधिकारी सातारा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 04.09.2023 रोजी झालेल्या सभेमध्ये कृषी विभागाची तांत्रिक अडचण व सामाजिक वनीकरण विभागाकडे आपुरे मनुष्यबळ याचा विचार करून कृषी विभागाने लाभार्थ्यांकडुन परिपुर्ण प्रस्ताव संकलीत करून तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेसाठी सामाजिक वनीकरणक विभागाकडे हस्तांतरीत करावेत तसेच दोन्ही विभागाने बांबु लागवडीची कामे समन्वयाने पुर्ण करावीत अशा सुचना दिल्या त्याअनुषंगाने दोन्ही विभागाकडुन बांबु लागवड यशस्वीपणे राबविणे बाबत कार्यवाही सुरू आहे.

30 मार्च 2022 चे मग्रारोहयो शासन निर्णयानुसार वैयक्तीक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर ग्रामपंचायत, कृषी व सामाजिक वनीकरण विभागा मार्फत वृक्षलागवड राबविण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना दर्जेदार व गुणवत्तापुर्ण रोपांचा पुरवठा होण्याच्या दृष्टीने शासन E O I च्या माध्यमातुन तिन संस्थांची TCP (Tissue Culture Plants) पुरवठादार म्हणुन नियुक्ती कली आहे. सदर पुरवठादार संस्थेकडुन शेतकऱ्यांना बांधावर रोपांचा पुरवठा होणार असुन त्यासाठी त्यांना

कोणतीही रक्कम भरावी लागणार नाही. लाभार्थ्यांने बांबु लागवड अर्ज सादर करताना अर्जासोबत बांबु रोपे पुरवठेबाबत शासन निर्णयातील विहित नमुन्यात रोपे मागणी करणे अनिवाय आहे.

**बांबु रोपे निर्मिती**

मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे सुचनेनुसार सातारा जिल्हयात मग्रारोयो अंतर्गत प्रायोगिक तत्वावर बांबु लागवड ही महत्वकांशी योजना राबविण्यात येत आहे. सातारा सामाजिक वनीकरण विभागासाठी 10000 हे. क्षेत्रावर वृक्षलागवडीचे उदिष्ट देण्यात आले आहे. शेतकऱ्यांना उच्च प्रतीची, दर्जेदार व प्रमाणीत रोपे उपलब्ध व्हावीत म्हणुन North East Biodivercity Conservation and Research Center, Assam येथुन माहे एप्रिल 2023 मध्ये Bambusa Tulda - 30 kg व Bambusa Bamboo - 25 kg प्रमाणीत बियाणे खरेदी करून 12 x 1.20 x 0.15 मी. बेडवर त्याची उगवण करण्यात आली असुन नंतर सदरची रापे 12 x 1.20 x 0.60 मी. साईच्या गादी वाफ्यावर 10 x 10 से.मी. अंतरावर लावण्यात आली आहेत. नंतर सदर बांबु रोपांचा रायझोमचे A, B, C असे वर्गीकरण करून 20 X 30 से.मी. अकाराच्या उंच पिशवीमध्ये शेतयांना उच्च प्रतीच व दर्जेदार बांबु A,B ग्रेडचे रायझोमची रोपे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सदर 55 किलो बियाणा पासुन अंदाजे 1372500 रायझोम रोपे तयार होणार आहेत.





◆ ◆ ◆




महाराष्ट्र रेंजर च्या प्रसिध्दी पत्रकाचे प्रकाशन करताना मा. मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे,
राज्य उत्पादन शुल्क तथा पालकमंत्री सातारा ना. शंभुराज देसाई व मा. संपादक राहुल ताटे.

## महाराष्ट्रातील वन-वन्यजीव संवर्धन आणि संरक्षणासाठी कार्यरत असणारे पहिले मासिक

# 'महाराष्ट्र रेंजर'च्या प्रसिध्दी पत्रकाचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.एकनाथजी शिंदे यांचे शुभहस्ते प्रकाशन

महाराष्ट्रातील वन-वन्यजीव संवर्धन आणि संरक्षणासाठी कार्यरत असणाऱ्या'महाराष्ट्र रेंजर' या मासिकाच्या प्रसिध्दी पत्रकाचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.एकनाथजी शिंदे यांचे शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमप्रसंगी राज्य उत्पादन शुल्क तथा पालकमंत्री सातारा ना.शंभुराज देसाई यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र राज्य हे पर्यावरणाच्या बाबतीत अतिशय संवेदनशील राज्य आहे. राज्यात वन विभाग अंतर्गत प्रादेशिक, सामाजिक वनीकरण, वन्यजीव आणि संशोधन व तत्सम शाखा या वन आणि वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनाचे काम करीत आहेत. सध्या राज्यात 6 व्याघ्र प्रकल्प, 6 राष्ट्रीय उद्याने आणि 50 च्या वर वन्यप्राणी अभयारण्ये आहेत. राज्याचा क्षेत्रीय विस्तार खूप मोठा असून वन आणि वन्यजीव क्षेत्रात कमालीची विविधता आढळते, या विविधते सोबतच प्रत्येक क्षेत्राच्या समस्या, त्याची बलस्थाने आणि समस्येवरील उपाय देखील वेगवेगळे आहेत.

सध्या जगासमोर जागतिक तापमान वाढ, पर्यावरणीय बदल आणि प्रदूषण यासारख्या मानवनिर्मित समस्या आ वासून उभ्या आहेत त्यावर एकजुटीने प्रयत्न करणे हे सगळ्यांचेच कर्तव्य आहे. याच भावनेतून महाराष्ट्रात वन आणि वन्यजीव तसेच पर्यावरणात होणाऱ्या विविध घटना आणि समस्या तसेच त्यावर केले जाणारे उपाय याची जाण समाजाला व्हावी या भावनेतून मासिक **महाराष्ट्र रेंजर (Maharashtra Ranger)** ची स्थापना करण्यात आलेली असून या व्यासपीठाच्या माध्यमातून राज्यातील **पर्यावरण, वन आणि वन्यजीव जागरूकता आणि प्रसिद्धी बाबतचे कार्य** करण्याचा संपादक मंडळाचा मानस आहे. या मासिकाबद्दलची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1) **प्रकाशनाचे नाव:** महाराष्ट्र रेंजर / Maharashtra Ranger

2) **प्रकाशनाचा प्रकार:** मासिक / Monthly

3) **प्रकाशनाची उद्दिष्टे**

- भारतीय लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून प्रसारमाध्यमे काम करीत असतात, सद्यस्थितीत महाराष्ट्रात निव्वळ **पर्यावरण, वन आणि वन्यजीव** या विषयावर प्रकाशित होणारे आणि राज्यभर वितरीत होणारे कोणतेही प्रकाशन उपलब्ध



नसल्याने या विषयावर राज्यात सर्वसमावेशक **जागरूकता आणि प्रचार प्रसिद्धी बाबतचे कार्य करणे.**

- महाराष्ट्रातील वन विभाग अंतर्गत राज्यस्तरावर आणि सर्व ११ वन वृत्तात चालू असलेल्या विविध विकास कामांची प्रचार – प्रसिद्धी करणे.
- महाराष्ट्राच्या समृद्ध जैवविविधता चा शाश्वत विकास होण्याच्या दृष्टीने समाजमन पर्यावरणप्रेमी बनविण्यासाठी कार्य करणे.
- शासनाच्या वतीने पर्यावरण क्षेत्रात घेतल्या जाणाऱ्या विविध पर्यावरण आणि वन – वन्यजीव पूरक उपक्रमांची राज्यभर प्रचार प्रसिद्धी करणे आणि उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी प्रयत्न करणे.
- वनस्पती, वन्यप्राणी, पक्षी, सरीसृप, कीटक आणि इतर तत्सम जीव घटकांची माहिती प्रसिद्ध करणे आणि जाणीव जागृती करणे.
- पर्यावरण, वन- वन्यजीव संवर्धन कामी काम करणाऱ्या विविध खाजगी संस्था आणि अशासकीय संस्था यांच्या संवर्धन कामाची व्यापक प्रचार-प्रसिद्धी करणे.
- राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि विविध शैक्षणिक संस्था मधील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्यामध्ये वन आणि वन्यजीव बाबत कुतूहल आणि प्रेम निर्माण होण्यासाठी प्रयत्न करणे.
- वन आणि वन्यजीव क्षेत्रात संवर्धन आणि संरक्षण हि नैसर्गिकपणे संथ प्रक्रिया असून याकामी शासनाकडून अवलंब केलेल्या धोरणांचे परिणाम (Results) मिळण्यास देखील दीर्घ काळ लागतो त्याकाळात सदर दीर्घकालीन धोरणांचा पाठपुरावा करणे.

## 4) <u>प्रकाशनाची रचना</u>

**मुखपृष्ठ**

महिन्यातील विशेष घटनेबाबत छायाचित्र प्रसिद्ध करण्यात येईल.

**अंतरंग**

प्रकाशनात समाविष्ठ विविध सदर आणि लेख यांची अनुक्रमणिका

**संपादकीय**

महिन्यातील विशेष घटनेबाबत संपादकीय मंडळाचे मनोगत

**वनवृत्त स्तरीय घडामोडी**

महाराष्ट्रातील वन विभाग अंतर्गत राज्यस्तरावर आणि सर्व ११ वन वृत्तात चालू असलेल्या विविध विकास कामांची प्रचार – प्रसिद्धी

**जंगल हिरोज**

राज्यातील वन आणि वन्यजीव क्षेत्रात बहुमुल्य योगदान दिलेल्या विविध शासकीय, अशासकीय आणि खाजगी व्यक्ती यांच्या कार्याची माहिती या सदराच्या माध्यमातून देण्यात येईल.

**·जैवविविधता विशेष**

महाराष्ट्रातील जंगलात आढळणारे वनस्पती,



झुडपे आणि वेली प्रजाती, गवत प्रजाती, वन्यप्राणी, पक्षी प्रजाती, सरीसृप प्रजाती, फुलपाखरे आणि कीटक आणि इतर सर्व जैवविविधता याबद्दल इत्यंभूत माहिती आणि संशोधन विषयक इतर माहिती प्रसिद्ध करणे.

**·संरक्षित क्षेत्रे**

भारत आणि महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रे जसे कि व्याघ्र प्रकल्प, हत्ती प्रकल्प, राष्ट्रीय उद्याने, वन्यजीव अभयारण्ये, देवराई, संवर्धन राखीव क्षेत्रे आणि समुदाय राखीव क्षेत्रे याबद्दल इत्यंभूत माहिती प्रसिद्ध करणे.

**·वन आणि वन्यजीव संवर्धन-संरक्षण व्यवस्थापन**

वन आणि वन्यजीव यांचे संवर्धन आणि संरक्षण कामी राज्याच्या वन विभागाच्या वतीने केले जाणारे व्यवस्थापन याची शास्त्रीय आणि इत्यंभूत माहिती प्रसिद्ध करणे, यातील विषय खालीलप्रमाणे :

- वृक्ष लागवड आणि तत्सम विषयक माहिती
- अधिवास विकास अंतर्गत कुरण विकास, अखाद्य वनस्पती निर्मुलन बाबत माहिती
- वन आणि वन्यजीव विषयक कायदे, नियम आणि शासन निर्णय यावर माहिती
- वनातील मृद आणि जल संधारण कामांची शास्त्रीय माहिती
- वन आणि वन्यजीव गुन्हा विषयक माहिती
- वन आणि वन्यजीव यांना असणारे विविध धोके जसे कि अवैध वृक्षतोड, अवैध शिकारी, वन वणवा, वन्यजीव तस्करी इत्यादी बाबत मुलभूत माहिती ची प्रचार प्रसिद्धी करणे.
- मानव-वन्यजीव संघर्ष, वन्यजीव बचाव पथके आणि रेस्क्यू कार्य बाबत माहिती
- वन्यजीव प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खुणा,

संरक्षण गस्ती, संरक्षण कामी वापरली जाणारी संसाधने आणि त्याचा वापर आणि इतर संरक्षण विषयक माहिती.

- वन पर्यटन, वन्यजीव भ्रमंती, नियम, कार्यपद्धती आणि वन पर्यटन वर आधारित स्थानिक रोजगार निर्मिती
- जंगल आधारित स्थानिक रोजगार आणि उपजीविका निर्मिती कार्यक्रम
- पर्यावरण विषयक विविध विषय: पर्यावरणीय बदल, प्रदूषण इत्यादी

**खाजगी संस्था व्यासपीठ**

पर्यावरण संवर्धन कामी कार्य करणाऱ्या विविध खाजगी संस्था यांच्या कार्याची प्रचार प्रसिद्धी करणे

**क्षेत्रीय अधिकारी-कर्मचारी व्यासपीठ**

वन आणि वन्यजीव क्षेत्रात काम करणाऱ्या क्षेत्रीय अधिकारी आणि कर्मचारी तसेच त्यांच्या संघटना यांचे मत प्रकट करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

**वसुंधरा: वन महिला विशेष**

वन आणि वन्यजीव क्षेत्रात काम करणाऱ्या महिला वर्गाची माहिती आणि त्यांच्या अडचणी तसेच विशेष कार्याची प्रचार प्रसिद्धी करणे

**जंगल क्लिक**

प्रसिद्ध छायाचित्रकार, वन अधिकारी-कर्मचारी, स्थानिक लोक आणि पर्यटक यांच्या मार्फत टिपण्यात आलेली विविध छायाचित्रे प्रसिद्ध करणे.

**इतर वेळेवर येणारे मुद्दे**

मासिक महाराष्ट्र रेंजर च्या व्यासपीठाच्या माध्यमातून राज्यातील पर्यावरण, वन आणि वन्यजीव जागरूकता आणि प्रसिद्धी बाबतचे कार्य करण्याचा संपादक मंडळाचा मानस आहे.

सदर मासिक हे राज्याचे पर्यावरणीय धोरण ठरवणारे सर्व मा. पदाधिकारी, मा. मंत्री महोदय तसेच नागपूर स्थित वनखात्याच्या मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांचे कार्यालय आणि त्या कार्यालयातील सर्व अधिकारी वर्ग, राज्यातील सर्व संवर्गातील अधिकारी, विभागीय वन अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी यांची कार्यालये आणि राज्याच्या सर्व महत्वाच्या पर्यावरण विषयक शासकीय, अशासकीय संस्था येथे प्रत्यक्ष अंकाच्या स्वरूपात (हार्ड कॉपी)आणि ई-प्रकाशनाच्या माध्यमातून पोहचवले जाणार आहे.

तरी आपल्या/संस्थेच्या माध्यमातून मासिक महाराष्ट्र रेंजर मध्ये आपल्या कार्यक्षेत्रातील घडामोडी, महत्वाची माहिती, वरील विविध विषयावरील माहिती आणि जाहिराती आम्ही प्रसिद्ध करण्यास उत्सुक आहोत. जेणेकरून वन आणि वन्यजीव विषयक प्रत्येक माहिती हि राज्याच्या प्रमुखांपासून ते क्षेत्रीय स्तराच्या कार्यालयातील कर्मचारी वर्गापर्यंत पोहोचण्यास मदत होईल.



# THE LAND OF 'MOWGLI!'

## Pench Tiger Reserve, Maharashtra

Tigers In The Heart of India

Best time to visit the PTR is
**Winter & Early Summer.**

### How to Reach

**By Road**

**50**km
Drive from Nagpur

**By Air**

**70**km
Nearest airport: Nagpur

**By Rail**

**50**km
Nearest Railway Station is at Nagpur

### Happy to Help You, At

Deputy Director, Pench Tiger Reserve, Nagpur

dfowlpench@mahaforest.gov.in

Conservator of Forest & Field Director, Pench Tiger Reserve, Nagpur

ccffdpench2@mahaforest.gov.in

For more information visit

www.penchtigerreserve.maharashtra.gov.in

or scan





MAHARASHTRA RANGER

TID: 62793829

Scan and Pay
with Cards /UPI


**महाराष्ट्र रेंजर विभागीय कार्यालय**

प्लॉट नं ०२, पायरी पार्क, गोळीबार मैदान, गोडोली,
सातारा-४१५००३ (महाराष्ट्र)

ई-मेल : maharashtraranger@gmail.com

वेबसाईट : www.maharashtraranger.in

मोबा : ९४२१६६११९२/७३८७९५४७४३/९३०७१२४४९९


प्रति/TO

______________________

______________________

______________________